ISSN No 2347-7075
Impact Factor- 8.141
Volume-6 Issue-30

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance And Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor– 8.141
Vol.6 Issue-30 Mar-Apr- 2025

# International journal of advance and applied research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*
**Bi-Monthly**

## *Volume-6* *Issue-30*

**Published by:**
Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India
***Website:*** *https://ijaar.co.in*

**Submit Your Research Paper on Email**

**Regular Issue:** 2013ijaar@gmail.com **Special Issue:** ijaar2022@gmail.com

For Publication Call On - **8888454089**

**Chief Editor**
P. R. Talekar
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India
***Email:*** *editor@ijaar.co.in* ***Mob-*** *8624946865*

## Editorial & Advisory Board

| | | |
|---|---|---|
| **Dr. S. D. Shinde** | **Dr. M. B. Potdar** | **Dr. P. K. Pandey** |
| **Dr. L. R. Rathod** | **Mr. V. P. Dhulap** | **Dr. A. G. Koppad** |
| **Dr. S. B. Abhang** | **Dr. S. P. Mali** | **Dr. G. B. Kalyanshetti** |
| **Dr. M. H. Lohgaonkar** | **Dr. R. D. Bodare** | **Dr. D. T. Bornare** |

***The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.***

**© All rights reserved with the Editors**

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –8.141
Vol.6 Issue-30 Mar-Apr- 2025

CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | इतिहास संशोधनातील लवचिकता आणि पुनर्निर्मिती : एक अध्ययन<br>**अमितकुमार गणेश शिंगणे** | 1-5 |
| 2 | शाश्वत पर्यावरण विकास काळाची गरज<br>**प्रा. डॉ. रमेश टिकाराम बागडे** | 6-9 |
| 3 | स्त्री सक्षमीकरण आणि समतोल समाजनिर्मिती<br>**श्री. सचिन विठ्ठल वायले, डॉ. चंद्रकांत गोंधळी** | 10-15 |
| 4 | "ब्रेक्झिट आणि भारत: व्यापार, गुंतवणूक आणि विकासाच्या दृष्टीने एक विश्लेषण"<br>**डॉ. तुषार गणपत वाकसे** | 16-20 |
| 5 | महिला सशक्तिकरण : सामाजिक समतोल<br>**प्रा. डॉ. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले** | 21-24 |
| 6 | प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना : एक चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे** | 25-30 |
| 7 | भारतातील डिजिटल शिक्षणाच्या संधी आणि आव्हाने<br>**प्रा. नाजीर पठाण** | 31-35 |
| 8 | ई.स.२००० नंतरची कृषीप्रधान ग्रामीण कादंबरी :एक अभ्यास<br>**प्रा. विक्रम उखर्डा मोरे** | 36- 42 |
| 9 | 'वर्तमान शिक्षा के उद्देश्यों एवं शिक्षण विधियों के सन्दर्भ में बौद्ध शिक्षा प्रणाली का अध्ययन''<br>**अमित कुमार शुक्ल** | 43-45 |
| 10 | श्रीलंका में युवा वर्ग का आर्थिक संकट<br>**डॉ. रमेश प्रसाद कोल** | 46-49 |
| 11 | राईट टू रिकॉल: लोकशाहीच्या यशासाठी प्रभावी हत्यार<br>**शिंदे काळुराम दामु** | 50-53 |
| 12 | सानेगुरुजींच्या बालसाहित्यातून होणारे मूल्यदर्शन<br>**तृप्ती सचिन नाईक** | 54-58 |
| 13 | शंतनु राव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वाचा उत्क्रांतीशील प्रवास: किर्लोस्कर उद्योगसमूहाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रभावाचा अभ्यास<br>**सचिन फाळके** | 59-62 |
| 14 | भारत में निजता का अधिकार: निजता की संकल्पना के संदर्भ में संवैधानिक सभा की बहस का अध्ययन<br>**पिंकी** | 63-66 |
| 15 | दिव्यांगांची आत्मकथने<br>**ज्ञानेश्वर किसन म्हात्रे** | 67-70 |
| 16 | संत नामदेव आणि महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय<br>**प्रा.डॉ.सरकटे सदाशिव हरिभाऊ** | 71-73 |
| 17 | जागतिक पर्यावरण संरक्षणात भारताची भूमिका<br>**प्रा. डॉ.जयराम ढवळे** | 74-76 |
| 18 | मराठा कालीन न्यायव्यवस्था : मजलिस आणि पंचायत पद्धतीचा एक तुलनात्मक अभ्यास<br>**अमित प्रकाश निकम ,डॉ. रमेश धनराज जाधव** | 77-80 |

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No.30** **Mar-Apr- 2025**

# इतिहास संशोधनातील लवचिकता आणि पुनर्निर्मिती : एक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी, एम. इ. एस. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज मेहकर, जि. बुलढाणा.
**Corresponding Author: अमितकुमार गणेश शिंगणे**
**Email-** amitshingane156@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15696189**

**प्रस्तावना**

इतिहास म्हणजे केवळ भूतकाळाची नोंद नसून, तो वर्तमान समजून घेण्याचे आणि भविष्याचा वेध घेण्याचे साधन आहे. मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीत इतिहासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. इतिहासाच्या अभ्यासातून समाजाची वैचारिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक उन्नती समजून घेता येते. परंतु, आधुनिक काळात इतिहास संशोधनाच्या पद्धतीत आणि दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडून आले आहेत. कोविड-19 महामारी, डिजिटल क्रांती आणि जागतिकीकरणाच्या लाटेमुळे इतिहास संशोधनासाठी नवी आव्हाने आणि नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. संशोधन करताना पारंपरिक स्रोतांबरोबरच नव्या माध्यमांचा वापर, बहुविध दृष्टीकोनांचा स्वीकार आणि आंतरशाखीय अभ्यास आवश्यक झाला आहे. इतिहास हा स्थिर नाही, तर सजीव, परिवर्तनशील आणि संदर्भानुसार नवे अर्थ घेणारा आहे, हे नव्या संशोधनातून अधोरेखित होत आहे.इतिहास संशोधनाची ही वाटचाल म्हणजे भूतकाळाच्या स्मृतींतून, वर्तमानाच्या अनुभूतीतून आणि भविष्याच्या दिशेने होणारी ज्ञानयात्रा आहे. अशा स्थितीत इतिहास संशोधनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही व्यापक झाला पाहिजे. संशोधन प्रक्रियेत अनिवार्य घटक म्हणजे लवचिकता (Resilience). पारंपरिक मार्गातून संशोधन करताना येणाऱ्या अडचणींवर मात करत, संशोधकाने नवे मार्ग शोधले पाहिजेत. यासाठी पुनर्निर्मिती (Renewal) आवश्यक ठरते, जी केवळ पद्धतींची नव्हे तर दृष्टिकोनाचीही हवी. प्रस्तुत शोधनिबंध, इतिहास संशोधनातील लवचिकता व पुनर्निर्मिती या दोन संकल्पनांवर आधारित आहे. भूतकाळाकडे डोळसपणे पाहात, त्यातून बोध घेऊन संशोधनाच्या प्रक्रियेला अधिक अर्थवाही व कालसुसंगत बनवणे हाच या अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

**बीज शब्द -** इतिहास संशोधन, लवचिकता, पुनर्निर्मिती, डिजिटल इतिहास, संशोधन पद्धती, परिवर्तनशीलता.

**उद्दिष्टे -**

1. संशोधन प्रक्रियेत आलेल्या आधुनिक बदलांचे परीक्षण करणे.
2. इतिहास संशोधनात आंतरशाखीय दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
3. इतिहास संशोधनातील लवचिकतेचे महत्त्व विशद करणे.
4. पारंपरिक व डिजिटल स्रोतांची तुलनात्मक समीक्षा करणे.
5. भविष्यातील संशोधन दिशा ठरवण्याच्या प्रक्रियेत मार्गदर्शन करणे.

**गृहितके -**

1. इतिहास संशोधन ही स्थितिस्थापक न राहता सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे.
2. आंतरशाखीय दृष्टिकोन इतिहासाच्या समजुतीत मोलाची भर घालतो.
3. संशोधकाच्या लवचिकतेवर संशोधनाची गुणवत्ता अवलंबून असते.
4. डिजिटल क्रांतीमुळे पारंपरिक संशोधन पद्धतींना नवे आयाम मिळाले आहेत.
5. इतिहासाचा अभ्यास वर्तमान व भविष्य समजून घेण्यासाठी उपयुक्त आहे.

**विषयाचे महत्त्व -**

आज झपाट्याने बदलणाऱ्या जगात इतिहास संशोधनाला नव्या दृष्टीने समजून घेणे अत्यावश्यक आहे. लवचिकता आणि पुनर्निर्मिती या दोन संकल्पना इतिहास संशोधनासाठी केवळ पूरक नसून, अनिवार्य आहेत.

इतिहासाच्या अध्ययनातून सामाजिक समतेपासून ते राजकीय बदलापर्यंत विविध अंगांचा अभ्यास करता येतो. संशोधन प्रक्रियेतील नवता ही समाजाच्या स्मरणशक्तीला समृद्ध करते. त्यामुळे या विषयाचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक दोन्ही स्तरांवर मोठे महत्त्व आहे.

**विषय विवेचन -**

**1. इतिहास संशोधनाचा पारंपरिक दृष्टिकोन -**

पारंपरिक इतिहासकार लेखनासाठी मुख्यतः मूळ (Primary) पुरावे वापरतात. जसे - अभिलेख, पत्रव्यवहार, सरकारी अहवाल, न्यायालयीन नोंदी, कर आकारणीचे दस्तऐवज इत्यादींवर भर. या दृष्टिकोनात मुख्यतः राजे-महाराजे, युद्धे, साम्राज्य विस्तार, राजकारण, कायदे, शासकांचे कार्य, प्रशासकीय बदल या घटकांवर केंद्रित लेखन होते. सामान्य जनतेच्या अनुभवांना दुर्लक्ष केले गेले. यामध्ये इतिहासकार वस्तुनिष्ठतेचा आग्रह धरीत. इतिहास म्हणजे भूतकाळात "खरे काय झाले?" याचा शोध असे मानले जाते. भूतकाळातील घटना कालानुक्रमानुसार मांडून घटना आणि तारखा यांच्या संदर्भातच इतिहास सादर केला जात. स्रोतांचा तपशीलवार अभ्यास, त्यांची तुलना, प्रमाणीकरण (Authentication) आणि विश्लेषण यावर भर दिलेला असतो. इतिहासकार स्वतःचे मत किंवा भूमिका स्पष्ट न करता, केवळ पुराव्यांवर आधारित निष्कर्ष मांडतात. घडलेल्या घटनांचा तटस्थपणे अभ्यास करतात.

पारंपारिक इतिहास लेखनात सामान्य जनतेचा सहभाग कमी होता. स्त्रिया, शूद्र-दलित, आदिवासी, शेतकरी यांचा इतिहास अंधारात आल्याने एकतर्फी दृष्टिकोन स्पष्ट होत जो मुख्यतः शासक वर्गाच्या नजरेतून पाहिल्या जात. उपेक्षित समाज घटकांचे अनुभव, लोकसाहित्य, लोककथा यांचे महत्त्व लक्षात घेतले जात नव्हते. पारंपरिक इतिहास संशोधन पद्धतीने इतिहासाचा पाया रचला, पण त्याचबरोबर यामध्ये अनेक मर्यादा होत्या. यामुळेच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नव्या दृष्टिकोनांची गरज भासली. तरीही, पारंपरिक दृष्टिकोन इतिहास संशोधनाचा एक मूलभूत आणि शिस्तबद्ध पाया मानला जातो.

**2. आधुनिक इतिहास संशोधन आणि लवचिकता -**

इतिहास संशोधन ही एक चालू आणि सतत बदलणारी प्रक्रिया आहे. पारंपरिक चौकटीत राहून सत्य शोधण्याचा प्रयत्न करणारा इतिहास आज अनेक नवीन दृष्टिकोन आणि पद्धतींनी समृद्ध झाला आहे. कालांतराने, संशोधनाची पद्धती बदलली. नव्या संशोधकांनी इतिहासाकडे केवळ 'घडलेल्या घटनांचा कालक्रम' म्हणून न पाहता, त्या घटनांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि मनोवैज्ञानिक पैलूंचाही अभ्यास सुरू केला. विशेषतः सबाल्टर्न, स्त्रीवादी, सामाजिक इतिहास, डिजिटल इतिहास, दलित इतिहास यासारख्या नव्या प्रवाहांनी इतिहास संशोधनाला लवचिकतेचे नवे परिमाण दिले. ही लवचिकता म्हणजे भूतकाळाचे समृद्ध संदर्भ समजून घेण्याची आणि आजच्या काळाशी जोडण्याची क्षमताच होय. जसे - भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी, शेतकरी चळवळी किंवा स्थानिक स्त्रियांचा सहभाग याकडेही नव्याने पाहण्याची दृष्टी मिळते.

सामाजिक, स्त्रीवादी, दलित, पर्यावरणीय, सांस्कृतिक, उपकथनात्मक अशा अनेक दृष्टिकोनांनी इतिहासाचा अभ्यास समृद्ध झाला आहे. इतिहास आता समाजशास्त्र, मानवविज्ञान, मानसशास्त्र, तंत्रज्ञान, सांख्यिकी अशा इतर शाखांशी सुसंवाद साधतो. GIS मॅपिंग, डिजिटल आर्काइव्ह्स, AI चा वापर, डेटा मायनिंग, ऑनलाइन अभिलेख यामुळे संशोधन अधिक गतिमान झाले आहे. स्थानिक लोक, आदिवासी, शेतकरी, महिलांचे अनुभव संशोधनात समाविष्ट होऊ लागले आहेत. लोकांचा इतिहास समोर येऊ लागला आहे. इतिहासकार पूर्वग्रह टाळून, विविध पुरावे समोर ठेवून आणि वेगवेगळे दृष्टिकोन वापरून संशोधन करतो.

नवीन सामाजिक आंदोलनं, मागासवर्गांचा इतिहास यांना समजून घेण्यासाठी, एकाच घटनेचे विविध सांस्कृतिक अर्थ लावण्यासाठी लवचिकता गरजेची आहे. पारंपरिक स्त्रोतांबरोबरच तोंडी इतिहास, लोकसाहित्य, मीडिया हे नवीन स्रोत उदयास येत आहेत. इतिहासाचा अभ्यास आता स्थानिक असतानाही जागतिक पातळीवर विचार करण्याची गरज आहे. जसे - खाद्य संस्कृतीचा इतिहास, स्मृती इतिहास इ. इंटरडिसिप्लिनरी, ऑनलाइन स्रोत, विविध भाषा आणि दृष्टिकोन यांचा वापर होणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर समकालीन घटनांचे ऐतिहासिक विश्लेषण होणे गरजेचे आहे. जसे, कोरोना महामारीचे ऐतिहासिक संदर्भ, पर्यावरण बदल इत्यादी.

**3. डिजिटल इतिहास संशोधनाची आवश्यकता आणि संधी -**

एकविसाव्या शतकात डिजिटल तंत्रज्ञानाने इतिहास संशोधनात क्रांती केली. इंटरनेट आणि

तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या युगात इतिहास संशोधनाच्या पारंपरिक पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. आता माहितीचा साठा फक्त ग्रंथालयांपुरता मर्यादित न राहता डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहे. त्यामुळे डिजिटल इतिहास संशोधन ही संकल्पना अधिकाधिक महत्त्वाची ठरत आहे. डिजिटल साधनांचा वापर करून इतिहासाचे संशोधन अधिक व्यापक, सहज आणि संवादात्मक बनते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभिलेखागार, ग्रंथसंग्रह, शोधनिबंध, अहवाल, वृत्तपत्रांचे संग्रह डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहेत, ज्यांचा सहज वापर संशोधक करू शकतात. दूरदूरच्या भागात बसूनही संशोधकांना मोलाचे संदर्भ मिळू शकतात. यामुळे संशोधनात जागतिकता (Global Perspective) आली असून, याला "Glocal History" असेही म्हटले जाते.

पूर्वी एका दस्तऐवजासाठी संशोधकांना विविध ठिकाणी प्रवास करावा लागे; आज अनेक संग्रह ऑनलाइन उपलब्ध आहेत. डिजिटल टूल्सद्वारे मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण सहज करता येते. इतिहास तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, समाजशास्त्र, सांख्यिकी इत्यादी शाखांशी समन्वय साधत आहे, ज्यातून नव्या संशोधनविषयांची निर्मिती होते. नवीन पिढी तंत्रज्ञानाशी परिचित असल्याने डिजिटल स्रोतांचा वापर करून अधिक सहज, नाविन्यपूर्ण व जलद संशोधन करतात. भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information Systems) चा वापर करून ऐतिहासिक घडामोडींचे स्थानिक संदर्भासह विश्लेषण करता येते. ब्लॉग्स, पॉडकास्ट, यूट्यूब चॅनल्स, इन्फोग्राफिक्सच्या माध्यमातून संशोधन जनसामान्यांपर्यंत पोहोचते. यामुळे "पब्लिक हिस्ट्री" चा विकास होतो. हजारो वर्षांचा डेटा स्कॅन, ऑटोमेटिक ट्रान्सक्रिप्शन, भाषा भाषांतर इत्यादींमुळे ऐतिहासिक दस्तऐवज अधिक उपयुक्त ठरतात. डिजिटल संग्रहालये आणि आभासी प्रदर्शने यामुळे संशोधक, विद्यार्थी आणि रसिकांसाठी ऐतिहासिक वास्तूंचा आणि घटनांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळत आहे.

### 4. इतिहास संशोधनातील पुनर्निर्मिती -

इतिहास म्हणजे फक्त घटनांची नोंद नव्हे, तर त्या घटनांचे विश्लेषण, मांडणी आणि समज यांची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत "पुनर्निर्मिती" (Reconstruction) हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कारण इतिहासकाराला अनेकदा अपूर्ण, पक्षपाती किंवा खंडित स्रोतांवरून भूतकाळ उलगडावा लागतो. त्यामुळे इतिहास संशोधन ही केवळ माहितीची पुनरावृत्ती नसून भूतकाळाच्या पुनर्निर्मितीची सर्जनशील प्रक्रिया आहे. भूतकाळातील घटनांचा, व्यक्तींचा, संस्कृतींचा आणि प्रक्रियांचा पुनर्विचार करून त्याचे नव्या पद्धतीने विश्लेषण करणे. अनुपलब्ध माहितीचे तर्कसंगत अंदाज लावणे आणि ती शक्यतो प्रमाणित पुराव्याच्या आधारावर स्पष्ट करणे. विस्मृतीत गेलेल्या समूहांचा इतिहास नव्याने लिहिणे. इतिहास संशोधनासाठी उपलब्ध असलेले अभिलेख, दस्तऐवज, पत्रव्यवहार, शिलालेख हे अनेकदा अपूर्ण असतात. अशा वेळी शोधकाने त्या कालखंडाच्या परिस्थितीचा अभ्यास करून घटनांची पुनर्निर्मिती करावी लागते. पारंपरिक इतिहास अनेकदा सत्ताधाऱ्यांच्या दृष्टिकोनातून लिहिला गेलेला असतो. त्यामुळे तटस्थ आणि सर्वसमावेशक इतिहासासाठी पुनर्लेखन गरजेचे ठरते.: वंचित घटक, स्त्रिया, आदिवासी, अल्पसंख्याक यांच्या दृष्टिकोनातून इतिहासाची नव्याने मांडणी आवश्यक असते. नवीन पुरावे, शिलालेख, ताम्रपट, आर्कियोलॉजिकल शोध, तोंडी परंपरा यामुळे इतिहासाच्या आधीच्या समजुती बदलतात.

इतिहासाचा अभ्यास विविध पद्धतीने करता येतो. ज्यामध्ये विविध स्रोतांची तुलना करून, वयस्क नागरिकांच्या आठवणी, लोककथा, लोकसाहित्याद्वारे माहिती गोळा करून, 3D मॉडेलिंग, GIS मॅपिंग, डिजिटल आर्काइव्ह्स यांचा वापर करून ऐतिहासिक स्थळांची, घटना किंवा वातावरणाची पुनर्निर्मिती करणे आणि मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र याच्या साहाय्याने अधिक सखोल विश्लेषण करता येते. ज्यामुळे भूतकाळ अधिक वस्तुनिष्ठ व समावेशक पद्धतीने समजतो. इतिहासाचे अध्ययन अधिक सजीव, साक्षेपी आणि माणूसकेंद्री बनते. समाजाच्या विस्मृत आठवणींना आणि अनुभवांना स्थान मिळते. वर्तमान आणि भविष्यासाठी योग्य धडे घेता येतात.

### 5. आंतरशाखीय संशोधनाची भूमिका -

इतिहास संशोधनाला समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, भूगोल, पर्यावरणशास्त्र, मानसशास्त्र, साहित्य, ललितकला इत्यादी शास्त्रांची जोड देणे म्हणजे संशोधनात आंतरशाखीयता आणणे. यामुळे इतिहासाचे अधिक सखोल, समग्र आणि समाजोपयोगी चित्र समोर येते यालाच 'आंतरशाखीय संशोधन' म्हणतात. आधुनिक काळात इतिहासाचा अभ्यास ही एकवटलेली शास्त्रशाखा न राहता,

विविध क्षेत्रांतील ज्ञान समजून घेत समाजाचा समग्र आढावा घेणारी अभ्यास पद्धती झाली आहे. जसे, पर्यावरणीय इतिहास एखाद्या प्रदेशातील जलव्यवस्थेचा अभ्यास केवळ भूगोल किंवा पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून न करता, त्या भागातील लोकजीवन, कृषी संस्कृती आणि सत्ता रचनेवर झालेले परिणाम अभ्यासले जातात.

एखादी ऐतिहासिक घटना केवळ राजकीय नव्हे, तर सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिणामांसह समजून घेण्यासाठी इतर शाखांची मदत आवश्यक असते. इतर शाखांकडून आलेले पुरावे इतिहास संशोधन अधिक सखोल बनवतात. स्त्रिया, आदिवासी, लोकसंस्कृती, मानसिक आरोग्य, पर्यावरणीय इतिहास यासाठी मानसशास्त्र, समाजशास्त्र, पर्यावरणशास्त्र उपयुक्त ठरतात. जसे - नदी-खोरे संस्कृती, वनीकरण निती, हवामान बदलाचा इतिहास, आदिवासी समूहांचा सांस्कृतिक इतिहास, संत साहित्य, लोककथा, चरित्रग्रंथ यावरून त्या काळातील समाजजीवन समजते, युद्धांतील सैनिकांची मानसिक स्थिती, सामाजिक रूढींचा मानसिक परिणाम इत्यादीमुळे इतिहास सर्वांगीण बनतो. जुन्या घटनांकडे नव्या नजरेतून पाहण्याची संधी मिळते. आधुनिक समस्यांशी इतिहासाची सांगड घालता येते, स्मृती, भावनिक, वैद्यकीय इतिहास इ. नव्या उदयोन्मुख शाखांचा विकास.

**6. लवचिक संशोधनातील समस्या -**

लवचिक संशोधन ही एक आधुनिक संशोधन पद्धती आहे, जी पारंपरिक चौकटीबाहेर विचार करून, बदलत्या संदर्भात संकल्पना व पद्धती अंमलात आणते. विशेषतः समाजशास्त्र, इतिहास, मानवशास्त्र यांसारख्या विषयांमध्ये, जेथे संशोधन प्रक्रिया रेषात्मक न करता परिवर्तनशील असते, तेथे लवचिकता फायदेशीर ठरते. मात्र, या पद्धतीचे अनेक फायदे असले तरी काही महत्त्वाच्या अडचणी व मर्यादाही आहेत. लवचिकतेमुळे अनेक वेळा संशोधन प्रक्रियेला निश्चित चौकट, मार्गदर्शक नियम किंवा सुसंगत कार्यपद्धती नसते, ज्यामुळे संशोधन भरकटण्याची शक्यता असते. समाजातील पारंपरिक मूल्य, संस्कृती आणि नैतिकतेला मागे टाकते, जे काही वेळा असंतुलन निर्माण करते. संशोधकाचा अनुभव, व्याख्या व वैयक्तिक दृष्टिकोन यावर भर दिला जात असल्यामुळे निष्कर्ष अनेकदा व्यक्तिनिष्ठ होतात. संशोधक स्वतःच्या पूर्वानुभवांवर, विश्वासांवर किंवा दृष्टिकोनावर आधारित विश्लेषण करतो, ज्यामुळे निष्पक्षतेचा अभाव होतो.

लवचिक संशोधनात अनेक स्त्रोतांमधून, अनेक पद्धतींनी माहिती गोळा केली जाते, त्यामुळे डेटा संकलन, विश्लेषण व व्यवस्थापन गुंतागुंतीचे ठरते. प्रामुख्याने इंटरनेटवरील स्त्रोतांच्या सत्यतेबाबत प्रश्न निर्माण होतो. इंटरनेटवरील अनेक स्रोत अप्रमाणित असतात. त्यामुळे तथ्य पडताळणी गरजेची आहे. अनेक ऐतिहासिक दस्तऐवज जुन्या किंवा प्रादेशिक भाषांत आहेत. त्यामुळे अनुवादावर अवलंबून राहावे लागल्याने भाषिक अडथळे निर्माण होतात. काही इतिहास विषय हे सामाजिक, धार्मिक किंवा राजकीय दृष्टिकोनातून संवेदनशील असतात. त्यामुळे संवेदनशीलता जपून आक्षेप विरहित अभ्यास करणे आवश्यक असते. जग सतत बदलत असल्याने व्यक्तीला सातत्याने स्वतःला बदलावे लागते. ही स्थिती अनेकदा मानसिक आरोग्यावर परिणाम करते. मोठ्या प्रमाणावर लवचिक जीवन शैलीमुळे कौटुंबिक नाती, सामाजिक बंध, परंपरागत संस्था क्षीण होत जातात. सर्व समाज घटक लवचिकतेचा फायदा घेऊ शकत नाहीत. ग्रामीण, गरीब किंवा शिक्षणापासून वंचित वर्गासाठी लवचिकता ही संधी न राहता अडथळा ठरते. लवचिक संशोधन अनेक वेळा पारंपरिक शैक्षणिक व विद्यापीठीय चौकटीत बसत नाही, त्यामुळे त्याला मान्यता मिळवणे किंवा प्रकाशनाच्या दृष्टीने स्वीकृती मिळवणे कठीण जाते.

**7. लवचिकतेचा समाजावर होणारा परिणाम -**

लवचिकता म्हणजे बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला जुळवून घेण्याची क्षमता. आधुनिक समाज झपाट्याने बदलत असलेल्या तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, शिक्षण, नोकरी, कुटुंबसंस्था अशा विविध क्षेत्रांमध्ये लवचिकतेचा स्वीकार करतो आहे. इतिहास संशोधनात लवचिकता आणि पुनर्निर्मिती स्वीकारल्यास समाज अधिक भूतकाळ साक्षर बनतो. भूतकाळातील चुका समजून घेऊन भविष्यातील निर्णय अधिक जबाबदारीने घेतले जातात. यामुळे सामाजिक न्याय आणि समता यांची मूल्ये बळकट होतात. लवचिकतेमुळे समाज नव्या कल्पना, नव्या प्रणाली व नव्या जीवनशैली सहज स्वीकारतो. त्यामुळे प्रगतीचा वेग वाढतो. लिंग, धर्म, जात, वय यासारख्या परंपरागत बंधनांत अडकलेल्या समाजात लवचिकतेमुळे अधिक समावेशक दृष्टिकोन तयार होतो. लवचिक अभ्यासक्रम, दूरशिक्षण, वर्क

फ्रॉम होम, फ्रीलान्सिंग यामुळे समाजातील अनेक घटकांना समान संधी उपलब्ध होतात. लवचिकता ही घर व करिअर यामधील समतोल साधण्यास मदत करते, विशेषतः महिलांसाठी.

"आधुनिक इतिहास संशोधन आणि लवचिकता" यांचे नाते अतूट आहे. इतिहासकार फक्त भूतकाळाकडे पाहणारा नसून तो आजच्या आणि उद्याच्या समस्यांचे चिंतन करणारा विचारवंत बनला आहे. लवचिकता ही इतिहास संशोधनाला अधिक माणूसकेंद्री, समावेशक आणि अर्थवाही बनवते. इतिहास विषयाची सखोल समज आणि समकालीन उपयुक्तता वाढवण्यासाठी आंतरशाखीय संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे. इतिहासाला फक्त "भूतकाळाचा अभ्यास" न ठेवता "समाजाच्या समृद्ध समजुतीचा अभ्यास" बनवण्यासाठी ही पद्धत अत्यावश्यक ठरते.

**निष्कर्ष -**

1. इतिहास संशोधन ही एक जीवंत प्रक्रिया आहे, जी कालानुरूप बदलत राहते. पारंपरिक पुरावे आणि पद्धतींपासून सुरू झालेली ही वाटचाल, आज डिजिटल, आंतरशाखीय आणि लोकाभिमुख स्वरूप घेत आहे.
2. लवचिक संशोधन हे सर्जनशील, प्रयोगशील आणि संदर्भनिष्ठ असूनही त्यात विशिष्ट पद्धतींची अनिश्चितता, वस्तुनिष्ठतेचा अभाव आणि संरचनात्मक अडचणी आढळतात. म्हणूनच, लवचिक संशोधन करताना स्पष्ट उद्दिष्ट, पारदर्शक प्रक्रिया आणि पुराव्यांवर आधारित निष्कर्ष यांचे भान ठेवणे अत्यावश्यक ठरते.
3. लवचिकता ही आधुनिक समाजाची गरज आहे, पण ती संतुलित आणि मूल्याधिष्ठित असली पाहिजे. केवळ बदल स्वीकारणेच नव्हे तर त्या बदलांचे दूरगामी परिणाम समजून घेत समाजाला सामर्थ्यशाली आणि न्याय्य बनवणे महत्त्वाचे आहे. संशोधकाने बदलत्या परिस्थितीला अनुकूल राहून नवीन साधनांचा उपयोग करणे आवश्यक झाले आहे.
4. इतिहास संशोधनातील पुनर्निर्मिती ही एक रचनात्मक आणि समृद्ध प्रक्रिया आहे. ती इतिहासकाराच्या कल्पकतेची, चिकाटीची आणि अभ्यासाची कसोटी असते.
5. पुनर्निर्मितीमुळे इतिहास फक्त भूतकाळात अडकत नाही, तर वर्तमानाशी संवाद साधतो आणि भविष्याच्या दिशादर्शक ठरतो, जुन्या संकल्पनांना नव्या संदर्भात तपासून पाहण्याची संधी उपलब्ध होते. ही प्रक्रिया इतिहासाला अधिक समावेशक, प्रामाणिक आणि समाजोपयोगी बनवते.
6. डिजिटल इतिहास संशोधन ही काळाची गरज बनली आहे. पारंपरिक पद्धतींच्या मर्यादा पार करून, डिजिटल साधने इतिहासाला नव्याने समजून घेण्याची संधी देतात. त्यातून केवळ शैक्षणिक संशोधनच नव्हे, तर लोकशिक्षण व सांस्कृतिक जतनालाही चालना मिळते. त्यामुळे भविष्यात इतिहास संशोधनाचे स्वरूप अधिक खुलं, परस्पर संवादी आणि तंत्र स्नेही होईल, हे निश्चित आहे.
7. आजच्या काळात, इतिहास संशोधन केवळ भूतकाळात रमणारे शास्त्र न राहता, वर्तमानाचा आरसा आणि भविष्याची वाट दाखवणारे दिशादर्शक साधन ठरले आहे. त्यामुळे संशोधकांनी लवचिकतेने आणि नवोन्मेषशक्तीने सज्ज होणे काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. Burke, P., - New Perspectives on Historical Writing, Penn State University Press, 2001.
2. Chakrabarty, D., - Provincializing Europe : Postcolonial Thought and Historical Difference, Princeton University Press, 2000.
3. Foucault, M., - The Archaeology of Knowledge, Pantheon Books, 1972.
4. Guha, R., - Subaltern Studies : Writings on South Asian History and Society, Oxford University Press, 1982.
5. Presnell, J. L., - The Information-Literate Historian : A Guide to Research for History Students, Oxford University Press, 2007.
6. Thapar, R., - The Past as Present : Forging Contemporary Identities Through History, Aleph Book Company, 2003.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# शाश्वत पर्यावरण विकास काळाची गरज

**प्रा. डॉ. रमेश टिकाराम बागडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,श्री संताजी कला व विज्ञान महाविद्यालय,पालांदूर (चौ), ता. लाखनी जि. भंडारा
**Corresponding Author: प्रा. डॉ. रमेश टिकाराम बागडे**
**Email** : rtbagade१६७@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15696212**

**सारांश:**

मानव आणि पर्यावरण यांचा खूप जवळचा संबंध आहे. मानव उदरनिर्वाहासाठी पर्यावरणातील अनेक घटकांवर अवलंबून आहे. भूमी, जल, वायू, वनस्पती, प्राणी पक्षी याचा समावेश आहे. मानव आपल्या जीवनासाठी पर्यावरणातील वेगवेगळया घटकांचा वापर करुन जीवन जगत असतो. मानवाचा पर्यावरणातील हस्तक्षेप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यामुळे पर्यावरणाचे असंतुलन मोठया प्रमाणात वाढत आहे, यातून जागतिक तापमान वाढ, बदललेले ऋतुचक्र, भूकंप, दुष्काळ, पूर, वनवा, अतिवृष्टी, चक्रीवादळे, ढगफुगी अशी अनेक संकटे वारंवार निर्माण होत आहे. मानवाने औद्योगीकरणाच्या जोरावर आपला विकास करत असताना पर्यावरणाची खूप मोठया प्रमाणात हानी केली आहे. त्याचे दुष्परिणाम सर्वांना भोगावे लागत आहे. म्हणून मानवी विकासाबरोबर पर्यावरण संतुलन कसे राखले जाईल. सध्या पर्यावरणाशी निगडित समस्या सोडवण्यासाठी व त्यावर उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये पर्यावरणाचे महत्व, पर्यावरणामुळे निर्माण झालेल्या समस्या आणि शाश्वत पर्यावरण विकास याविषयी विचार व्यक्त करण्यात आले आहेत.

**बिजशब्द:** पर्यावरण, पर्यावरणाचे असंतुलन, शाश्वत पर्यावरण, संतुलन, विकास

**प्रस्तावना:**

आधुनिक काळात गेल्या दोन दशकापासून औद्योगीकरण प्रचंड वेगाने होत आहे. विकासाबरोबर लोकसंख्या शहरीकरण पर्यारवरणात हस्तक्षेप वाढला आहे. यामुळे आर्थिक दृष्टया संपन्न बनत असताना पर्यावरणाचा ऱ्हास मोठया प्रमाणात झाला आहे. अमेरिका व युरोपमध्ये औद्योगिकीरणामुळे पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. विकसित राष्ट्रांत नाही पर्यावरणाचे असंतुलन मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे मानव विरुध्द पर्यावरण असा प्रश्न उभा राहिला आहे. आर्थिक विकास साधत असताना पर्यावरणाची हानी होते आणि हे थांबविणे आज गरजेचे बनले आहे. सन 2022 जनगभरातील 180 देशांचा पर्यावरण कामगिरी निर्देशांक जाहीर करण्यात आला. अमेरिकेतील पर्यावरण कायदा, आंतरराष्ट्रीय पृथ्वी विज्ञान माहिती नेटवर्क केंद्र आणि कोलंबिया विद्यापीठ यांनी जाहीर केलेल्या यादीत डेन्मार्क ने पहिला क्रमांक मिळवला आहे त्या खालोखाल ब्रिटन, फिनलँड दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहे. यामध्ये भारत सगळयात शेवटी 180 व्या क्रमांकावर निश्चांकी 18.9 गुण मिळवून आहे भारतात देखील पर्यावरण असंतुलन गंभीर समस्या बनली आहे. भारतीय हवेचा दर्जा धोकादायक असून वेगाने वाढणाऱ्या हरितगृह वायूंच्या उत्सर्जनामुळे भारत 180 च्या क्रमांकावर आहे असे हया अहवालात दिसून येते ही बाब भारतासाठी निश्चितच चिंताजनक आहे एकंदरीत पर्यावरणातील असंतुलनामुळे अनेक समस्या निर्माण होत आहे या समस्या मानवी जीवनात अडथळे निर्माण करुन शारीरिक व मानसिक विकासावर परिणाम करत आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टये:**

1) पर्यावरण अभ्यासाचे महत्व जाणून घेणे.
2) पर्यावरण असंतुलनामुळे निर्माण झालेल्या समस्या जाणून घेणे.
3) शाश्वत पर्यावरण संकल्पना समजून घेणे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला असून यामध्ये पुस्तके, शोध

निबंध, मासिके, इंटरनेटचा वापर करुन अभ्यास करण्यात आला आहे.

**गृहीतके:**

1. मानवी जीवनाच्या विकासासाठी पर्यावरण संवर्धन करणे गरजेचे आहे.
2. पर्यावरणातील असंतुलनामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.
3. शाश्वत विकासातून पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे गरजेचे आहे.

**पर्यावरण अभ्यासाचे महत्व :**

पर्यावरणाचा अभ्यास करताना पर्यावरणातील वेगवेगळया घटकांचा सखोल आणि सविस्तर अभ्यास केला जातो. यावरुन पर्यावरणाचे संतुलन साध्य करुन मानवी जीवनसमृध्द कसे करता येईल याचा विचार पर्यावरण अभ्यासातून दिसून येतो. पर्यावरणीय अभ्यासामुळे पर्यावरण संतुलन साधण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात याची माहिती आपण घेऊ शकतो. मानवी हस्तक्षेपाच्या मर्यादा समजतात. नामशेष होणाऱ्या वनस्पती प्राण्यांची माहिती समजते. नैसर्गिक आपत्तीवर उपाय शोधण्यास मदत होते. उपलब्ध साधन संपत्तीचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करता येते. मानवनिर्मित आपत्तीच्या पर्यावरणातील परिणामाचे ज्ञान होते यामुळे जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी, शेतीला आधार देण्यासाठी आणि लाखो लोकांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी भारतीय पर्यावरण अत्यंत महत्वाचे आहे. पर्यावरण अभ्यासाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. शाश्वत विकास आणि भावी पिढयांसाठी भारताच्या पर्यावरणाचे रक्षण करणे अत्यंत महत्वाचे आहे.

**पर्यावरणातील असमतोलामुळे निर्माण झालेल्या समस्या**

**1) तापमान वाढ :**

जागतिक तापमानात दीड अंश सेल्सिअस वाढ झाली तर त्याचे सर्वाधिक परिणाम जगातल्या दुर्बल आणि वंचितांना भोगावे लागणार आहेत कारण अन्नधान्याची टंचाई, महागाई, बेरोजगारी, उपजीविकेच्या संधी गमावणे, आरोग्याच्या समस्या आणि स्थलांतर अशा संकटांना या घटकांना तोंड द्यावं लागेल. भारताची लोकसंख्या मोठी आहे. शिवाय इथे गरिबी आणि विषमताही मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे जागतिक तापमानवाढीचे मोठे परिणाम भारताला भोगावे लागतील. तापमान वाढीमुळे समुद्राच्या पातळीत वाढ होत आहे तसेच उष्माघाताचे बळी जाण्याचे प्रमाण देखील वाढले आहे. जागतिक तापमानवाढीमुळे 2041 सालापर्यंत 1.80 टक्के पीकांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे तर 2080 पर्यंत 23.60 टक्के घट होण्याची शक्यता आहे.

**2) प्रदूषण वाढ :**

भारतात 93 टक्के भूभागावर जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेल्या गाईडलाईन्सपेक्षा जास्त प्रदुषण असलयचं स्पष्ट आहे. 2019 साली जगभरातील इतर देशांची तुलना करता प्रदूषणामुळे भारतात सर्वाधिक मृत्यु झाले आहेत. भारतात प्रदूषणामुळे दरवर्षी 23.5 लाख मृत्यू होतात. त्यापैकी 16.7 लाख मृत्यू हे हवा प्रदूषणामूळे होतात. जवळपास 5 लाख मृत्यू हे जल प्रदूषणामुळे होतात. गंगेच्या खोऱ्यातील प्रदेशामध्ये हवा प्रदूषणाची पातळी ही तीव्र आहे. जगभरातील 100 शहरांमध्ये भारतातील 63 शहरांचा समावेश आहे. यामुळे भारताचे दरवर्षी 11.5 लाख कोटी रुपयांचे नुकसान होते.

**3) मृदा धूप :**

मानवाचा विकास व अस्तित्वासाठी मृदा अत्यंत महत्वाची संपत्ती आहे. शेतीसाठी मानवी वसाहतीसाठी उद्योगधंदे, व्यवसाय, वाहतूक इत्यादीसाठी महत्वाची आहे. परंतु या भूसंपदेचा मोठया प्रमाणावर अतिवापर केल्यामुळे जमिनीची झीज होत आहे. यालाच मृदेची धूप होणे असे म्हणतात. मृदेची धूप झाल्यामुळे जमिनीचा वरचा स्तर ऊन, वारा, पाऊस यामध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात आहे. परिणामी जमिनीची धूप वेगाने होते. जंगलतोड, अतिचराई, अयोग्य शेती पध्दती यामुळे मृदा धूप होण्याचे प्रमाण जास्त आहे. मृदेची धूप झाल्यामुळे जमिनीच्या सुपीकतेत घट होते. नदी पात्र उथळ बनते, भूजल पातळी कमी होते, जमिनीची उत्पादकता घटते, धरणांची साठवण क्षमता कमी होते. पर्यावरणाचा समतोल ढासळतो.

**4) निर्वनीकरण :**

मानवाने स्वत:च्या फायद्यासाठी केलेल्या जंगलतोडीमुळे निर्वणीकरणाची समस्या निर्माण झाली आहे. घरे बांधणी रस्ते, वाढत्या लोकसंख्येला धरण बांधणे, कागद उद्योगासाठी, शेतीविस्तारासाठी मानवाने वनांचा ऱ्हास केला आहे. परंतु नव्याने वृक्ष लागवड करत नाही. त्यामुळे निर्वनीकरणाच्या समस्या निर्माण झाल्या आहे. परिणामी

पाण्याची कमतरता नद्यांना पूर, मृदा धुप, वन्यजीवांचा विनाश, वाळवंटीकरण इत्यादी गंभीर समस्या निर्माण झाले आहे. जगभरात दरवर्षी दहा दशलक्ष हेक्टर पेक्षाही अधिक जंगलतोड होते आणि त्याचा विपरीत परिणाम पर्यावरणावर झाला आहे. देशातील वाढते वाळवंटीकरण रोखण्याच्या उद्देशाने, भारताने 2030 पर्यंत 2.10 कोटी हेक्टर जमिनीवर सुपीकीकरण करण्याचे उद्दिष्ट 2.60 कोटी हेक्टरपर्यंत वाढवले आहे. तसेच वाढत्या वाळवंटीकरणाला रोखण्यासाठी भारताने 2015 ते 2017 दरम्यान देशातील वृक्ष आणि वनक्षेत्र 8 लाख हेक्टरने वाढवले आहे.

**5) ओझोनचा क्षय :**

पृथ्वीच्या वातावरणात असलेला ओझोन थर जीवसृष्टी रक्षक आहे. ओझोन नैसर्गिक रित्या तयार होत असतो आणि निसर्गत: काही प्रमाणात नष्टही होत असतो. वातावरणातील क्लोरोफ्लोरो कार्बन वायुंचे प्रमाण वाढलयामुळे ओझोन थरास विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून आले. ओझोन कमी झाल्यामुळे सूर्याची अतिनील किरणे मानवी जातीसाठी हानिकारक ठरणार आहे. म्हणून ओझोनचा ऱ्हास होण्यापासून प्रतिबंध करणे खूप गरजेचे आहे. कारण यामुळे दिवसेंदिवस तापमान वाढ होत असल्याचे दिसून येते.

**6) हवामान बदल :-**

आजच्या पर्यावरणीय समस्यांमधील हवामान बदल हा सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे. गेल्या काही दशकांमध्ये नैसर्गिक अधिवासाचा नाश, जागतिक तापमानवाढ, लोकसंख्या वाढ आणि प्रदूषण यामुळे हवामान बदल वाढला आहे. पृथ्वीचे तापमान वाढवणारे हरितगृह वायू हे हवामान बदलाचे प्रमुख कारण आहेत. पर्यावरणीय बदलांमुळे हिमनद्या वितळणे, ऋतूंमध्ये बदल, साथीचे रोग इत्यादी विनाशकारी परिणाम होतात. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीवरील ऋतुचक्र व हवामानात मोठे बदल झाले आहेत. पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा या ऋतुचक्रात बदल झाला आहे. अल-निनो, ला-निनोच्या सतत प्रभावामुळे जगभरातील दैनंदिन हवामानावर प्रभाव पडला आहे. तापमान वाढ ही ऋतुचक्र व हवामानावर परिणाम करते. त्यामुळे अति पाऊस, ढगफुटी, वादळे, महापूर, थंडी आणि उष्णतेची लाट व रोगराई अशा अनेक नैसर्गिक संकटांना आज सर्वच देशांना सामना करावा लागतो.

**शाश्वत पर्यावरण विकास :-**

शाश्वत विकासामध्ये पर्यावरणाला विशेष महत्वाचे स्थान आहे. शाश्वत विकासाची ध्येय क्रमांक 13 मध्ये पर्यावरण व हवामान बदल त्यांचे दुष्परिणाम यांचा सामना करण्यासाठी कृती कार्यक्रम आखण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच ध्येय पंधरा मध्ये जमिनीवरील पर्यावरणाचे संरक्षण पुनर्वसन शाश्वत वापरात प्रोत्साहन देणे, वाळवंटीकरण थांबविणे, वनाचा ऱ्हास थांबविणे, जैवविविधतेचा ऱ्हास थांबविणे यावर भर देण्यात आला आहे. नैसर्गिक संसाधनांचे रक्षण, संवर्धन करणे, अक्षय ऊर्जाचा वापर करणे, जंगल लागवड करणे इत्यादी पर्यावरण विषयक बाबी महत्वाच्या आहेत. आपल्या भावी पिढयांच्या गरजा भागवण्यासाठी निसर्गाला हानी न पोहचविता आजच्या गरजा पूर्ण करणे हे मानवाचे कर्तव्य आहे. परंतु मानवाने अविविकीपणाने पर्यावरणाचा ऱ्हास केला आहे. त्यामुळे मानवाच्या अस्तित्वाला पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. म्हणून नैसर्गिक साधन संपत्तीचा जपून वापर करणे प्रदूषण कमी करणे हे महत्वाचे आहे. आर्थिक विकास व औद्योगिक विकास साध्य करताना पर्यावरण संतुलनाचे भान ठेवून शाश्वत विकास घडवून आणण्याची अत्यंत गरज आहे. आर्थिक विकास करत असताना पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कमी होईल.

शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यास निश्चितच मदत होणार आहे. यासाठी पर्यावरण जनजागृती कार्यक्रम आखणे गरजेचे आहे. पर्यावरण संतुलनासाठी सामाजिक घटकांनी वेगवेगळया पातळीवर काम केल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली चिपको आंदोलन झाले, महाराष्ट्रात पश्चिम घाट बचाव चळवळ सुरु करण्यात आली. कर्नाटक मध्ये आपिको झाले. पर्यावरण संवर्धनात समाजाचे योगदान फार मोठे आहे. महाराष्ट्रातील समाजसुधारक अण्णा हजारे यांचा राळेगण सिध्दीचा पाणी अडवा पाणी जिरवा हा प्रयोग यशस्वी झाला आहे. तसेच मेधा पाटकर, पोपटराव पवार, बाबा आमटे यांच्यासारख्या व्यक्तींच्या कृतीमधून पर्यावरण शाश्वत विकासासाठी कार्य झाल्याचे दिसून येते. शाश्वत विकास करण्यासाठी मानवाने निसर्ग नियमांच्या अधीन राहून निसर्गाला धक्का न पोहोचता नैसर्गिक साधन

संपत्तीच्या मदतीने स्वत:चा विकास करावा यासाठी पुढील बाबींचा अवलंब करणे गरजेचे आहे.

1. जंगल लागवड करणे.
2. सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे.
3. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणणे.
4. हवा, जल, ध्वनी, कचरा, जमीन इत्यादी प्रदूषण नियंत्रित करणे.
5. पर्यावरण कायद्याचे पालन करणे.
6. पाण्याचा काळजीपूर्वक वापर करणे.
7. सुनियोजित शहरीकरण करणे.

वरील सर्व बाबींचे अनुकरण केल्यास शाश्वत विकासाच्या माध्यमातून पर्यावरण संतुलन साधले जाऊ शकते.

**निष्कर्ष :**

मानवाने आर्थिक विकासाच्या घोडदोडीत पर्यावरणाकडे दुर्लक्ष केल्याने पर्यावरणीय प्रश्न गंभीर झाले आहे. एका बाजुला विकास प्रकल्प आणि दुसऱ्या बाजूला त्याचे पर्यावरणावर होणारे परिणाम अत्यंत घातक आहेत. म्हणून मानवाने पर्यावरणाची मोठया प्रमाणावर हानी होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी शाश्वत विकासाच्या माध्यमातून पर्यावरणाची गुणवत्ता राखण्याकडे लक्ष देणे आज काळाची गरज बनली आहे.

**संदर्भ :**

1) डॉ. लक्षटे रत्नाकर (2016) “पर्यावरणीय व्यवस्थापन आणि मानवी हक्कांचे संरक्षण”, Current global reviewr ISSN २३१९-८६४८
2) डॉ. प्र. द. राऊत “पर्यावरण अभ्यास” शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3) श्री. पठान आर. एम. (2019) “भारतीय पर्यावरण विषयक समस्या” Review of research
4) indiatimes.com/editor
5) https://ncert.nic.in
6) https://www.geojurnal.net
7) https://wwwloksatta.com/about/environment-and-disaster-management/news/page/४/
8) https://www.loksatta.com/navneet/article-on-sustainable-development-and-india-abn-९७-२३६३१६०/
9) https://www.mlsu.ac.in/econtents/१८१_Development%२०and%२०environment%२०(Development%२०administration%२०vi).pdf

**प्रा. डॉ. रमेश टिकाराम बागडे**

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# स्त्री सक्षमीकरण आणि समतोल समाजनिर्मिती

**श्री. सचिन विठ्ठल वायले[1], डॉ. चंद्रकांत गोंधळी[2]**
[1]संशोधक विद्यार्थी -डिपार्टमेंट ऑफ सिविक्स अँड पॉलिटिक्स, मेहताभवन,मुंबई विश्वविद्यालय
[2]कोकण ज्ञानपीठ कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, कर्जत
**Corresponding Author: श्री .सचिन विठ्ठल वायले**
**Email:-** Sachinvayle1980@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15696551**

**सारांश:**

पृथ्वीवरील मानवसमूहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे असे दिसून येत आहे .मानवी हक्कांविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारांत मान्यता मिळूनही, स्त्रिया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. स्त्रियांना हतोत्साहित करणारे वर्तन करून, त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्वाची वागणूक स्त्रीजातीला मिळत राहिली आहे.वैद्यकीय सुविधा, मालमत्तेची मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते. त्या पुरुषांच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या सक्रिय असण्याची शक्यता फारच कमी आहे, आणि त्या घरगुती हिंसाचाराचा बळी होण्याची शक्यता खूपच मोठी आहे. स्त्रियांची मानसिकता बदलणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात स्त्रिया अजूनही स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत. तेथे त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात.महिलांनी फक्त 'चूल आणि मूल' याकडेच लक्ष दिले पाहिजे असे अनेक जणांना वाटते, पण आता महिलांनी चुला आणि मुलासोबतच 'देश आणि विदेश' यांकडेसुद्धा लक्ष देण्याची गरज आहे. स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती आणि त्याचे सुचालन करणे आणि लैंगिक समतेद्वारे समाजाचे संतुलन साधणे यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोन केलेली कृती यांचा समुच्चय म्हणजे स्त्री सक्षमीकरण . घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत, याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजे, प्रबोधन झाले पाहिजे. संयुक्त राष्ट्रांनी निश्चित केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यासाठी जग प्रयत्नशील असताना , महिलांचे सक्षमीकरण हे एक न्याय्य, अधिक लवचिक समाज निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक म्हणून उदयास येत आहे. भारतात, जिथे जलद शहरीकरण आणि सामाजिक विषमता एकत्र अस्तित्वात आहेत, देशाच्या शाश्वत विकासासाठी महिला सक्षमीकरणाला चालना देणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनामुळे केवळ महिलांनाच फायदा होत नाही तर संपूर्ण समुदायांना बळकटी मिळते, ज्यामुळे आरोग्य, शिक्षण, आर्थिक स्थिरता आणि पर्यावरणीय लवचिकता या क्षेत्रात सुधारणा होतात.

**पारिभाषिक शब्द :**महिला सक्षमीकरण, शाश्वत विकास, आर्थिक सबलीकरण, लैंगिक समानता

**प्रस्तावना:**

महिला सक्षमीकरणाचा इतिहास एका निश्चित तारखेपासून सुरू होत नाही, ती एक संचित प्रक्रिया आहे. तथापि, काही चळवळी, निषेध, क्रांती आहेत ज्यांनी महिला सक्षमीकरणाच्या कारणाला अधिक जलद गतीने पुढे नेले.भारतातील महिला सक्षमीकरण आणि लिंग समानतेचा मार्ग हा लवचिकता, संघर्ष आणि आशेचा प्रवास आहे. लिंग असमानता दूर करण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी झाली असली तरी, खोलवर रुजलेली पितृसत्ता नष्ट करण्याचा आणि खऱ्या अर्थाने भारतात महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता साध्य करण्याचा प्रवास अजूनही कठीण आहे.संतुलित जगाच्या संदर्भात महिला सक्षमीकरण, शाश्वत विकास आणि आरोग्य ही थीम गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय चर्चेत आहे. स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील वैयक्तिक कार्यकर्ते, समुदाय तसेच संघटना आणि सरकारे यांनी महिला आणि संपूर्ण समाजासाठी सकारात्मक परिणाम साध्य करण्यासाठी एकाच वेळी किंवा वेगवेगळ्या

वेळी आपापल्या आवाज उठवला आहे.आधुनिक जगाचा विचार केल्यास समतोल समाजनिर्मितीसाठी स्त्री सक्षमीकरण होणे अपरिहार्य आहे. कारण मानवी समूहात स्त्रीयांचा हिस्सा जवळपास निम्मा आहे. म्हणून कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा देणे, विकासाठी संधी उपलब्ध करून देणे, आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करत महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्याची आज गरज आहे. स्त्री सक्षमीकरणाच्यासंदर्भात पंडित जवाहरलाल नेहरु म्हणाले होते की, लोकांना जागृत करण्यासाठी महिलांनी जागृत होणे आवश्यक आहे. एकदा तिने पाऊल टाकले की कुटुंब पुढे सरकते, गाव पुढे सरकते आणि देश विकासाकडे जातो. तसेच भारतात महिलांच्या सक्षमीकरणासाठी सर्वप्रथम समाजातील हुंडा प्रथा, निरक्षरता, लैंगिक हिंसा, असमानता, भ्रूणहत्या, महिलांवरील घरगुती हिंसाचार, बलात्कार, यांसारख्या समाजातील त्यांचे हक्क आणि मूल्ये मारून टाकणाऱ्या सर्व राक्षसी विचारांना मारल्यानंतरच खऱ्या अर्थाने स्त्रीया सक्षम ठरू शकतील.शाश्वत विकास हा सामाजिक विकास, आर्थिक विकास, पर्यावरण संरक्षण आणि सांस्कृतिक विविधतेचे जतन या चार स्तंभांवर आधारित आहे. आपण महिला सक्षमीकरण किंवा लिंग समानतेला सामाजिक विकासाशी जोडतो आणि जागतिक विकासात महिला आणि नैसर्गिक संसाधनांचे योगदान या दोघांसाठीही जबाबदारी कमी होत राहते. म्हणूनच, महिलांच्या बेहिशेबी काम आणि नैसर्गिक संसाधनांमध्ये मला आढळणारी पहिली समानता म्हणजे त्यांना देणगीदार म्हणून चित्रित केले जाते, परतावा मागत नाही किंवा अनंत सेवांचा स्त्रोत म्हणून चित्रित केले जाते ज्यांचा अनेकदा हिशेब दिला जात नाही. काम, अर्थव्यवस्था, पर्यावरण यातील स्त्रीत्वाच्या स्पर्शाची ओळख इच्छित नाही तर आवश्यक आहे आणि असमानता केवळ राष्ट्राच्या विकासावर परिणाम करत नाही तर निसर्गाच्या संतुलनावर देखील परिणाम करते.

**उद्दिष्टे :**

१.भारतात स्त्रियांच्या अधिकारासाठी झालेले विविध संशोधन आणि धोरणे यांचा अभ्यास करणे.

२. भारतातातील लैंगिक समानता आणि शाश्वतता यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम पद्धतीचा वापर केला आहे. दुय्यम पद्धतीचा भाग म्हणुन विविध ग्रंथ ,मासिके ,विषयाशी संबंधित शोधनिबंध ,साहित्य ,शासकीय अहवाल ,इंटरनेट याद्वारे माहिती एकत्रित करण्यात आली आहे.

**विषयाची मांडणी:**

**व्याख्या:**

१. कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासाठी संधी उपलब्ध करून देणे, आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात.

२. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेली संसाधने, संधी आणि आत्मविश्वास प्रदान करण्याची प्रक्रिया. हे सामाजिक अडथळे दूर करण्यावर आणि शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि राजकारण यासारख्या जीवनाच्या विविध क्षेत्रात महिलांना समान हक्क आणि संधी सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करते.

**स्त्री सक्षमीकरणाचे घटक :**

१. महिलांना त्यांची वैयक्तिक आणि व्यावसायिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संसाधने, संधी आणि आत्मविश्वास देणे.

२.महिलांना भेदभाव आणि हिंसाचारापासून मुक्त करणे.

३.महिलांना सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात पूर्णपणे सहभागी होण्याची क्षमता देणे.

४.महिलांना शिक्षण, आरोग्यसेवा आणि कायदेशीर सेवांमध्ये प्रवेश देणे.

५.महिलांना त्यांचे हक्क आणि स्वातंत्र्य वापरण्याची क्षमता देणे.

**स्त्री सक्षमीकरणाचे महत्त्व:**

१.महिलांच्या कल्याणासाठी आवश्यक आहे.

२.कृषी उत्पादन, अन्न सुरक्षा, आहार आणि बाल पोषण यावर सकारात्मक परिणाम होतो.

३.कुटुंबाच्या विकासात स्त्रियांचे खूप महत्व आहे.

४.महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक आणि राजकिय दर्जात वाढ होते.

**भारतातील महिला सक्षमीकरणाचा इतिहास :**

भारतीय समाज नेहमीच महिलांचा आदर करतो आणि देशभरात सरस्वती, दुर्गा, लक्ष्मी, काली इत्यादी अनेक देवतांची पूजा केली जाते. तथापि, वैदिक काळापासून पुरुषांच्या बाजूने चालीरीती आणि परंपरा असलेल्या पितृसत्ताक व्यवस्था प्रचलित आहे.भारतीय इतिहासात गार्गी, मैत्रेयी आणि सुलभा सारख्या अनेक अद्भुत महिलांचा उल्लेख आढळतो, त्याचप्रमाणे आपल्या देशाच्या विविध भागात प्रभावतीगुप्ता आणि राणी दुर्गावती सारख्या महिला शासक झाल्या आहेत.दुसरीकडे, प्राचीन काळापासून महिलांविरुद्ध भेदभाव होत असल्याने, महिला मूकपणे पीडित राहिल्या आहेत. भारतात महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लिंग समानतेसाठी संघटित प्रयत्नांची सुरुवात १९ व्या शतकातील सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींपासून होते.राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर यांसारख्या समाजसुधारकांनी आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांनी केलेल्या प्रयत्नांमुळे भारतात लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरणाला चालना मिळाली. २० व्या शतकाच्या सुरुवातीला महिला संघटनांच्या स्थापनेसह महिलांच्या हक्कांच्या मागणीचे क्षितिज वाढले.भारत महिला परिषद, महिला भारतीय संघटना, अखिल भारतीय महिला परिषद इत्यादी महिला संघटनांनी भारतातील लिंग असमानतेचा मुद्दा उपस्थित केला आणि महिलांना मताधिकार आणि वारसा हक्कांची मागणी केली. गांधीजींनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महिलांच्या सामूहिक एकत्रीकरण आणि सहभागावर विशेष भर दिला. त्यांनी महिलांना राजकीय स्वातंत्र्यासाठी तसेच त्यांच्या सामाजिक आणि राजकीय हक्कांसाठी लढण्यास प्रोत्साहित केले. १९७० नंतर, भारतात महिला सक्षमीकरण आणि लिंग समानतेच्या चळवळीचे नूतनीकरण झाले.

**भारतातील महिला सक्षमीकरण आणि लिंग समानतेसाठी संवैधानिक तरतुदी:**

१.कलम १४ महिलांसह सर्व नागरिकांना कायद्यासमोर समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण देण्याची हमी देते.

२.कलम १५(१) केवळ लिंगाच्या आधारावर भेदभाव करण्यास मनाई करते.

३.कलम १५(३) राज्याला महिलांच्या सामाजिक-आर्थिक आणि राजकीय तोटे कमी करण्यासाठी त्यांच्या बाजूने सकारात्मक भेदभाव करण्याची परवानगी देते.

४.कलम १६ मध्ये राज्याच्या अंतर्गत कोणत्याही पदावर नोकरी किंवा नियुक्तीच्या बाबतीत महिलांसह सर्व नागरिकांना समान संधीची तरतूद आहे. तसेच ते केवळ लिंगाच्या आधारावर राज्याच्या अंतर्गत कोणत्याही नोकरी किंवा पदासाठी भेदभाव करण्यास किंवा अपात्र ठरवण्यास प्रतिबंध करते.

५.जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या संरक्षणाची तरतूद करणाऱ्या कलम २१ मध्ये अनेक अधिकार आहेत, ज्यात महिलांना सभ्यता आणि सन्मानाने वागवण्याचा अधिकार समाविष्ट आहे.

६.कलम २३ मध्ये मानवी वाहतुकीला मनाई आहे, ज्यामध्ये महिलांची विक्री आणि खरेदी, महिलांची अनैतिक वाहतूक, वेश्याव्यवसाय इत्यादींचा समावेश आहे.

राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वे

७.कलम ३९ राज्याला पुरुष आणि महिलांना समान कामासाठी समान वेतन मिळवून देण्याचे निर्देश देते.

८.कलम ४२ राज्याला कामाच्या न्याय्य आणि मानवीय परिस्थिती आणि मातृत्व मदतीसाठी तरतूद करण्याचे निर्देश देते.

९.कलम ४४ राज्याला देशभरातील सर्व नागरिकांसाठी एकसमान नागरी कायदा सुरक्षित करण्याचे निर्देश देते. अशा कायद्यामुळे विवाह, घटस्फोट, वारसा इत्यादी वैयक्तिक बाबींमध्ये महिलांना समान अधिकार मिळतील.

१०.कलम ४५ मध्ये राज्याला सर्व मुलांना, ज्यामध्ये मुलींचाही समावेश आहे, सहा वर्षांचे होईपर्यंत बालपणीचे संगोपन आणि शिक्षण देण्याचे निर्देश दिले आहेत.

११.कलम ५१अ मध्ये प्रत्येक नागरिकावर महिलांच्या प्रतिष्ठेला अपमान करणाऱ्या प्रथांचा त्याग करण्याचे मूलभूत कर्तव्य आहे.

१२.कलम ५१अ मध्ये प्रत्येक पालक/पालकांवर त्यांच्या सहा ते चौदा वयोगटातील मुलाला किंवा पाल्याला शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याची मूलभूत जबाबदारी देखील आहे.

**भारतातील महिला सक्षमीकरण आणि लिंग समानतेसाठी सरकारी योजना:**

**१.महिलांचे एकूण सक्षमीकरण**

महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरणा च्या माध्यमातून महिलांची सर्वांगीण प्रगती, विकास आणि सक्षमीकरण घडवून आणणे ,महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय अभियान (NMEW) अंतर्गत महिलांच्या सर्वांगीण विकास आणि सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणाऱ्या एकूण प्रक्रियांना बळकटी दिली जाते तसेच लिंग बजेटिंगच्या माध्यमातून भारतात लिंग समानता आणि महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी लिंग बजेटिंग राबविले जात आहे.

**२.महिलांचे सामाजिक-सांस्कृतिक सक्षमीकरण**

बेटी बचाओ बेटी पढाओ या योजनेतुन बाल लिंग गुणोत्तर सुधारणे आणि मुलींचे शिक्षण आणि सक्षमीकरण सुनिश्चित करणे ,माध्यमिक शिक्षणासाठी मुलींना प्रोत्साहन देण्याची राष्ट्रीय योजना राबवून माध्यमिक शाळांमध्ये मुलींच्या नोंदणीला प्रोत्साहन देणे आणि १८ वर्षांपर्यंत त्यांना शाळेत टिकवून ठेवणे यावर लक्ष केंद्रित करते.प्रधानमंत्री आरोग्य सुरक्षा योजना यातून महिला आणि मुलींना दर्जेदार आरोग्य सेवांचा लाभ मिळण्यास मदत करते,वन स्टॉप सेंटर ही केंद्रे हिंसाचाराने पीडित महिलांना एकात्मिक समर्थन सेवा प्रदान करतात,निर्भया निधीच्या माध्यमातून महिलांच्या सुरक्षिततेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी हा निधी स्थापन करण्यात आला आहे.

**३. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण**

स्टँड अप इंडिया योजनेतुन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अल्पसंख्याक समुदायातीलमहिलांना बँक कर्ज देऊन उद्योजकतेला प्रोत्साहन देते.तर प्रधानमंत्री जन धन योजना तुन महिलांना मूलभूत बँकिंग सेवा उपलब्ध करून देणे, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक समावेशाला चालना मिळते.महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमला पाठिंबा दिल्याने महिलांना स्वयंरोजगार/उद्योजक बनण्यास सक्षम करणारी कौशल्ये प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे,महिला ई-हाटच्या माध्यमातून महिला उद्योजकांसाठी एक ऑनलाइन मार्केटिंग प्लॅटफॉर्म उपलब्ध होत आहे.

**४.महिलांचे राजकीय सक्षमीकरण**

प्रशिक्षण आणि क्षमता निर्माण कार्यक्रमच्या माध्यमातून सरकारी आणि गैर-सरकारी संस्थांनी हाती घेतलेल्या विविध उपक्रमांचा उद्देश महिलांना प्रभावी राजकीय सहभागासाठी कौशल्ये आणि ज्ञानाने सुसज्ज करणे आहे.तसेच महिला नेतृत्व विकास कार्यक्रमातुन राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायतीराज संस्था सारख्या सरकारी संस्था महिलांना कौशल्य-निर्मिती कार्यक्रम देतात, जे नेतृत्व आणि राजकीय सहभाग विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करतात.

**महाराष्ट्र शासनाने स्त्री-सक्षमीकरणासाठी राबवलेल्या विविध योजना:**

महाराष्ट्र शासनाने १९९४मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वंयसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वंयसाहाय्यता बचतगटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय-निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थात ५० टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण-प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात.

**महिला सक्षमीकरण आणि लिंग समानतेसाठी सुचवलेले उपाय:**

**१. शिक्षण**

महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण हे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. जेव्हा मुली शिक्षित होतात तेव्हा त्यांना त्यांच्या स्वप्नांचे अनुसरण करण्याचा आणि स्वतःचे निर्णय घेण्याचा आत्मविश्वास मिळतो. याचा फायदा केवळ त्यांनाच नाही तर त्यांच्या कुटुंबांना आणि समुदायांनाही होतो. भारतातील बेटी बचाओ बेटी पढाओ सारखे कार्यक्रम कुटुंबांना त्यांच्या मुलींना शिक्षण देण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत, ज्यामुळे त्यांच्यासाठी मोठ्या गोष्टी साध्य करण्याचे दरवाजे उघडत आहेत.

**२. आर्थिक स्वातंत्र्य**

भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय, इ. क्षेत्रांत काम करत असतात. पैसा स्वातंत्र्य देतो आणि जेव्हा महिला स्वतःचे पैसे कमवतात तेव्हा त्या स्वतःच्या अटींवर जीवन जगू शकतात. अनेक महिला व्यवसाय सुरू करत आहेत, कामाच्या ठिकाणी सामील होत आहेत आणि प्रत्येक क्षेत्रात त्यांची योग्यता सिद्ध करत आहेत. समान वेतन, कौशल्य प्रशिक्षण आणि महिला उद्योजकांना पाठिंबा यामुळे महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यास मदत होत आहे.

**३. सामाजिक अडथळे तोडणे**

सक्षमीकरण म्हणजे महिलांना मागे ठेवणाऱ्या अन्याय्य परंपरा आणि नियम तोडणे. हुंडा, बालविवाह आणि लिंगभेद यासारख्या प्रथा बंद झाल्या पाहिजेत. सक्षम महिलांना या नियमांना आव्हान देण्यासाठी आणि बोलण्यासाठी आत्मविश्वास वाटतो. सुरक्षित आणि समर्थ समाज निर्माण करणे हा सामाजिक सक्षमीकरणाचा एक मोठा भाग आहे.

**४. कुटुंब आणि समाजाची भूमिका**

सक्षमीकरणाची सुरुवात घरापासून होते. जेव्हा कुटुंबे त्यांच्या मुली, पत्नी आणि बहिणींना आधार देतात तेव्हा ते त्यांना त्यांच्या क्षमतांचा शोध घेण्यास प्रोत्साहित करते. मुला-मुलींना समान वागणूक देणारे पालक सक्षम व्यक्तींचा पाया रचतात. याव्यतिरिक्त, समाजाने समावेशकतेला प्रोत्साहन दिले पाहिजे, ज्यामुळे महिलांना निर्णय किंवा पक्षपाताची भीती न बाळगता पुढे जाण्याची परवानगी मिळेल.

**निष्कर्ष:**

महिला सक्षमीकरण ही केवळ नैतिक अत्यावश्यकता नाही तर एक धोरणात्मक अट देखील आहे. महिलांना भरभराटीचे वातावरण निर्माण करून, समाज विकास आणि नवोन्मेषासाठी प्रचंड क्षमता उघडू शकतो. शिक्षणापासून ते आर्थिक स्वातंत्र्यापर्यंत, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले प्रत्येक पाऊल अधिक समतापूर्ण आणि समावेशक जगाचा मार्ग मोकळा करते.महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ महिलांना मदत करणे नाही; तर ते जगाला सर्वांसाठी एक चांगले स्थान बनवण्याबद्दल आहे. एक सक्षम महिला केवळ तिचे जीवनच बदलत नाही तर तिच्या कुटुंबाचे कल्याण करते आणि समाजात योगदान देते.भारतातील महिला सक्षमीकरण समाजात समानता आणि प्रतिष्ठा सुनिश्चित करण्यासाठी महिलांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दर्जा वाढविण्यावर लक्ष केंद्रित करते.शिक्षण, आरोग्यसेवा आणि आर्थिक स्वातंत्र्याला प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांमध्ये लिंग-आधारित हिंसाचार, कामाच्या ठिकाणी भेदभाव आणि असमानता यांना संबोधित करणारे कायदे यांचा समावेश आहे.बेटी बचाओ, बेटी पढाओ, बचत गट आणि आरक्षण धोरणे यासारख्या उपक्रमांचा उद्देश महिलांना सक्षम बनवणे आणि त्यांना देशाच्या विकासात योगदान देण्यास सक्षम करणे आहे.प्रगती असूनही, पितृसत्ताकता, निरक्षरता आणि सुरक्षिततेच्या चिंता यासारख्या आव्हाने कायम आहेत, ज्यामुळे खऱ्या लिंग समानतेसाठी सतत प्रयत्नांची आवश्यकता आहे. महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता या संकल्पना एकमेकांशी जोडल्या गेलेल्या आहेत आणि एकमेकांशी गुंतलेल्या आहेत. महिला सक्षमीकरणासाठी लिंग समानतेचा प्रचार ही पहिली आणि सर्वात महत्वाची अट आहे. त्याच वेळी, लिंग समानतेचा पाठपुरावा करणे हे स्वाभाविकपणे महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.अशाप्रकारे, महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता एकमेकांना चालना देतात आणि एकमेकांची आवश्यकता देखील पूर्ण करतात.

**संदर्भ सूची –**

1. भोजने .प्रा .पल्लवी .तुकाराम .(2024). स्त्री सक्षमीकरण आणि समतोल समाजनिर्मिती. International Journal of Advance and Applied Research,
2. "स्त्री-सक्षमीकरणाच्या योजना"-2018-10-15 - Loksatta.
3. भारतातील महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता- २५ नोव्हेंबर २०२४ - नेक्स्ट आयएएस टीम
4. यशी बाजपेयी- शाश्वत विकासासाठी महिला सक्षमीकरण का? (विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल स्टडीज, दिल्ली)

5. डॉ लिंडा स्पेडिंग- महिला सक्षमीकरण, शाश्वत विकास आणि आरोग्य, जीवनातील घटकांचे संतुलन,
6. women empowerment key to sustainable development in india-१ नोव्हेम्बर २०२४ https://www.mahilahousingtrust.org
7. women empowerment- https://www.vedantu.com
8. the oxford review dei diversity equity and inclusion dictionary female empowerment definition and explanation - //https://oxford-review.com
9. विकिपीडिया, मुक्त ज्ञानकोशातून.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# "ब्रेक्झिट आणि भारत: व्यापार, गुंतवणूक आणि विकासाच्या दृष्टीने एक विश्लेषण"

**डॉ. तुषार गणपत वाकसे**
श्री सिद्ध ठाकूरनाथ महाविद्यालय उल्हासनगर.
**Corresponding Author: डॉ. तुषार गणपत वाकसे**
**Email** - tusharwakse@sstcollege.edu.in
**DOI-10.5281/zenodo.15696582**

**गोषवारा –**

भारत हे इंग्लंड मधील सर्वोच्च गुंतवणूकदारांपैकी एक आहे. इंग्लंड मध्ये सुमारे 800 भारतीय मालकीच्या कंपन्या आहेत, ज्या सुमारे 1,10,000 लोकांना रोजगार देतात. यापैकी अनेक कंपन्यांनी युरोपियन बाजारपेठेचा विचार करून गुंतवणूक केली होती. यूके आणि युरोप मिळून भारताच्या IT निर्यातीपैकी सुमारे चतुर्थांश हिस्सा घेतात, ज्याची किंमत सुमारे $30 अब्ज आहे. इंग्लंड हा भारतात गुंतवणूक करणारा तिसरा सर्वात मोठा परदेशी स्रोत असून, भारताचा सर्वात मोठा G20 गुंतवणूकदार आहे. भारत हा इंग्लंड मध्ये प्रकल्पांच्या संख्येनुसार परकीय थेट गुंतवणुकीचा (FDI) तिसरा सर्वात मोठा स्रोत आहे. भारत इंग्लंड मध्ये युरोपच्या इतर सर्व देशांपेक्षा जास्त गुंतवणूक करतो आणि त्यामुळे इंग्लंड मध्ये तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा FDI गुंतवणूकदार म्हणून उदयास आला आहे.

आरोग्यसेवा, कृषितंत्रज्ञान, अन्न व पेय हे क्षेत्रे भारतीय गुंतवणुकीसाठी प्रमुख आकर्षण ठरली आहेत. नोव्हेंबर 2015 मध्ये, पंतप्रधान मोदी यांच्या म्हणण्यानुसार, "भारताच्या दृष्टीने, जर युरोपियन युनियनमध्ये प्रवेशद्वार असेल, तर ते इंग्लंड आहे." परंतु, यूके हा भारताचा केवळ 12वा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे, जर्मनी आणि स्वित्झर्लंडसारख्या इतर युरोपियन देशांच्या तुलनेत खूप मागे आहे. विशेष म्हणजे, यूके हा भारतासोबत व्यापार वजाबाकीत फायदा असलेल्या 25 प्रमुख देशांपैकी केवळ सात देशांमध्ये समाविष्ट आहे.ब्रेक्झिटमुळे जगभरात चिंता व्यक्त करण्यात आली कारण या निर्णयाचा त्यांच्या देशांवर, जागतिक अर्थव्यवस्थेवर इत्यादींवर काय परिणाम होईल याची चिंता होती. भारत हा ब्रिटनचा माजी वसाहतदेश राहिला असून, दोघांमध्ये आर्थिक संबंधही आहेत. हा लेख ब्रेक्झिट आणि त्याचे भारतावर होणारे सध्याचे आणि संभाव्य भविष्यातील परिणाम यांचे वर्णन करतो.

**मुख्य शब्द -** ब्रेक्झिट, परकीय थेट गुंतवणूक,युरोपियन बाजारपेठ,G20 गुंतवणूकदार,जागतिक अर्थव्यवस्था

**उद्दिष्टे -**

- ब्रेक्झिटची संकल्पना व व्याप्ती स्पष्ट करणे.
- जागतिक अर्थव्यवस्थेतील युरोपियन युनियनचे महत्त्व समजून घेणे.
- ब्रेक्झिट आणि भारतीय अर्थव्यवस्था तसेच इतर पैलूंमधील परस्परसंबंधावर चर्चा कर

**परिचय**

'ब्रेक्झिट करार' हा एक ऐतिहासिक घटना ठरली, ज्याने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले. 2016 मध्ये यूकेने ब्रेक्झिट संदर्भातील सार्वमत (एक मतदान प्रक्रिया ज्यामध्ये 'होय' किंवा 'नाही' अशा स्वरूपात उत्तर द्यावे लागते) जाहीर केल्यापासून ते 31 जानेवारी 2020 रोजी युरोपियन युनियन (EU) मधून अंतिम रूपाने बाहेर पडण्यापर्यंत साऱ्या जगाचे लक्ष युनायटेड किंगडमकडे लागले होते.

युरोपियन युनियन ही युरोपमधील विविध देशांची राजकीय आणि आर्थिक संघटना आहे. ही संघटना सदस्य देशांना मुक्त व्यापाराची परवानगी देते, म्हणजेच एक सदस्य देशातून दुसऱ्या सदस्य देशात प्रवास करताना कोणतेही तपासणीचे अडथळे किंवा शुल्क नसते. तसेच, नागरिकांना या देशांमध्ये मुक्तपणे प्रवास, काम किंवा वास्तव्य करता येते. हे 'नो बॉर्डर्स' संकल्पनेमुळे शक्य होते आणि त्यामध्ये इतर अनेक फायदेही आहेत. सध्या 51 देशांपैकी 27 देश युरोपियन युनियनचे सदस्य आहेत. ही जगातील सर्वात मोठी व्यापार संघटना आहे.

**'ब्रेक्झिट' हा 'ब्रिटिश एक्झिट' या संज्ञेचा संक्षिप्त रूप आहे,**

जो युनायटेड किंगडम (यामध्ये इंग्लंड, वेल्स, स्कॉटलंड आणि नॉर्दर्न आयर्लंड यांचा समावेश आहे) ने युरोपियन युनियनमधून बाहेर पडण्यास संदर्भित करतो. ही संज्ञा प्रथम 2012 मध्ये ग्रीसच्या संभाव्य युरोपियन युनियनमधून बाहेर पडण्यास संदर्भित करण्यासाठी वापरली गेली होती.

**ब्रेक्झिट म्हणजे काय?**

यूकेच्या युरोपियन युनियनमधून बाहेर पडण्याचा संक्षिप्त उल्लेख म्हणजे 'ब्रेक्झिट' होय. 'ब्रिटन' आणि 'एक्झिट' या शब्दांचे संयोग करून 'ब्रेक्झिट' हा शब्द तयार करण्यात आला आहे.

**युरोपियन युनियन म्हणजे काय?**

युरोपियन युनियन (EU) ही 28 युरोपीय देशांचा आर्थिक व राजकीय भागीदारी असलेली संघटना आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक सहकार्याला चालना देण्यासाठी या युनियनची सुरुवात झाली, यामागील कल्पना अशी होती की जे देश एकमेकांशी व्यापार करतात, त्यांच्यामध्ये युद्धाची शक्यता कमी असते.

त्या वेळेपासून ही संघटना वाढून एक "एकत्रित बाजारपेठ" बनली आहे, ज्या अंतर्गत वस्तू आणि लोकांचा मुक्तपणे प्रवास केला जाऊ शकतो, जणू काही सदस्य देश एकच देश आहेत. युरोपियन युनियनची स्वतःची चलन व्यवस्था आहे — *युरो*, जी 19 सदस्य देशांमध्ये वापरली जाते. याला स्वतःचे संसदसत्र आहे आणि ही संघटना पर्यावरण, वाहतूक, ग्राहक हक्क, आणि मोबाइल फोन शुल्कासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये नियम ठरवते.




Note: Goods excludes unspecified goods. Services data is only available to the third quarter of 2021.
Source: ONS

**ब्रिटन युरोपियन युनियनमधून का बाहेर पडत आहे?**

23 जून 2016 रोजी सार्वमत घेण्यात आले — ही एक अशी मतदान प्रक्रिया होती ज्यामध्ये जवळपास सर्व मतदार वयाचे नागरिक सहभागी होऊ शकतात. या मतदानाद्वारे यूकेने युरोपियन युनियनमध्ये राहावे की बाहेर पडावे, हे ठरवायचे होते. "बाहेर पडावे" या मताला 51.9% मते मिळाली, तर "राहावे" या मताला 48.1% मते मिळाली. या सार्वमतासाठी 71.8% मतदान झाले, आणि 3 कोटींपेक्षा जास्त लोकांनी मतदान केले.

या मतदानानंतरच्या सर्वेक्षणानुसार, जवळपास निम्मे (49%) *"बाहेर पडावे"* असे म्हणणारे मतदार म्हणाले की, यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे *"यूकेबाबतचे निर्णय यूकेमध्येच घ्यावेत"* या तत्त्वाशी ते सहमत होते. तर 33% मतदारांनी सांगितले की, युरोपियन युनियनमधून बाहेर पडल्यामुळे *"यूकेला स्थलांतर आणि स्वतःच्या सीमा यांवर पुन्हा नियंत्रण मिळवण्याची सर्वोत्तम संधी मिळेल"* असे त्यांना वाटले.

हे सर्व त्या परिस्थितीत असूनही ब्रिटनमध्ये होणारे बहुतांश स्थलांतर हे ईयूबाह्य देशांमधून होत होते आणि त्यावर पूर्ण नियंत्रण इंग्लंड सरकारचेच होते.

**ब्रिटनने ब्रेक्झिटची मागणी करण्यामागील काही कारणे अशी होती:**

**स्वायत्तता (Sovereignty) –**

जरी ब्रिटिश सरकार युरोपियन आयोगाच्या सदस्यांची निवड करण्याच्या प्रक्रियेत काही अंशी सहभागी असले, तरी हे सदस्य ब्रिटिश संसदेला जबाबदार नसतात, ना त्यांच्यावर ब्रिटनचा प्रभाव असतो. स्पर्धा धोरण, कृषी, कॉपीराइट आणि पेटंट कायदे यांसारखे काही धोरणात्मक निर्णय ब्रिटनच्या हिताच्या विरोधात जातात. हे युरोपियन कायदे स्थानिक (घरी केलेले) कायद्यांवर वर्चस्व गाजवतात.

**नियमांचे ओझे (Regulations are becoming a Burden) –**

काही नियम, जसे की व्हॅक्युम क्लीनरच्या शक्तीवर मर्यादा, चहा पिशव्या पुन्हा न वापरणे (non-recycling of tea bags) इत्यादी, हे ब्रिटनमधील काही परंपरावादी गटांसाठी अडथळा व ओझे ठरले आहेत. मायकल गोव्ह यांच्या मते, अशा नियमांमुळे ब्रिटनला दरवर्षी सुमारे £3 अब्ज इतका खर्च सहन करावा लागतो.

**युरो – एक आपत्ती**

जरी युरो ही युरोपियन युनियनची समान चलन प्रणाली असली, तरी ब्रिटनने अजूनही आपले पारंपरिक

चलन *पाउंड* वापरणे चालू ठेवले आहे. जर युरो खरोखरच यशस्वी होणार असेल, तर त्यासाठी अधिक आर्थिक व वित्तीय समन्वय आवश्यक होता, आणि तोपर्यंत शक्य होत नाही जोपर्यंत सर्व सदस्य देश एकाच चलनाचा वापर करत नाहीत.

**स्थलांतर (Immigration)**

ब्रिटन *शेन्गेन सीमामुक्त क्षेत्राचा* (Schengen Border Free Zone) सदस्य नाही, ज्यामध्ये युरोपभर सहज प्रवास करता येतो. गेल्या दहा वर्षांमध्ये ईयूमधून ब्रिटनमध्ये होणाऱ्या स्थलांतराविरुद्ध काही प्रमाणात विरोध वाढलेला आहे, विशेषतः 2008 च्या आर्थिक मंदीनंतर, ज्या काळात लिथुआनिया, पोलंड, इटली, रोमानिया इत्यादी देशांतील कामगार ब्रिटनमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित झाले. याचा परिणाम वेतन आणि सार्वजनिक सेवांवर झाला, असे अनेकांचे मत होते.

"बाहेर पडावे" असा आग्रह धरणारे समर्थक कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाचे उदाहरण देतात, जे *गुणाधारित स्थलांतर प्रणाली* (point-based immigration system) वापरतात, आणि असे म्हणतात की ब्रिटननेही अशाच प्रकारची प्रणाली स्वीकारावी, युरोपियन युनियनने ठरवलेल्या कायद्यांचे पालन करण्यास भाग पाडले जाण्याऐवजी.

**ब्रेक्झिटचा जागतिक परिणाम**

1. जागतिकीकरणामुळे देशांमधील परस्परसंबंध वाढले आहेत. जर एका देशात काही अडचण आली, तर ती
2. इतर देशांवरही परिणाम करेल.
   b) ब्रेक्झिटचा जागतिक वाढीवर परिणाम होईल.
   c) जेव्हा अधिक देश बहुपक्षीय व्यापार करारांकडे जात आहेत, तेव्हा हे एक मोठा धक्का ठरतो.
   d) यामुळे गुंतवणूकदार आणखी परके होईल आणि भांडवल धोकीच्या बाजारांहून सुरक्षित स्थळी हलवले
3. जाईल.
   e) मुख्य निर्यात करणारे देश, जसे की चीन आणि भारत, प्रभावित होतील कारण युरोपियन युनियन हा
4. एक प्रमुख निर्यात बाजार आहे.
   f) एका अंदाजानुसार, ब्रेक्झिटमुळे ब्रिटनच्या आयातीमध्ये 25% कपात होईल.
   g) ब्रेक्झिट हा एक सार्वमत होता जो अनेक घटकांवर आधारित होता - स्थलांतरविरोध, संरक्षणवाद
5. वाढवणे, इत्यादी. यामुळे अशा भावना इतर भागांमध्येही वाढू शकतात.
   h) ब्रिटन हा युरोपियन युनियनचा एक मोठा वित्तीय आणि लष्करी योगदानकर्ता होता, परंतु ब्रेक्झिटमुळे
6. युरोपियन युनियनचे वित्तीय नुकसान होईल.
   i) ब्रेक्झिटच्या परिणामी नेदरलँड्सच्या बाहेर पडण्याची मागणी (NEXIT), इटलीच्या बाहेर पडण्याची
7. मागणी (Italeave) आणि फ्रान्सच्या बाहेर पडण्याची मागणी (FREXIT) इत्यादी होऊ लागल्या आहेत.
   j) ब्रेक्झिटमुळे स्कॉटलंडने युनायटेड किंगडममधून बाहेर पडण्याची मागणी केली आहे.




**भारतीय रुपयावर परिणाम**

ब्रेक्झिटनंतर ब्रिटिश पाउंडमध्ये झालेल्या मोठ्या विक्रीमुळे पाउंडच्या मूल्यात भारतीय रुपयाच्या तुलनेत

**ब्रेक्झिट आणि भारत ?**

**डॉ. तुषार गणपत वाकसे**

सुमारे 8% घट झाली. वित्तीय तज्ञांचा असा अंदाज आहे की, पाउंड स्थिर होईपर्यंत या घटीचा सिलसिला सुरू राहील, ज्यामुळे भारतीय नागरिकांसाठी यूकेमध्ये प्रवास आणि शिक्षण घेणे तुलनेने स्वस्त होईल. पाउंडच्या घटत्या किंमतीमुळे भारतीय नागरिक आणि कंपन्यांसाठी यूकेच्या महागड्या प्रॉपर्टी मार्केटमध्ये सस्ते रिअल इस्टेट पर्याय उपलब्ध होतात.

**व्यापार संबंध**

ब्रेक्झिटमुळे लंडनला न्यू दिल्लीसोबत अधिक मजबूत व्यापार संबंध प्रस्थापित करण्याची आवश्यकता भासू शकते. ब्रिटन आणि भारत यांच्यात आजतागायत मुक्त व्यापार करार झाला नाही, कारण 28-राष्ट्रीय EU गटाच्या जटिल वित्तीय राजकारणामुळे वाटाघाटी फसलेल्या होत्या. आता इतर EU सदस्य देशांपासून मुक्त असलेल्या यूकेला भारत आणि इतर समान स्थिती असलेल्या देशांसोबत व्यापार संबंध वाढवण्याचा उद्देश असेल. भारताची अर्थव्यवस्था त्याच्या सर्व समकक्षांपेक्षा चांगली कामगिरी करत असल्यामुळे, ब्रिटिश साम्राज्याची पूर्वीची ताज्या रत्नं पुन्हा लंडनच्या दृष्टिकोनातून चमकू लागली आहे.

**भारतीय स्टॉक मार्केट**

युरोपियन युनियनमधील वित्तीय आणि राजकीय अनिश्चितता भारतीय स्टॉक मार्केटला परदेशी गुंतवणुकीसाठी अधिक आकर्षक ठिकाण बनवते. सार्वमताच्या तात्काळ परिणामानंतर भारतीय बाजारात काही घट झाली असली तरी, सामान्यतः ते सुधारले आहेत, विशेषत: इतर जागतिक एक्सचेंजेसच्या तुलनेत.

**भारताच्या कौशल्यवान कामगारांवरील परिणाम**

काही विश्लेषकांचा असा अंदाज आहे की, ब्रेक्झिटमुळे यूकेच्या स्थलांतर धोरणात बदल होऊ शकतात, ज्यामुळे भारतातील उच्च-कौशल्य असलेल्या कामगारांना प्राधान्य मिळू शकते. युरोपियन युनियनपासून विभक्त झाल्यामुळे, यूकेला उच्च-कौशल्य असलेल्या EU कामगारांची टंचाई भासू शकते, जर महत्त्वाच्या व्यावसायिकांची यूरोपियन खंडातून हालचाल कमी केली गेली. भारताला या संभाव्य कमतरतेचा फायदा होऊ शकतो. हे विशेषतः विडंबनात्मक ठरेल, कारण ब्रेक्झिटच्या मागे असलेली परकीयविरोधी भावना, स्थानिकतेची भावना आणि पृथक् राहण्याची भावना हेच संभवतः ब्रेक्झिटचे कारण ठरले.

**व्याज दर वाढवणे**

यू.एस. फेडरल रिझर्व्ह, इतर प्रमुख देशांच्या केंद्रीय बँकांसह, आर्थिक वाढीवर परिणाम होऊ नये आणि आधीच अस्थिर असलेल्या जागतिक बाजारपेठेला अधिक संकटात टाकू नये म्हणून व्याज दर वाढवण्यास विलंब करू शकतात. या विलंबामुळे भारतात परकीय गुंतवणुकीचा प्रवेश कायम राहण्यास किंवा तो आणखी वाढवण्यास मदत होईल, कारण भारतात तुलनेने उच्च व्याज दर आहेत.

**विद्यार्थी कार्य व्हिसा नियम**

यूके सरकारने 2019 मध्ये घेतलेला एक महत्त्वपूर्ण निर्णय हे दाखवते की भारतीय विद्यार्थ्यांसाठी यूकेमध्ये अनुभव मिळवण्याची आणि काम करण्याची किती संधी उघडू शकतात. हा निर्णय "ग्रॅज्युएट मार्ग" (Graduate Route) म्हणून ओळखला जातो आणि तो यूके व आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी परस्पर लाभासाठी मंजूर करण्यात आला होता.

**नवीन स्थलांतर धोरण**

यूकेचे नवीन स्थलांतर धोरण भारतीयांसाठी फायदेशीर म्हणून पाहिले गेले आहे. 1 जानेवारी 2021 पासून लागू होणारे नियम सांगतात की, एक स्थलांतरित व्यक्ती व्हिसासाठी पात्र होण्यासाठी 70 गुण मिळवणे आवश्यक आहे. व्यक्तीला इंग्रजीत प्रावीण असणे, नोकरीची ऑफर असणे आणि 25,600 पाऊंड उत्पन्न असणे आवश्यक आहे, जरी सरकारी अधिकृत टंचाई यादीतील कामगारांना याची अपवाद असतील. हे नवीन स्थलांतर धोरण ब्रिटनमध्ये नोकरीच्या संधी शोधणाऱ्या कौशल्यपूर्ण भारतीयांसाठी फायदेशीर ठरेल. फ्रीलांसर किंवा स्व-नियोजित कामगारांवर याचा फारसा परिणाम होणार नाही. या धोरणाचा उद्देश "उच्च कौशल्य, उच्च वेतन आणि उच्च उत्पादकतेच्या अर्थव्यवस्थे" साधण्याचा आहे.

**निष्कर्ष**

ब्रेक्झिटमुळे यूके आणि EU मध्ये भारतासाठी द्विपक्षीय करार होण्याची शक्यता आहे. अशी शक्यता आहे की, ब्रेक्झिटचे दीर्घकालीन फायदे भारतासाठी संक्षिप्तकालीन खर्चांपेक्षा जास्त असतील. जागतिकीकरणाच्या आधुनिक जगात, एक देशातील मोठ्या बदलाच्या धक्क्याचे प्रमाण संपूर्ण जगभरात अनुभवले जाऊ शकते. भविष्य काय घेऊन येईल हे कोणालाही माहीत नाही, पण वित्त मंत्रालयाने म्हटले आहे की, कोणत्याही प्रकारच्या परिणामांचा सामना करण्यासाठी भारताकडे पुरेशी परकीय चलन राखीव आहे. SEBI आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या देखरेख यंत्रणेला कोणत्याही अति प्रमाणात हालचालींचा सामना करण्यासाठी बळकट करण्यात आले आहे. असा विश्वास आहे की, एकदा धूर शांत झाल्यावर, भारत उच्च प्रमाणात भांडवल प्राप्त करणारा ठरेल.

**संदर्भ:**

1. ब्रेक्झिट - कारणे, जागतिक परिणाम आणि भारतावर परिणाम

2. ब्रेक्झिट आणि त्याचा भारतावर परिणाम - iPleaders
3. ब्रेक्झिटचा भारतावर परिणाम - Search (bing.com)
4. इंडियन एक्सप्रेस मधील ब्रेक्झिटवरील काही लेख.
5. फ्रंटलाइन मासिकातील काही लेख.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# महिला सशक्तिकरण : सामाजिक समतोल

**प्रा. डॉ. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले**
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड, जि. नागपूर
**Corresponding Author: प्रा. डॉ. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले**
**Email** -puroshotampakhale@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15696617**

**गोषवारा**

भारतीय मराठी स्त्रियांचा इतिहास आणि त्यांच्या योगदानाबद्दल बोलताना, अनेक विशेष गोष्टी समोर येतात. मराठी स्त्रिया त्यांच्या बुद्धिमत्ता, समर्पण, आणि साहसासाठी ओळखल्या जातात. झाशीची राणी लक्ष्मीबाई -त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्मिता पाटील - अभिनय क्षेत्रात त्यांनी भारतीय सिनेमाला एक नवीन दिशा दिली. संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण - आजच्या काळात अनेक मराठी स्त्रिया उच्च शिक्षण घेत आहेत आणि विविध क्षेत्रांमध्ये काम करत आहेत, जसे की विज्ञान, तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, आणि व्यवसाय. सामाजिक कार्य अनेक मराठी स्त्रिया सामाजिक कार्यात सक्रिय आहेत, जसे की बालह्या, आरोग्य, शिक्षण, आणि महिलांच्या हक्कांसाठी लढा देणे. कला व संस्कृती साहित्य, संगीत, आणि नृत्यातही मराठी स्त्रियांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. उदाहरणार्थ, कविता लेखन, नाटक, आणि गायन यामध्ये अनेक प्रतिष्ठित महिला कलाकार कार्यरत आहेत. अद्यापही मराठी स्त्रियांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो, जसे की लैंगिक भेदभाव, शिक्षणात कमी संधी, आणि पारंपरिक रूढींचा परिणाम. भारतीय मराठी स्त्रिया आपल्या अस्तित्वाने, कार्याने आणि विचारांनी समाजात जागरूकता निर्माण करीत आहेत. त्यांच्या कृतीतून समाजात परिवर्तन घडवण्यासाठी त्यांचा ठसा स्पष्टपणे दिसून येतो. लैंगिक शोषण, अत्याचार आणि घरगुती हिंसा यांसारख्या समस्यांवर नियंत्रण मिळवता येते.स्त्रियांना सुरक्षितता दिल्यास त्या समाजाच्या विकासात मोलाची भूमिका बजावू शकतात.

**उपशब्द :** महिला, सशक्तीकरण, सामाजिक समतोल, साहित्य , राजकीय आणि संस्कृती.

**प्रस्तावना**

प्राचीन भारतात स्त्रियांवर लादलेली बंधने प्राचीन भारतात स्त्रियांना समाजात मोठे महत्त्व होते, परंतु कालांतराने त्यांच्या स्वातंत्र्यावर विविध बंधने लादली गेली. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कारणांमुळे स्त्रियांवर अनेक निर्बंध आले, ज्यामुळे त्यांचे अधिकार आणि अस्तित्व मर्यादित झाले. शिक्षणावर निर्बंध वैदिक काळात गार्गी आणि मैत्रेयी यांसारख्या विदुषी होत्या, परंतु नंतरच्या काळात स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवण्यात आले. वेद-अध्ययनाचा अधिकार पुरुषांपुरता मर्यादित करण्यात आला. स्त्रियांनी घरकाम आणि कुटुंब व्यवस्थापन शिकावे, असे समाजमान्य झाले. स्वातंत्र्यावर निर्बंध बालविवाह: मुलींना अगदी लहान वयातच विवाह करण्याची प्रथा सुरू झाली, ज्यामुळे त्यांचे बालपण हरवले. स्त्रीने फक्त आपल्या पतीलाच समर्पित राहावे, हा नियम कडक करण्यात आला.

**महिला सशक्तिकरण : सामाजिक समतोलाचे प्रतिक**

भारतीय संस्कृतीत स्त्रियांना प्राचीन काळी मोठा आदर मिळत असे. गार्गी, मैत्रेयी यांसारख्या विदुषी स्त्रिया विद्वत्तेसाठी प्रसिद्ध होत्या. पण कालांतराने समाजातील पुन्हा विवाहावर बंदी: विधवा महिलांना पुनर्विवाहाची संधी दिली जात नव्हती, त्यामुळे त्यांचे जीवन कठीण होत असे. समाजातील दुय्यम स्थान स्त्रियांना घरातील निर्णयांमध्ये किंवा राजकारणात स्थान नव्हते. धर्मशास्त्रांमध्ये पुरुषप्रधान मानसिकता निर्माण झाली आणि स्त्रियांना गौण मानले गेले. स्त्रियांना वारसा हक्क, संपत्ती आणि मालमत्तेवर कमी अधिकार दिले गेले. पोषाख आणि वर्तनावर निर्बंधस्त्रियांनी साधा आणि मर्यादित पोषाख घालावा, अशी सक्ती होती. सतीप्रथा आणि घुंघटप्रथा (पर्दा) यांसारख्या प्रथा स्त्रियांवर लादण्यात आल्या. सतीप्रथा आणि अन्य अमानुष परंपरा पतीच्या मृत्यूनंतर पत्नीनेही अग्नीत आत्मसमर्पण करावे (सतीप्रथा), असा अघोरी नियम काही समाजांमध्ये प्रचलित होता. देवदासी प्रथा, जिथे मुलींना देवाच्या सेवेसाठी समर्पित केले जात असे, त्यामुळे त्यांचे जीवन कठीण होत असे.

काही रुढी, परंपरा आणि अन्यायकारक प्रथांमुळे स्त्रियांचे स्थान दुय्यम झाले. त्यात काही स्त्रियांचा हातभार असल्याचे दिसून येते उदा. विजया मेहतांनी भर मुनीचे नाट्यशास्त्र वाचले ते कोणत्या आधारावर आहे. याची

कल्पना त्याना होती तरिही त्या म्हणतात की, "विजया मेहतांनी भरतमुनीचे नाटयशास्त्र वाचले होते. अभ्यासले होते, पण ब्राम्हणी विचारधारा, त्यातील अंधास्रध्दा, त्यातील कर्मकांड, त्यातील अज्ञान विजया मेहतांनी धार्मिक श्रध्दा म्हणून स्वीकारली असल्यामुळे भरत मुनीच्या नाटयशास्त्रातील अज्ञान, कर्मकांड, अंधस्रध्दा, दुष्ट परंपरा त्यांना गैर वाटल्याच नाही. किंबहुना त्या श्रद्धामध्ये जगाचे कल्याण असल्याची त्यांची धारणा झाली असावी."[१] पृष्ठ क्र. ३ आधुनिक काळातील सामाजिक अस्तित्व: आजच्या काळात स्त्रिया शिक्षण, व्यवसाय, राजकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा आणि कला यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये स्वतःचे महत्त्व सिद्ध करत आहेत. स्त्रियांचे सामाजिक अस्तित्वआहे. स्त्रिया समाजाचा अविभाज्य भाग आहेत. प्राचीन काळापासून त्यांच्या स्थानात आणि अधिकारांमध्ये बरेच बदल झाले आहेत. वर्तमान स्त्रियांची दशा आजच्या आधुनिक युगात स्त्रियांची स्थिती प्राचीन आणि मध्ययुगीन काळाच्या तुलनेत निश्चितच सुधारली आहे. शिक्षण, स्वातंत्र्य, आर्थिक आत्मनिर्भरता आणि राजकीय सहभाग यामुळे स्त्रिया सशक्त झाल्या आहेत. मात्र, आजही अनेक सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अडचणींना त्या सामोऱ्या जात आहेत.

स्त्री सशक्तीकरण म्हणजे काय? स्त्रियांना शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वातंत्र्य, निर्णय घेण्याचा अधिकार आणि सुरक्षितता देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवणे म्हणजे स्त्री सशक्तीकरण. जेव्हा स्त्रिया सक्षम होतात, तेव्हा समाजातील लैंगिक असमानता दूर होते आणि संपूर्ण समाजाचा विकास होतो. सामाजिक समतोलासाठी स्त्री सशक्तीकरण कसे आवश्यक आहे? शिक्षण आणि जागरूकता: शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा मूलभूत पाया आहे. सुशिक्षित स्त्री केवळ स्वतःच नाही, तर कुटुंब आणि समाजालाही प्रगतिशील बनवते.

निवडक धर्मग्रंथांतील बंधने मनुस्मृतीसारख्या ग्रंथांमध्ये स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व नाकारण्यात आले. "पती हा स्त्रीसाठी देवतुल्य असतो." "स्त्रीने पतीच्या आज्ञेप्रमाणे वागावे." स्त्रियांना धार्मिक विधी करण्याचा अधिकार नाकारला गेला. प्राचीन काळात स्त्रियांना अनेक क्षेत्रांत स्वातंत्र्य होते, परंतु नंतरच्या काळात सामाजिक आणि धार्मिक बंधनांमुळे त्यांची स्थिती खालावली. हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनिती या ग्रंथात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,की, मनुने सांगितलेल्या काही प्रथापैकी एक उदा. "ओवी क्र. ५-१४८ स्त्रीने लहानपणात वडिलांच्या आज्ञेत राहिले पाहिजे. पती मृत्यूनंतर तिने आपल्या पुत्राच्या आज्ञेत राहिले पाहिजे. स्त्रीने स्वतंत्रपणे कधीच राहू नये." [२] पृष्ठ क्र. २६ याच प्रकारे सतीप्रथा, बालविवाह, शिक्षणावर बंदी आणि पुनर्विवाहाचा निषेध यांसारख्या प्रथांमुळे स्त्रिया निर्बंधित झाल्या. "पतीला पत्नीपासून विभक्त राहण्यास मनाई करणारा कायदा मनुने केला त्याबद्दल बरेच हिंदूलोक त्यांची मनसोक्त स्तुती करतात. आणि असा कायदा इतर देशात नाही म्हणून ते अभिमानाने सांगतात." [३] पृष्ठ क्र. २७ मात्र, आधुनिक काळात स्त्रियांवर लादलेली ही बंधने हळूहळू मोडीत निघाली आणि आज स्त्रिया समाजात स्वतंत्र आणि सक्षम भूमिका बजावत आहेत.

स्त्रियांचे सशक्तीकरण आणि प्रगती शिक्षण आणि करिअरमध्ये वाढ. आज स्त्रिया उच्च शिक्षण घेत आहेत आणि डॉक्टर, इंजिनिअर, वकील, वैज्ञानिक, उद्योजक आणि प्रशासकीय अधिकारी म्हणून यशस्वी होत आहेत. स्त्रिया मोठ्या प्रमाणावर नोकरी आणि व्यवसाय करत आहेत, ज्यामुळे त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढले आहे.स्टार्टअप आणि स्वयंरोजगार क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढला आहे.सरकारी आणि खासगी क्षेत्रात स्त्रियांसाठी अनेक अनुदाने आणि योजना आहेत.

राजकीय आणि सामाजिक सहभाग आणि संसद आणि विधिमंडळात स्त्रियांचे प्रमाण वाढत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, महापालिका) यामध्ये महिलांना आरक्षण मिळाले आहे. महिला आंदोलने आणि चळवळींमध्ये स्त्रियांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. आजही अस्तित्वात असलेल्या समस्या, आव्हाने आणि असमानता दिसून येते. समान कामासाठी समान वेतन मिळत नाही.अनेक ठिकाणी महिलांना पुरुषांइतकी संधी दिली जात नाही. सुरक्षेचा अभाव,बलात्कार, लैंगिक शोषण, घरगुती हिंसा यांसारख्या गुन्ह्यांचे प्रमाण चिंताजनक आहे. सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षेबाबत अजूनही मोठी चिंता आहे. स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय, लैंगिक भेदभाव कमी होतो आणि दोन्ही गटांना समान संधी मिळतात. समान वेतन, निर्णय प्रक्रिया आणि अधिकारांमध्ये संतुलन राहते. मुलींना जन्मापासूनच समान वागणूक मिळाल्यास समाज अधिक न्याय्य बनेल. अनेक कुटुंबांमध्ये अजूनही स्त्रियांनी घर सांभाळावे आणि करिअरपेक्षा कुटुंबाला प्राधान्य द्यावे, असा दृष्टीकोन आहे. "मुलगी झाली तर आनंद कमी आणि मुलगा झाला तर मोठा आनंद" ही मानसिकता अजूनही काही ठिकाणी दिसून येते.

आरोग्य आणि पोषण, ग्रामीण भागात अजूनही स्त्रियांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळत नाहीत.गरोदरपणात आणि बाळंतपणात योग्य देखभाल न मिळाल्याने माता-मृत्यू दर काही भागांमध्ये अजूनही अधिक आहे.समानतेच्या संधींवर मर्यादा, तंत्रज्ञान, विज्ञान आणि राजकारण यांसारख्या क्षेत्रांत अजूनही स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. अनेक ठिकाणी महिलांना निर्णय प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान दिले जात नाही.

स्त्री सशक्तीकरणासाठी सुरू असलेले प्रयत्न सरकारी योजना बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना – मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणारी योजना.उज्ज्वला योजना – महिलांना स्वच्छ इंधन (गॅस) उपलब्ध करून देणारी योजना. महिला आरक्षण विधेयक म्हणजे "महिला

आरक्षण बिल भारतीय ससंद रुपी सागर किये जारहे समुद्र मंथनसे निकले निकलने वाला वह अमृत है जिसका अभिजात्य वर्ग के पोषक..?."४ पृष्ठ क्र. ४२ – संसद आणि विधिमंडळात महिलांसाठी ३३% आरक्षण. महिला सक्षमीकरणासाठी सामाजिक चळवळी, आणि महिलांच्या हक्कांसाठी विविध चळवळी उभ्या राहिल्या आहेत. स्वयंसेवी संस्था आणि गट महिलांच्या सुरक्षेसाठी आणि आर्थिक प्रगतीसाठी काम करत आहेत.

स्त्रियांना शिक्षण, करिअर आणि हक्क यांसाठी सोशल मीडियाचा मोठा फायदा होत आहे. ऑनलाइन व्यवसाय आणि "वर्क फ्रॉम होम"संधींमुळे महिलांना अधिक आर्थिक संधी मिळत आहेत. स्त्रियांची आजची स्थिती पूर्वीच्या तुलनेत चांगली असली, तरी अजूनही अनेक अडथळे आहेत. समान संधी,सुरक्षा आणि लैंगिकसमानते साठी अजूनबरी चप्रगती करावी लागेल.शिक्षण,स्वाव लंबन आणि समाजाची मानसिकता बदलल्यास स्त्रिया अधिक सक्षम होऊ शकतात. आजची स्त्री आत्मनिर्भर आहे, आपले अधिकार ओळखते आणि स्वतःचे अस्तित्व सिद्ध करत आहे.

स्त्रियांचे महत्त्वाचे सामाजिक योगदान शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रिया आत्मनिर्भर होत आहेत. शिक्षणाने त्यांना स्वतःचे विचार मांडण्याचे आणि स्वावलंबी होण्याचे बळ मिळाले आहे. आर्थिक स्वातंत्र्य नोकरी व व्यवसायात स्त्रियांचा सहभाग वाढला आहे, त्यामुळे त्यांचे आर्थिक अस्तित्वही बळकट होत आहे. राजकीय सहभाग: स्त्रिया संसद, विधिमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. कौटुंबिक व्यवस्थापनात आजही स्त्रिया घर आणि नोकरी या दोन्ही आघाड्यांवर जबाबदारी सांभाळतात. सामाजिक अडचणी व आव्हाने सांभाळून कौटुंबिक भान राखले. सामाजिक दृष्ट्या विविध ठिकाणी लैंगिक भेदभाव आजही पाळले जात आहे. अनेक ठिकाणी अजूनही स्त्रियांना समान संधी मिळत नाहीत. स्त्री भ्रूणहत्या आणि बालविवाह हा त्यापैकी एक. काही समाजांमध्ये अजूनही हे समस्यात्मक मुद्दे आहेत. लैंगिक शोषण आणि अत्याचार करणे फॅशन झाले आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अद्याप गंभीर आहे. मानसिक आणि सामाजिक दबाव निर्माण करणे. समाजातील काही पारंपरिक विचार स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालतात. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कडक कायदे आणि त्यांची अंमलबजावणी. लैंगिक शोषण, हुंडाबळी आणि घरगुती हिंसाचार यावर कठोर कारवाई करणे. सामाजिक मानसिकता बदलणे. म्हणून स्वामी विवेकानंद म्हंनतात की, "मनुष्य की गरिमा को स्वीकृती देना, नारी जीवन को स्वतंत्र् और सकारात्मक बनाना I शारदा देवी के प्रसंग मे दोनो बाते ध्यान देणे योग्य है पती के साथ संन्यासिनी और पती के बाद सुहागिन I."५ पृष्ठ क्र.७० स्त्रियांकडे दुय्यम न पाहता त्यांच्याबद्दल समानतेची भावना निर्माण करणे. महिलांचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य स्वीकारणे.

महिलांचे राजकीय सशक्तीकरण, संसद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण. महिलांना राजकीय प्रक्रिया आणि नेतृत्व प्रशिक्षण देणे. स्त्री सशक्तीकरण हा फक्त महिलांसाठी नाही, तर संपूर्ण समाजाच्या भल्यासाठी आवश्यक आहे. जेव्हा स्त्री शिक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर होते, तेव्हा कुटुंब, समाज आणि देशाचा विकास होतो. सामाजिक समतोल राखण्यासाठी स्त्रियांना समान संधी देणे, त्यांच्या सुरक्षेची हमी देणे आणि त्यांना आर्थिक व राजकीयदृष्ट्या सक्षम करणे हे अनिवार्य आहे. स्त्री सशक्तीकरण हा केवळ एक पर्याय नाही, तर प्रगतिशील आणि न्याय्य समाज घडवण्यासाठीची एक गरज आहे.

**निष्कर्ष:**

सामाजिक समतोल राखण्यासाठी स्त्री सशक्तीकरण स्त्री आणि पुरुष हे समाजाच्या दोन महत्त्वाचे स्तंभ आहेत. जर समाजाचा विकास आणि प्रगती साधायची असेल, तर दोघांमध्ये समानता आणि समतोल असणे अत्यावश्यक आहे. मात्र, ऐतिहासिकदृष्ट्या स्त्रियांना अनेक क्षेत्रांत दुय्यम स्थान दिले गेले, ज्यामुळे सामाजिक समतोल बिघडला. हा समतोल पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी स्त्री सशक्तीकरण अनिवार्य आहे.

महिला सशक्तीकरणामुळे सामाजिक समतोल कसा राखला जातो? शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन: सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम स्त्रिया संपूर्ण समाजाच्या विकासाला हातभार लावतात. समान संधी आणि हक्क: स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी दिल्यास समाज अधिक प्रगतिशील बनतो.

महिला सशक्त झाल्यास कुटुंबाचा आणि पुढच्या पिढीचा विकास चांगल्या प्रकारे होतो. सुरक्षित आणि सन्मानाने जगणाऱ्या स्त्रिया आत्मविश्वासाने समाजात योगदान देऊ शकतात.

स्त्रिया निर्णय प्रक्रियेत सहभागी झाल्यास समाजातील असमानता कमी होते आणि न्याय्य समाजाची निर्मिती होते. स्त्री सशक्तीकरण हा केवळ महिलांसाठी नाही, तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. स्त्रियांना शिक्षण, आर्थिक संधी, आरोग्य, सुरक्षितता आणि राजकीय प्रतिनिधित्व देणे म्हणजे समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूक करणे होय. जिथे स्त्रिया स्वतंत्र आणि सक्षम असतात, तिथेच खऱ्या अर्थाने समतोल, न्याय्य आणि सशक्त समाज घडतो.

**उपसंहार**

सामाजिक समतोल राखण्यासाठी स्त्री सक्षमीकरण स्त्री सक्षमीकरण म्हणजे महिलांना शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि निर्णय घेण्याचे अधिकार देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे. जेव्हा स्त्रिया सक्षम होतात, तेव्हा संपूर्ण समाजाचा समतोल राखला जातो आणि स्त्री

सक्षमीकरण हा केवळ महिलांचा हक्क नसून संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. जेथे स्त्रिया सक्षम आणि स्वतंत्र असतात, तेथे समाज प्रगत, संतुलित आणि न्याय्य राहतो. म्हणूनच, सामाजिक समतोल राखण्यासाठी स्त्री सक्षमीकरण अनिवार्य आहे

**संदर्भ ग्रंथ सूची**

भारत्मुनीचे नाट्यशास्त्र बहुजानाविरुध्दचे सांस्कृतिक षडयंत्र-भीमपुत्र टेक्सास गायकवाड पृष्ठ क्र. ०३, प्रबुध्द प्रकाशन सोलापूर २०१२

१- हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनिती - डॉ.बाबासाहेब आंबेडकर,पृष्ठ क्र. २६,
सुगत प्रकाशन नागपूर, तृतीय आवृत्ती २००७

२- तत्रैव पृष्ठ क्र. २७

३- कृष्ण सूर या असुर-चंद्रभूषण सिह यादव,पृष्ठ क्र. ४२, सम्यक प्रकाशन नई दिल्ली -२०१३

४- विवेकानंद णे कहा “भारत शुद्रोका होगा”- एल. के. गौतम , पृष्ठ क्र. ७०, सिध्दार्थ बुक्स, रामनगर, दिल्ली-२०१९

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना : एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे**
प्राध्यापक नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज,कारंजा (घाडगे),जि.वर्धा
**Corresponding Author: प्रा. डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे**
**Email-** gawandemahendra9@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15696653**

**गोषवारा (सारांश)**

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही भारत सरकारद्वारे सुरू करण्यात आलेली एक प्रमुख योजना आहे. 15 जुलै 2015 रोजी या योजनेची सुरुवात झाली. या योजनेचा मुख्य उद्देश देशातील युवकांना उद्योग-संबंधित कौशल्ये शिकवून त्यांना चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आहे. या योजनेअंतर्गत, युवकांना विविध क्षेत्रांमध्ये मोफत प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांचे मूल्यांकन केले जावून त्यांना प्रमाणपत्र दिले जाते. यासोबतच, प्रशिक्षणार्थींना सरकारकडून आर्थिक सहाय्य देखील मिळते. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमुळे अनेक युवकांना फायदा झाला असून ते आता चांगल्या नोकरीच्या संधी प्राप्त करित आहेत. ही योजना देशाच्या विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्याच बरोबर या योजनेच्या अंमलबजावणीत काही अडचणी सुद्धा आहे. तसेच प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या युवकांनी जाणीवपूर्वक प्रशिक्षण घेतले पाहिजे, तरच ही योजना सफल होऊ शकते अन्यथा शासनाचे प्रयत्न व्यर्थ जाऊ शकते, ही सर्व जबाबदारी शासनाची तर आहेच, त्याच बरोबर प्रशिक्षण घेणाऱ्या युवाशक्तीची सुद्धा आहे हे विसरता कामा नये.

**बीज शब्द -** प्रधानमंत्री, कौशल्य, विकास, योजना, रोजगार

**प्रस्तावना-**

भारत हा जगातील सर्वात युवा देशांपैकी एक देश आहे. देशातील उपलब्ध युवाशक्तीला योग्य कौशल्ये आणि प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवणे हे एक मोठे आव्हान आहे. अनेक युवक औपचारिक शिक्षण पूर्ण करू शकत नाही किंवा त्यांच्याकडे विशिष्ट कौशल्यांचा अभाव असल्यामुळे त्यांना चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही. या स्थितीवर मात करण्याकरिता भारत सरकारने युवकांना कौशल्ये आत्मसाथ करण्यासाठी आणि त्यांना चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी एका राष्ट्रीय स्तरावरील योजनेची गरज जाणवल्यामुळे 15 जुलै 2015 रोजी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेची सुरुवात केली.

या योजनेचा मुख्य उद्देश देशातील युवकांना विविध उद्योगांमध्ये आवश्यक असलेल्या कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार क्षमता वाढविणे आहे. तसेच ज्यांच्याकडे पूर्वीपासून काही कौशल्ये आहेत, परंतु त्यांच्याकडे कोणतेही औपचारिक प्रमाणपत्र नाही, अशा व्यक्तींच्या कौशल्यांना मान्यता देणे आणि त्यांना प्रमाणित करणे हा देखील आहे.

या योजनेच्या माध्यमातून सरकारला देशातील कुशल मनुष्यबळ वाढवायचे होते, जेणेकरून विविध उद्योगांना प्रशिक्षित कामगार मिळू शकतील आणि देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. त्यामुळे, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही केवळ एक प्रशिक्षण योजना नसून, ती देशातील युवाशक्तीला सक्षम बनवून त्यांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे.

**संशोधन पद्धती-**

1. दुय्यम सामग्रीचा वापर करून वर्णनात्मक पद्धतीद्वारे हा शोध निबंध सादर करण्यात येत आहे.

2. दुय्यम सामग्री यामध्ये महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, आर्थिक समीक्षा, जनगणना अहवाल, मानव विकास निर्देशांक अहवाल, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

1. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेचे स्वरूप अभ्यासणे.
2. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेची आवश्यकता उद्दिष्टे व वैशिष्ट्य अभ्यासणे.
3. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेची कार्यपद्धती अभ्यासणे.
4. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेचे फायदे अभ्यासणे.
5. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेचे महत्त्व अभ्यासणे.

**गृहीते-**

1. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना युवकांना आत्मनिर्भर करण्यास सहकार्य करते.
2. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमुळे बेरोजगारीची समस्या सोडविण्यास मदत मिळते.
3. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमुळे प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होते.
4. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमुळे देशातील औद्योगिक क्षेत्राच्या समस्यांवर मात केली जाऊ शकते.
5. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना देशाच्या विकासात सहकार्य करते.

**कौशल्य विकास म्हणजे काय?**

कौशल्य विकास म्हणजे विविध प्रकारची कौशल्ये आणि क्षमता विकसित करणे, सुधारणे आणि वाढवणे होय. यामध्ये एखाद्या कार्याच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी किंवा वैयक्तिक आणि व्यावसायिक वाढीसाठी विशिष्ट क्षेत्रात ज्ञान, कौशल्य आणि क्षमता निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक आणि सतत प्रयत्न करणे होय. कौशल्य हे शिक्षण, प्रशिक्षण, जीवन अनुभव आणि सराव यासारख्या विविध माध्यमांद्वारे आत्मसाथ करता येते. कौशल्य म्हणजे एखादी गोष्ट योग्य आणि प्रभावीपणे करण्याची क्षमता होय, हे ज्ञान आणि अनुभवावर आधारित असते, कौशल्य हे शिक्षण प्रशिक्षणाद्वारे आत्मसात केलेले किंवा जन्मजात असू शकते.

कौशल्य विकासाची आवश्यकता बेरोजगारी कमी करण्याकरिता, शिक्षणातील गळती थांबवण्यासाठी, उद्योग आणि बाजाराच्या गरजा पूर्ण करण्याकरिता, आर्थिक विकासाकरिता, आत्मनिर्भरतेकरिता आहे.

कौशल्य विकासाच्या उपयोगितेचा विचार करता असे लक्षात येते की, मोफत प्रशिक्षण मिळते, गरजेनुसार आणि आवडीनुसार विविध क्षेत्रांतील कौशल्ये शिकण्याची संधी मिळते, प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सरकारमान्य प्रमाणपत्र मिळते, त्यामुळे नोकरी मिळण्यास मदत होते. अनेक प्रशिक्षण संस्था प्रशिक्षणानंतर नोकरी मिळवून देण्यासाठी मदत करतात. उद्योजकतेसाठी प्रोत्साहन मिळते काही अभ्यासक्रम युवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन आणि मदत करतात. सामाजिक विकास होतो, कुशल मनुष्यबळ देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या योजनेमुळे देशाच्या प्रगतीला चालना मिळते. आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळते, लिंग, जात, धर्म किंवा आर्थिक स्थितीचा विचार न करता, इच्छुक असलेल्या कोणत्याही भारतीय नागरिकाला या योजनेचा लाभ घेता येतो.

थोडक्यात, कौशल विकास योजना ही आजच्या काळात युवकांसाठी अत्यंत आवश्यक, उपयुक्त आणि महत्त्वाची योजना आहे. त्यामुळे व्यक्ती आणि देश दोघांनाही फायदा होतो.

**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना-**

भारतातील बेरोजगारीची समस्या विचारात घेऊन ती दूर करण्याच्या दृष्टिकोनातून एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना सामोर आलेली आहे.

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही भारत सरकारद्वारे दूरदृष्टीकोनातून चालवली जाणारी एक महत्त्वाकांक्षी योजना असून, या योजनेचा मुख्य उद्देश देशातील युवकांना त्यांच्या क्षमते व आवश्यकतेनुसार विविध कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देवून रोजगारक्षम बनवणे आहे.

या योजनेच्या माध्यमाद्वारे विविध क्षेत्रांतील मागणीनुसार प्रशिक्षण कार्यक्रम चालवले जातात, त्यामुळे युवकांना चांगले जीवनमान घडवण्याकरिता रोजगार संधी मिळते.

**प्रधानमंत्री कौशल विकास योजनेची पार्श्वभूमी व सुरुवात-**

1. भारतातील युवा पिढीला कौशल्ये शिकून चांगले रोजगार मिळवता यावेत, या उद्देशाने भारत सरकारने 15 जुलै 2015 रोजी प्रधानमंत्री कौशल विकास योजनेची सुरुवात केली.
2. ही योजना कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या अंतर्गत येते आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळामार्फत तिची अंमलबजावणी केली जाते.
3. पहिला टप्पा (PMKVY 1.0)-
4. पहिला टप्पा 2015 मध्ये सुरू झाला आणि त्याचा मुख्य उद्देश मोठ्या संख्येने भारतीय युवकांना उद्योग-संबंधित कौशल्ये शिकवणे होता. यामध्ये अल्पकालीन प्रशिक्षण आणि पूर्वीच्या अनुभवांना मान्यता यांवर लक्ष केंद्रित केले गेले.

5. दुसरा टप्पा (PMKVY 2.0)-
6. पहिला टप्पा यशस्वी झाल्यानंतर, 2016 ते 2020 या कालावधीकरिता प्रधानमंत्री कौशल विकास योजना 2.0 सुरू करण्यात आली. या टप्प्यात योजनेचा विस्तार करण्यात आला, अधिक क्षेत्रांचा आणि भौगोलिक भागांचा समावेश करण्यात आला. 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया' आणि 'स्वच्छ भारत' यांसारख्या इतर सरकारी उपक्रमांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. या टप्प्यात 1 कोटी युवकांना कौशल्ये शिकवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.
7. तिसरा टप्पा (PMKVY 3.0)-
8. 15 जानेवारी 2021 रोजी प्रधानमंत्री कौशल विकास योजनेचा तिसरा टप्पा सुरू करण्यात आला. या टप्प्यात मागणी-आधारित कौशल्ये आणि विकेंद्रीकृत दृष्टिकोन यावर अधिक भर देण्यात आला. कोविड-19 मुळे झालेल्या बदलांना लक्षात घेऊन, नवीन युगातील कौशल्ये व डिजिटल प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित केले गेले. या टप्प्यात 8 लाख युवकांना प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले.
9. चौथा टप्पा (PMKVY 4.0)-
10. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 2023-24 च्या अर्थसंकल्पात प्रधानमंत्री कौशल विकास योजना 4.0 ची घोषणा केली. या टप्प्यात लाखो युवकांना कौशल्ये शिकवण्याचे उद्दिष्ट आहे आणि यात नवीन तंत्रज्ञान आणि उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण देण्यावर भर दिला जाईल.
11. प्रधानमंत्री कौशल विकास योजनेत वेळोवेळी बदलत्या आवश्यकतेनुसार सुधारणा केली आहे व आज ही योजना देशातील युवकांना कौशल्ये शिकवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण योजना ठरत आहे.

**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेची वैशिष्ट्ये-**

1. मोफत प्रशिक्षण- या योजनेद्वारे प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना कोणतेही शुल्क भरावे लागत नाही, म्हणजेच हे प्रशिक्षण पूर्णपणे निशुल्क असते.
2. उद्योग-आधारित अभ्यासक्रम- या योजनेद्वारे जे प्रशिक्षण देण्यात येते, त्याचे अभ्यासक्रम उद्योगांच्या आवश्यकतेनुसार तयार केलेले असतात, त्यामुळे प्रशिक्षणानंतर रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास सहाय्य मिळते.
3. प्रशिक्षकांवर लक्ष केंद्रित- या योजनेअंतर्गत प्रशिक्षकांनाही योग्य प्रशिक्षण दिले जात असल्यामुळे ते विद्यार्थ्यांना काळानुरूप आवश्यकतेनुसार योग्य मार्गदर्शन करू शकतात. त्यामुळे प्रशिक्षणानंतर रोजगाराच्या संधी मिळणे सहज शक्य होते.
4. प्रमाणपत्र- प्रशिक्षणार्थ्यांने यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यास शासनमान्य प्रमाणपत्र प्राप्त होते, ते देशात कोठेही रोजगाराकरिता ग्राह्य मानले जाते.
5. आर्थिक सहाय्य- काही विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून आर्थिक सहाय्य देखील मिळते.
6. रोजगार मिळण्यास सहाय्य- अनेक प्रशिक्षण केंद्रांद्वारे प्रशिक्षणानंतर रोजगार मिळवण्याकरिता मदत केली जाते.
7. पूर्व अनुभवाला मान्यता - ज्यांच्याकडे पूर्वीपासून कौशल्ये आहेत किंवा ज्यांनी आधी कोठे प्रशिक्षण प्राप्त केले आहे पण त्यांच्याकडे कोणतेही औपचारिक प्रमाणपत्र नाही, अशा व्यक्तींचे कौशल्य तपासून त्यांना प्रमाणपत्र बहाल केले जाते.

**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेचे उद्दिष्ट्ये-**

- अधिकाधिक युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहित करणे.
- युवकांना चांगले रोजगार मिळवण्यासाठी सक्षम बनवणे.
- बेरोजगारीच्या निर्माण झालेल्या समस्येची तिव्रता कमी करणे.
- देशाच्या आर्थिक विकासात युवकांचे सक्रिय योगदान प्राप्त करणे.
- देशातील उद्योगधंद्यांच्या आवश्यकतेनुसार कुशल मनुष्यबळ निर्माण करणे.
- कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कौशल्यांमध्ये सुधारणाकरून देशाच्या विकासात सहकार्य घेणे.
- पूर्वीपासून असलेल्या कौशल्यांना मान्यता देणे.

**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेची कार्यपद्धती-**

1. प्रशिक्षण केंद्रांची निवड आणि नोंदणी-

या योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी देशभरात प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली आहे. इच्छुक संस्था किंवा कंपन्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाकडे प्रशिक्षण केंद्र म्हणून नोंदणी करतात. नोंदणीच्या वेळी संस्थेची पात्रता, पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षकांची गुणवत्ता तपासली जाते.

2. अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण शुल्क-

राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ विविध क्षेत्रांतील उद्योग-आधारित अभ्यासक्रम तयार करत असून या अभ्यासक्रमांचा उद्देश प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारासाठी तयार करणे हा असतो. या योजनेअंतर्गत प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असते. प्रशिक्षण शुल्क सरकारद्वारे प्रशिक्षण केंद्रांना दिले जाते.

3. प्रशिक्षणार्थींची निवड व नोंदणी-

१८ ते ३५ वयोगटातील कोणताही भारतीय नागरिक या योजनेत सहभागी होऊ शकतो. काही विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी वयोमर्यादेत शिथिलता दिली जाते. इच्छुक उमेदवार ऑनलाइन किंवा प्रशिक्षण केंद्रांवर जाऊन आपली नोंदणी करू शकतात. नोंदणी करताना आधार कार्ड, शैक्षणिक प्रमाणपत्र आणि बँक खात्याची माहिती आवश्यक असते.

4. प्रशिक्षण-

नोंदणीकृत प्रशिक्षण केंद्रांवर निवडलेल्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणात लेखी आणि प्रात्यक्षिक दोन्हीचा समावेश असतो, त्यामुळे प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. प्रशिक्षणाचा कालावधी अभ्यासक्रमानुसार ठरत असतो.

5. मूल्यांकन व प्रमाणन-

प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रशिक्षणार्थींचे अधिकृत संस्थेद्वारे मूल्यांकन केले जावून, यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांना सरकारद्वारे मान्यताप्राप्त प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र देशभरात ग्राह्य धरले जाते.

6. रोजगार सहाय्य-

अनेक प्रशिक्षण केंद्रे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी मिळवून देण्यासाठी मदत करतात. याकरिता रोजगार मेळावे आयोजित केले जातात किंवा विविध कंपन्यांमध्ये त्यांच्या शिफारसी पाठवल्या जातात. काही अभ्यासक्रमांमध्ये प्रशिक्षणानंतर थेट नोकरीची संधी देखील उपलब्ध असते.

7. पाठपुरावा व गुणवत्ता नियंत्रण-

योजनेच्या कार्यपद्धतीमध्ये प्रशिक्षण केंद्रांचे नियमित निरीक्षण आणि मूल्यांकनाचा समावेश असतो. प्रशिक्षणाची गुणवत्ता राखण्यासाठी MSDE आणि NSDC द्वारे वेळोवेळी मार्गदर्शन आणि सूचना दिल्या जातात. प्रशिक्षण पूर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांकडून अभिप्राय घेतला जातो, त्यामुळे योजनेत सुधारणा करता येतात. थोडक्यात, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही एक सुनियोजित प्रक्रिया आहे, ज्यामध्ये योग्य प्रशिक्षण केंद्रे निवडणे, उद्योग-आधारित प्रशिक्षण देणे, निष्पक्ष मूल्यांकन करणे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे यावर लक्ष केंद्रित केले जाते.

**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेचे फायदे-**

- बेरोजगार युवकांना नव-नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळते व त्यातून रोजगाराच्या नव-नवीन संधीची उपलब्धता होतात.
- चांगल्या रोजगारांच्या संधी उपलब्ध होतात. कमी शिक्षण झालेल्यांनाही कौशल्य विकासातून चांगला रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता वाढते.
- कौशल्य विकास योजनेद्वारे स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन आणि मदत मिळते.
- उद्योगांना कुशल कामगार मिळतात व कुशल मानवसंसाधनामुळे उद्योगांच्या उत्पादकतेत वाढ होते.
- राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळते.

**प्रधानमंत्री कौशल विकास योजनेतील महत्त्वाचे बदल-**

1. प्रधानमंत्री कौशल विकास योजना -
2. ही योजना 2015 मध्ये सुरू करण्यात आली असून तिचा उद्देश युवकांना अल्पकालीन कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांना चांगल्या नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे होता.
3. प्रधानमंत्री कौशल विकास योजना 2.0 (2016-2020)-
4. या कालखंडात कौशल विकास प्रशिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यावर आणि उद्योगांच्या मागणीनुसार कौशल्ये विकासावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले. प्रशिक्षणाचा कालावधी वाढवण्यात येवून प्रमाणपत्रांना विशेष महत्त्व देण्यात आले.
5. प्रधानमंत्री कौशल विकास योजना 3.0 (2020-2022)-
6. या कालखंडात कोविड-19 महामारीमुळे निर्माण झालेल्या परिवर्तनाचा सामना करण्यासाठी डिजिटल आणि ऑनलाईन प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात आला असून मागणी आधारित कौशल्ये आणि नवीन युगातील कौशल्यांचा समावेश करण्यात आला.
7. प्रधानमंत्री कौशल विकास योजना 4.0 (2023-24)-
8. च्या अर्थसंकल्पात नवीन सुधारणांची घोषणा करण्यात आली. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, 3D प्रिंटिंग या सारख्या आधुनिक कौशल्यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच उद्योगांसोबत भागीदारी वाढवून प्रशिक्षण अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न आहे.

**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीं-**

**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना 4.0-**

- या टप्प्याचे उद्दिष्ट आर्थिक वर्ष 2022-23 आणि आर्थिक वर्ष 2025-26 दरम्यान 1.5 कोटी उमेदवारांना कौशल्य प्रदान करणे आहे.
- कौशल्य भारत कार्यक्रमाचा भाग म्हणून PMKVY 4.0 साठी शिफारस केलेला एकूण खर्च रु.6,000 कोटी आहे.
- 2024-25 आर्थिक वर्षासाठी, अर्थसंकल्पीय अंदाज (BE) रु. 2,685.64 कोटी आहे.
- 2024-25 साठी सुधारित अंदाज (RE) रु. 2,318.00 कोटी आहे.
- सप्टेंबर 2024 पर्यंत, वापर रु. 895.21 कोटी होता, जरी संपूर्ण अंमलबजावणी मंत्रिमंडळाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत होती.
- आर्थिक वर्ष 2023-24 साठी, वाटप केलेले बजेट रु. 920.00 कोटी होते, त्यापैकी रु. 502 कोटी वापरण्यात आले.

**प्रधानमंत्री कौशल विकास योजनेत परिवर्तनाची आवश्यकता का आहे?**

- औद्योगिक मागणीत झालेल्या परिवर्तनाशी समायोजन साधण्याकरिता-

  तंत्रज्ञानात वेगाने परिवर्तन होत असल्यामुळे, उद्योगांना नव-नवीन कौशल्यांची आवश्यकता निर्माण होते. त्यामुळे अभ्यासक्रमात आवश्यकता व वेळेनुसार परिवर्तन करणे आवश्यक आहे.

- रोजगारक्षमतेत वाढ करण्याकरिता-

  कौशल विकास योजनेअंतर्गत मिळणारे प्रशिक्षण बदलत्या औद्योगिक आवश्यकतेनुसार असल्यामुळे, युवकांना सहज चांगल्या नोकरी मिळण्यास मदत होते.

- गुणवत्तेत सुधारणा करण्याकरिता-

  केवळ प्रशिक्षण देऊन चालत नाही, तर ते उच्च दर्जाचे असावे लागते. त्यामुळे प्रशिक्षणाच्या पद्धती आणि मूल्यांकनात सुधारणा करणे महत्त्वाचे असल्यामुळे परिवर्तन करणे आवश्यक आहे.

- आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्याकरिता-

  आधुनिक युगात डिजिटल कौशल्ये व नवीन तंत्रज्ञानाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे अभ्यासक्रमात यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

**प्रधानमंत्री कौशल विकास योजनेची फलश्रुती-**

- या योजनेअंतर्गत लाखो युवकांना प्रशिक्षण मिळालेले असून त्यापैकी अनेकांना रोजगार प्राप्त झाला आहे.
- उद्योग आणि प्रशिक्षण संस्था यांच्यात समन्वय वाढला आहे, त्यामुळे प्रशिक्षण अधिक उपयुक्त ठरत आहे.
- माजी अनुभवाचे मूल्यांकन घटकामुळे अनेक अनुभवी लोकांना त्यांच्या कौशल्यांची औपचारिक मान्यता मिळाली आहे.

**आव्हाने व सुधारणांची गरज-**

कौशल्य विकास योजनांची फलश्रुती सकारात्मक असली तरी, काही आव्हाने अजूनही आहेत.

प्लेसमेंटची खात्री- प्रशिक्षणानंतर सर्वांना नोकरी मिळवून देणे हे एक मोठे आव्हान आहे. त्यामुळे प्लेसमेंट दरात सुधारणा करण्याची गरज आहे.

दीर्घकालीन प्रशिक्षण- अनेक योजनांमध्ये अल्पकालीन प्रशिक्षणावर अधिक भर दिला जात असल्यामुळे सखोल कौशल्ये विकसित होण्यात मर्यादा येतात. त्यामुळे दीर्घकालीन प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

गुणवत्ता नियंत्रण- प्रशिक्षण केंद्रांची गुणवत्ता आणि प्रशिक्षकांची क्षमता यावर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे.

जागरूकता- अनेक पात्र युवकांना या योजनांविषयी पुरेशी माहिती नसते, त्यामुळे जनजागृती वाढवणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष-**

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही भारत सरकारद्वारे 15 जुलै 2015 रोजी सुरू करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश देशातील युवकांना उद्योग-संबंधित कौशल्ये शिकवून चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आहे. या योजनेअंतर्गत, युवकांना विविध क्षेत्रांमध्ये मोफत प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांचे मूल्यांकन केले जावून त्यांना प्रमाणपत्र दिले जाते. यासोबतच, प्रशिक्षणार्थींना सरकारकडून आर्थिक सहाय्य देखील मिळते.

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमुळे अनेक युवकांना फायदा झाला असून ते आता चांगल्या नोकरीच्या संधी प्राप्त करित आहेत. ही योजना देशाच्या विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही केवळ एक प्रशिक्षण योजना नसून, ती देशातील युवाशक्तीला सक्षम बनवून त्यांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे.

त्याच बरोबर या योजनेच्या अंमलबजावणीत काही अडचणी सुद्धा आहे. तसेच प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्यांनी युवकांनी जाणीवपूर्वक

प्रशिक्षण घेतले पाहिजे, तरच ही योजना सफल होऊ शकते अन्यथा शासनाचे प्रयत्न व्यर्थ जाऊ शकते, ही सर्व जबाबदारी शासनाची तर आहेच, त्याच बरोबर प्रशिक्षण घेणाऱ्या युवाशक्तीची सुद्धा आहे हे विसरता कामा नये.

एकंदरीत, कौशल्य विकास योजनांची फलश्रुती देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. या योजनांमध्ये सुधारणा करून आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करून अधिक चांगले परिणाम मिळू शकते.

**संदर्भ**


1. प्रा. डॉ. रक्षित मदन बागडे - मानवी विकासाचे अर्थशास्त्र
2. डॉ. जी. एन. झांबरे -भारतीय अर्थव्यवस्था
3. प्रा. बी. एल. जिभकाटे व डॉ. सुधाकर शास्त्री -भारतीय अर्थव्यवस्था
4. 4.डॉ. राजू श्रीरामे- भारतीय अर्थव्यवस्था
5. विविध वर्तमान पत्रे, मासिके, त्रैमासिक, वार्षिक अहवाल
6. राष्ट्रीय कौशल्य विकास नीति- भारत सरकार श्रम एवं रोजगार मंत्रालय, रोजगार एवं प्रशिक्षण महानिदेशालय विविध इंटरनेट सायटेशन
7. https://kaushalya.mahaswayam.gov.in
8. महाराष्ट्र राज्य कौशल विकास सोसायटी - MSSDS – Mahaswayam Shodhganga
9. https://shodhganga.inflibnet.ac.in
10. प्रधानमंत्री कौशल विकास योजना का एक मूल्यांकनNEXT IAS
11. https://www.nextias.com
12. कौशल भारत: चुनौतियां, समाधान और सरकारी योजनाएं
13. ResearchGate
14. https://www.researchgate.net
15. (पीडीएफ) प्रधानमंत्री कौशल विकास योजना पर एक अनुभवजन्य अध्ययन 1
16. Drishti IAS
17. https://www.drishtiias.com
18. प्रधानमंत्री कौशल विकास योजनाVikaspedia
19. https://socialwelfare.vikaspedia.in
20. प्रधानमंत्री कौशल विकास योजना : एक नजर - Social welfare

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# भारतातील डिजिटल शिक्षणाच्या संधी आणि आव्हाने

**प्रा. नाजीर पठाण**
एस. पी. डी. एम. कॉलेज, शिरपूर
**Corresponding Author: प्रा. नाजीर पठाण**
**Email:-** Nsf.his@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15696685**

**सारांश:**

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये भारतातील डिजिटल शिक्षणाचा विकास, त्याच्या संधी आणि आव्हानांचा अभ्यास केला आहे. भारतासारख्या विकसनशील देशात डिजिटल शिक्षण हे शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याची क्षमता बाळगते. कोविड-19 महामारीनंतर डिजिटल शिक्षणाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. या पेपरमध्ये डिजिटल शिक्षणाच्या विविध पैलूंचा अभ्यास करून, सरकारी उपक्रम, खासगी क्षेत्राचे योगदान, तांत्रिक पायाभूत सुविधा, डिजिटल विभाजन आणि भविष्यातील संभाव्य मार्गांचे विश्लेषण केले आहे. संशोधनातून हे स्पष्ट होते की डिजिटल शिक्षणाचा विस्तार आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी धोरणात्मक दृष्टिकोन, पायाभूत सुविधांचा विकास, डिजिटल साक्षरता वाढवणे आणि समावेशी शिक्षण पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे.

**मुख्य शब्द:** डिजिटल शिक्षण, ई-लर्निंग, एडटेक, शैक्षणिक तंत्रज्ञान, डिजिटल विभाजन, शिक्षण धोरण, ऑनलाइन शिक्षण

**प्रस्तावना**

२१व्या शतकात डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास आणि प्रसार हा मानवी जीवनातील सर्व क्षेत्रांना प्रभावित करणारा महत्त्वपूर्ण घटक ठरला आहे. शिक्षण क्षेत्र देखील या डिजिटल क्रांतीपासून अलिप्त राहिलेले नाही. ज्ञानाची प्राप्ती, त्याचे आदान-प्रदान आणि शिक्षण प्रक्रियेत डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. भारतासारख्या विकसनशील देशात, जेथे शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्ता यांसंदर्भात अनेक आव्हाने आहेत, तेथे डिजिटल शिक्षण एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून उदयास येत आहे.

"डिजिटल शिक्षण"[1] या संज्ञेचा अर्थ केवळ ऑनलाइन शिक्षण पद्धती पुरता मर्यादित नाही. त्यामध्ये शिक्षण प्रक्रियेत डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी, आकर्षक आणि वैयक्तिकीकृत शिक्षण अनुभव देण्याचा समावेश होतो. यात मोबाइल ॲप्स, ऑनलाइन कोर्सेस, व्हर्च्युअल क्लासरूम, डिजिटल पाठ्यपुस्तके, शैक्षणिक गेम, व्हिडिओ ट्यूटोरियल्स आणि इतर अनेक साधनांचा समावेश होतो.

कोविड-19 महामारीने जगभरातील शैक्षणिक संस्थांना त्यांच्या पारंपरिक शिक्षण पद्धतींना पुनर्विचार करण्यास भाग पाडले. भारतात देखील, महामारीच्या काळात शाळा आणि महाविद्यालये बंद असताना, डिजिटल शिक्षण एक मुख्य पर्याय म्हणून समोर आले. या कालावधीत भारतातील डिजिटल शिक्षणाच्या क्षमता आणि मर्यादा दोन्ही स्पष्टपणे समोर आल्या.[1]

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये, भारतातील डिजिटल शिक्षणाच्या वर्तमान स्थितीचे विश्लेषण करून त्यातील संधी आणि आव्हानांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारी उपक्रम, खासगी क्षेत्राचे योगदान, तांत्रिक पायाभूत सुविधा, डिजिटल विभाजन, शिक्षक प्रशिक्षण आणि भविष्यातील संभाव्य मार्ग या विविध पैलूंचा अभ्यास या संशोधनात समाविष्ट आहे.

**२. भारतातील डिजिटल शिक्षणाचा ऐतिहासिक विकास**

भारतातील डिजिटल शिक्षणाचा प्रवास १९८० च्या दशकात संगणकाच्या शिक्षण क्षेत्रातील प्रवेशापासून सुरू झाला. तथापि, वास्तविक डिजिटल शिक्षणाचा प्रसार २१व्या शतकाच्या प्रारंभापासून, विशेषतः इंटरनेटच्या व्यापक उपलब्धतेनंतर, अधिक गतिमान झाला. भारतातील डिजिटल शिक्षणाच्या विकासाचे टप्पे खालीलप्रमाणे समजून घेता येतील:

**२.१ प्रारंभिक टप्पा (१९८०-२०००)**

१९८० च्या दशकात, भारतात शिक्षण क्षेत्रात संगणकाचा वापर मर्यादित होता. १९८४ मध्ये भारत सरकारने "कॉम्प्युटर लिटरसी अँड स्टडीज इन स्कूल्स" (क्लास) हा कार्यक्रम सुरू केला, ज्याचा उद्देश माध्यमिक शाळांमध्ये संगणक शिक्षण देणे हा होता. १९९० च्या दशकात, विशेषतः महानगरांमधील काही खासगी

शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या. तथापि, हा प्रयत्न अत्यंत मर्यादित स्वरूपाचा होता आणि संगणकाचा वापर प्रामुख्याने संगणक विज्ञान विषयाच्या शिक्षणापुरता मर्यादित होता.

**२.२ विस्तार टप्पा (२००१-२०१०)**

२००१ मध्ये भारत सरकारने "सर्व शिक्षा अभियान" या मोहिमेअंतर्गत शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर भर दिला. २००४ मध्ये प्रारंभ झालेल्या "एडुसॅट" या शैक्षणिक उपग्रहाने दूरस्थ शिक्षणाला चालना दिली. या काळात अनेक शैक्षणिक संस्थांनी आपली वेबसाइट सुरू केली आणि ई-मेलचा वापर शैक्षणिक संवादासाठी वाढू लागला. २००६ मध्ये भारत सरकारने "नॅशनल मिशन ऑन एज्युकेशन थ्रू इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी" (NME-ICT) सुरू केले, ज्याचा उद्देश शिक्षणात ICT चा वापर वाढवणे हा होता.

**२.३ रूपांतरण टप्पा (२०११-२०१९)**

२०११ नंतर, स्मार्टफोन आणि मोबाइल इंटरनेटच्या वाढत्या प्रसारामुळे डिजिटल शिक्षणाचा विस्तार झपाट्याने झाला. या काळात अनेक एडटेक कंपन्यांचा उदय झाला, जसे की बायजू'स, अनअकॅडमी, वेदांतू इत्यादी. २०१५ मध्ये सरकारने "डिजिटल इंडिया" हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू केला, ज्यामध्ये शिक्षणाचे डिजिटलायझेशन हा एक महत्त्वाचा घटक होता. "स्वयं" )SWAYAM) प्लॅटफॉर्मची स्थापना करून सरकारने मूक्स )Massive Open Online Courses) च्या माध्यमातून उच्च शिक्षणाच्या विस्ताराचा प्रयत्न केला.

**२.४ कोविड-१९ नंतरचा टप्पा (२०२० - वर्तमान)**

कोविड-१९ महामारीने भारतातील डिजिटल शिक्षणाच्या विकासात एक महत्त्वपूर्ण टप्पा आणला. २०२० मध्ये देशभरातील शैक्षणिक संस्था बंद झाल्यानंतर, ऑनलाइन शिक्षणाकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. झूम, गुगल मीट, माइक्रोसॉफ्ट टीम्स यासारख्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग प्लॅटफॉर्मचा वापर व्हर्च्युअल क्लासरूमसाठी वाढला. एडटेक कंपन्यांची वाढ झपाट्याने झाली आणि सरकारनेही अनेक डिजिटल उपक्रम सुरू केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे.

## ३. भारतातील डिजिटल शिक्षणाची वर्तमान स्थिती

**३.१ सरकारी उपक्रम**

भारत सरकारने डिजिटल शिक्षणाच्या प्रसारासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले आहेत:

- **दीक्षा (DIKSHA)**: डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर फॉर नॉलेज शेअरिंग हा शालेय शिक्षकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शैक्षणिक सामग्री प्रदान करणारा प्लॅटफॉर्म आहे.
- **स्वयं (SWAYAM)**: हा भारत सरकारचा मूक्स प्लॅटफॉर्म आहे, ज्यावर शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
- **स्वयं प्रभा**: हे शैक्षणिक डीटीएच चॅनेल्स आहेत, जे विविध विषयांवरील शैक्षणिक सामग्री प्रसारित करतात.
- **ई-पाठशाला**: ही शैक्षणिक सामग्री प्रदान करणारी मोबाइल अॅप आणि वेबसाइट आहे.
- **नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया (NDLI)**: ही डिजिटल शैक्षणिक संसाधनांची विशाल भांडारांची एक एकात्मिक आणि एकल-प्रवेश-बिंदू आहे.

**PM eVIDYA**:

कोविड-१९ महामारी दरम्यान सुरू केलेला हा कार्यक्रम डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाची निरंतरता सुनिश्चित करण्यासाठी आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**

या नवीन धोरणात डिजिटल शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले असून, नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम )NETF) ची स्थापना करण्याची तरतूद केली आहे[2].

**३.२ खासगी क्षेत्राचे योगदान**

भारतात डिजिटल शिक्षणाच्या क्षेत्रात खासगी क्षेत्राचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे. बायजू'स, अनअकॅडमी, वेदांतू, टॉपर, अप्टिटूड, डौट्नट, ग्रेट लर्निंग यासारख्या अनेक एडटेक कंपन्या भारतात डिजिटल शिक्षण सेवा प्रदान करत आहेत. या कंपन्यांनी इंटरॅक्टिव्ह लर्निंग अनुभव, व्यक्तिगत शिक्षण आणि विविध विषयांवरील सामग्री विकसित केली आहे. कोर्सेरा, एडएक्स, युडेमी यासारख्या आंतरराष्ट्रीय प्लॅटफॉर्मवर भारतीय विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तसेच, अनेक भारतीय शैक्षणिक संस्थांनी आपले स्वतःचे ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म विकसित केले आहेत. अनेक शाळा आणि महाविद्यालयांनी लर्निंग मॅनेजमेंट सिस्टम (LMS) अवलंबली आहे आणि डिजिटल क्लासरूम स्थापित केले आहेत. याशिवाय, अनेक शैक्षणिक संस्थांनी अॅप्स आणि वेब पोर्टल्स विकसित केली आहेत.

**३.३ एडटेक स्टार्टअप्स आणि गुंतवणूक**

भारतातील एडटेक क्षेत्र जगातील सर्वाधिक गतिमान विकसित होणाऱ्या क्षेत्रांपैकी एक आहे. २०२० मध्ये कोविड-१९ महामारीमुळे एडटेक स्टार्टअप्सना मोठी चालना मिळाली. २०२० मध्ये भारतातील एडटेक क्षेत्रात अंदाजे २.२२ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक झाली, जी २०१९ च्या तुलनेत दुप्पट होती[3].

बायजू'स हे भारतातील सर्वात मूल्यवान एडटेक स्टार्टअप असून, त्याचे मूल्यांकन २०२१ मध्ये १६ अब्ज

डॉलर्सपेक्षा जास्त होते. इतर महत्त्वाच्या एडटेक स्टार्टअप्समध्ये अनअकॅडमी, वेदांतू, ईड्युकॉम्प यांचा समावेश आहे.

**४. भारतातील डिजिटल शिक्षणाच्या संधी**

डिजिटल शिक्षण भारतातील शिक्षण क्षेत्रात अनेक संधी प्रदान करते:

**४.१ शिक्षणाची पोहोच वाढवणे**

भारतात, विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागात, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उपलब्धता हे एक मोठे आव्हान आहे. डिजिटल शिक्षण या आव्हानावर मात करण्याची क्षमता बाळगते:

**भौगोलिक अडथळे दूर करणे**:

डिजिटल शिक्षणामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सामग्री आणि शिक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळते.

**आर्थिक अडथळे कमी करणे**:

अनेक डिजिटल शिक्षण संसाधने मोफत किंवा कमी खर्चात उपलब्ध आहेत, जे आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहे.

**शिक्षकांची कमतरता भरून काढणे**

भारतातील अनेक शाळांमध्ये विशिष्ट विषयांच्या शिक्षकांची कमतरता आहे. डिजिटल शिक्षणामुळे ही कमतरता काही प्रमाणात भरून निघू शकते.

**४.२ शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे**

डिजिटल शिक्षण विद्यार्थ्यांना अधिक आकर्षक आणि प्रभावी शिक्षण अनुभव प्रदान करू शकते:

**इंटरॅक्टिव्ह लर्निंग**:

अनिमेशन, सिम्युलेशन, गेमिफिकेशन इत्यादी तंत्रांद्वारे विद्यार्थ्यांना अधिक इंटरॅक्टिव्ह पद्धतीने शिकता येते.

**वैयक्तिकीकृत शिक्षण**:

डिजिटल शिक्षण साधनांमुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजा, क्षमता आणि प्रगतीच्या दरानुसार शिक्षण सामग्री आणि पद्धती अनुकूलित करता येतात.

**रिअल-टाइम फीडबॅक**:

डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांना त्यांच्या कामगिरीबद्दल त्वरित प्रतिसाद मिळू शकतो, ज्यामुळे त्यांची प्रगती सुधारण्यास मदत होते[4].

**४.३ जीवन-आधारित शिक्षण**

आधुनिक जगात, जेथे तंत्रज्ञान सतत विकसित होत आहे, तेथे नव्या कौशल्यांचे अद्ययावत राहणे आवश्यक आहे. डिजिटल शिक्षण जीवन-आधारित शिक्षणास पाठिंबा देते. डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्मवर, लोक त्यांच्या सोयीनुसार, त्यांच्या गतीने आणि त्यांच्या आवडीच्या विषयांवर शिकू शकतात. कामगारांना त्यांच्या वर्तमान नोकरीसोबत नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांची कारकीर्द प्रगत होऊ शकते. डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्मवर नेहमीच नवीन आणि अद्ययावत सामग्री उपलब्ध असते, ज्यामुळे विद्यार्थी आणि व्यावसायिक आपले ज्ञान अद्ययावत ठेवू शकतात.

**४.४ आर्थिक संधी**

डिजिटल शिक्षण क्षेत्र आर्थिक वाढीची आणि रोजगार निर्मितीची मोठी संधी प्रदान करते. भारतातील एडटेक बाजार २०२० मध्ये २.८ अब्ज डॉलर्स होता आणि अंदाजे २०२५ पर्यंत १०.४ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. एडटेक कंपन्या, ऑनलाइन शिक्षक, कंटेंट डेव्हलपर, प्रोग्रामर, यूआय/यूएक्स डिझाइनर इत्यादींसाठी रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होत आहेत.[5] डिजिटल शिक्षण क्षेत्रात अनेक उद्योजकांसाठी नवीन व्यवसाय सुरू करण्याच्या संधी आहेत.

**५. भारतातील डिजिटल शिक्षणाच्या आव्हाने**

डिजिटल शिक्षण अनेक संधी प्रदान करत असले तरी, भारतात त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसमोर अनेक आव्हाने आहेत:

**५.१ डिजिटल विभाजन**

डिजिटल विभाजन हे भारतातील डिजिटल शिक्षणासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. भारतात, विशेषतः ग्रामीण भागात, इंटरनेट कनेक्टिव्हिटी अजूनही एक मोठी समस्या आहे. २०२१ च्या आकडेवारीनुसार, भारतात इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ८२५ दशलक्ष होती, जी देशाच्या लोकसंख्येच्या जवळपास ६०% आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन, टॅबलेट किंवा लॅपटॉप यासारखी डिजिटल साधने नाहीत. कोविड-१९ महामारीच्या काळात, अंदाजे ७०% ग्रामीण विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणापासून वंचित राहिले कारण त्यांच्याकडे आवश्यक डिजिटल साधने नव्हती. आर्थिक विषमतेमुळे निर्माण होणारा डिजिटल विभाजन हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. गरीब कुटुंबांना डिजिटल साधने खरेदी करणे आणि इंटरनेट कनेक्शनचा खर्च परवडत नाही[5].

**५.२ डिजिटल साक्षरता**

डिजिटल शिक्षणासाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे, परंतु ती भारतात अजूनही एक आव्हान आहे. अनेक विद्यार्थ्यांना, विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील, डिजिटल साधने आणि प्लॅटफॉर्म वापरण्याचे पुरेसे ज्ञान आणि कौशल्य नाही. अनेक शिक्षकांना डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि कौशल्य नाही. एका अभ्यासानुसार, भारतातील फक्त २०% शिक्षक डिजिटल शिक्षण साधनांचा प्रभावीपणे वापर करण्यास सक्षम आहेत. लहान मुलांच्या डिजिटल शिक्षणात

पालकांची भूमिका महत्त्वाची असते. तथापि, अनेक पालकांना डिजिटल साक्षरतेचा अभाव आहे, ज्यामुळे ते त्यांच्या मुलांना योग्य मार्गदर्शन करू शकत नाहीत[६].

**५.३ गुणवत्तापूर्ण सामग्री**

डिजिटल शिक्षणाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात उपलब्ध सामग्रीच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. भारतातील बहुतेक डिजिटल शैक्षणिक सामग्री इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. स्थानिक भाषांमध्ये गुणवत्तापूर्ण सामग्रीची कमतरता आहे, ज्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. अनेकदा उपलब्ध डिजिटल सामग्री राष्ट्रीय अभ्यासक्रमाशी पूर्णपणे संरेखित नसते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षांच्या तयारीसाठी अतिरिक्त सामग्रीची आवश्यकता भासते. इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात सामग्री उपलब्ध असली तरी, त्यापैकी सर्व सामग्री गुणवत्तापूर्ण आणि विश्वसनीय नसते. विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना योग्य सामग्री शोधण्यात अडचणी येतात[६].

**५.४ शिक्षक प्रशिक्षण**

डिजिटल शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांचे पुरेसे प्रशिक्षण आवश्यक आहे. अनेक शिक्षकांना डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी पुरेसे प्रशिक्षण मिळत नाही. विशेषतः ग्रामीण आणि छोट्या शहरांमधील शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम मर्यादित आहेत. उपलब्ध प्रशिक्षण कार्यक्रमही नेहमी गुणवत्तापूर्ण आणि व्यावहारिक नसतात. अनेकदा ते तांत्रिक बाबींवर अधिक भर देतात आणि शैक्षणिक दृष्टिकोनावर कमी. अनेक शाळांमध्ये तांत्रिक समस्या सोडवण्यासाठी समर्पित तांत्रिक सहाय्य कर्मचारी नाहीत, ज्यामुळे शिक्षकांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो[7].

**५.५ मूल्यांकन आणि प्रमाणीकरण**

डिजिटल शिक्षणात विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करणे हे एक आव्हान आहे. ऑनलाइन परीक्षांमध्ये अफरातफर आणि चोरी रोखणे कठीण असू शकते. अनेकदा ऑनलाइन कोर्सेसची प्रमाणपत्रे पारंपरिक शैक्षणिक संस्थांच्या प्रमाणपत्रांइतकी मान्यता मिळवत नाहीत.डिजिटल शिक्षण प्रदात्यांसाठी गुणवत्ता आश्वासन यंत्रणा अपुरी आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य निवड करण्यात अडचणी येतात.

**५.६ सामाजिक-सांस्कृतिक आव्हाने**

डिजिटल शिक्षण अनेकदा व्यक्तिगत शिक्षणातील सामाजिक अनुभव प्रदान करू शकत नाही, जो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. अनेक समाजांमध्ये मुलींना डिजिटल साधनांचा वापर करण्यासाठी मुलांइतके प्रोत्साहन दिले जात नाही, ज्यामुळे लिंग-आधारित डिजिटल विभाजन वाढतो. काही पालक डिजिटल शिक्षणाला नकारात्मक दृष्टीने पाहतात आणि पारंपरिक शिक्षण पद्धतींवर अधिक विश्वास ठेवतात[८].

**६. भारतातील डिजिटल शिक्षणाचे भविष्य**

**६.१ धोरणात्मक पुढाकार**

भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० मध्ये डिजिटल शिक्षणाला मोठे महत्त्व दिले आहे:

**नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम (NETF)**: NEP २०२० अंतर्गत, NETF ची स्थापना करण्याचा प्रस्ताव आहे, जो शिक्षणात तंत्रज्ञानाच्या विकास आणि वापरासाठी मार्गदर्शक म्हणून काम करेल.

**डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर**: सरकार भारतनेट प्रकल्पाद्वारे सर्व खेड्यांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी पुरवण्याचा प्रयत्न करत आहे.

**विर्च्युअल लॅब्स**: विज्ञान, गणित, इंजिनिअरिंग इत्यादी विषयांसाठी विर्च्युअल लॅब्सचा विकास प्रस्तावित आहे, ज्यामुळे प्रयोगशाळा सुविधांच्या कमतरतेची समस्या सोडवली जाऊ शकते (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 145).

**६.२ तंत्रज्ञानाचे नवे प्रवाह**

नवीन तंत्रज्ञानांचा उदय भारतातील डिजिटल शिक्षणाचे भविष्य आकारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल:

**कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)**: AI-आधारित शिक्षण प्लॅटफॉर्म विद्यार्थ्यांच्या शिक्षण शैलीनुसार अनुकूलित शिक्षण अनुभव प्रदान करू शकतात. AI चॅटबॉट्स आणि विर्च्युअल असिस्टंट्स विद्यार्थ्यांना २४/७ सहाय्य प्रदान करू शकतात.

**वाढत्या वास्तविकता (AR) आणि आभासी वास्तविकता )VR)**:

AR आणि VR तंत्रज्ञाने शिक्षण अधिक इमर्सिव्ह आणि इंटरॅक्टिव्ह बनवण्याची क्षमता आहे. उदाहरणार्थ, विद्यार्थी इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनांची आभासी पुनर्रचना अनुभवू शकतात किंवा जटिल वैज्ञानिक संकल्पना ३D मध्ये पाहू शकतात.

**ब्लॉकचेन**:

ब्लॉकचेन तंत्रज्ञान शैक्षणिक क्रेडेन्शियल्सचे सुरक्षित आणि अचूक रेकॉर्ड ठेवण्यासाठी वापरले जाऊ शकते, ज्यामुळे प्रमाणपत्र सत्यापन अधिक विश्वसनीय बनेल.

**५G तंत्रज्ञान**:

५G नेटवर्कचा प्रसार उच्च गुणवत्तेचे स्ट्रीमिंग, विर्च्युअल क्लासरूम आणि रिअल-टाइम इंटरॅक्शनसाठी अधिक वेगवान आणि विश्वसनीय इंटरनेट कनेक्टिव्हिटी प्रदान करेल.

**६.३ समावेशी डिजिटल शिक्षण**

भविष्यात, डिजिटल शिक्षण अधिक समावेशी बनवण्यावर भर दिला जाईल. विविध भारतीय भाषांमधील गुणवत्तापूर्ण डिजिटल शैक्षणिक सामग्रीचा विकास वाढत राहील, ज्यामुळे भाषिक अडथळे दूर होतील. डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्म विकलांग विद्यार्थ्यांसाठी अधिक

ॲक्सेसिबल बनवले जातील, स्क्रीन रीडर्स, सबटायटल्स, साइन लँग्वेज इंटरप्रेटर्स इत्यादी सुविधांसह उपलब्ध असतील. इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसलेल्या क्षेत्रांसाठी ऑफलाइन ॲक्सेस सुविधा असलेले डिजिटल शिक्षण साधने विकसित केली जातील. कमी खर्चाची स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉप विकसित केले जातील, ज्यामुळे डिजिटल साधनांची परवडणारी उपलब्धता वाढेल[९].

**६.४ सार्वजनिक-खासगी भागीदारी**

डिजिटल शिक्षणाच्या प्रभावी प्रसारासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) महत्त्वाची भूमिका बजावेल. सरकार आणि खासगी क्षेत्र एकत्रितपणे दुर्गम भागात डिजिटल पायाभूत सुविधांचा विकास करू शकतात. सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे गुणवत्तापूर्ण डिजिटल शैक्षणिक सामग्रीचा विकास केला जाऊ शकतो. सरकारी शिक्षकांना डिजिटल कौशल्यांमध्ये प्रशिक्षित करण्यासाठी खासगी एडटेक कंपन्यांची मदत घेतली जाऊ शकते[10].

**७. निष्कर्ष आणि शिफारसी**

**७.१ निष्कर्ष**

भारतातील डिजिटल शिक्षणाचा अभ्यास केल्यानंतर, पुढील निष्कर्ष काढता येतात:

डिजिटल शिक्षण भारतातील शिक्षणाची पोहोच आणि गुणवत्ता सुधारण्याचे उत्कृष्ट साधन आहे.

कोविड-१९ महामारीमुळे डिजिटल शिक्षणाचा प्रसार जलद गतीने होण्यास मदत झाली, परंतु त्याने डिजिटल विभाजन आणि इतर आव्हानेही उघड केली.

सरकारी उपक्रम आणि खासगी क्षेत्राच्या प्रयत्नांमुळे डिजिटल शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती झाली आहे.

तरीही, डिजिटल विभाजन, डिजिटल साक्षरतेचा अभाव, पायाभूत सुविधांची कमतरता, गुणवत्तापूर्ण सामग्रीचा अभाव इत्यादी अनेक आव्हाने आहेत.

भविष्यात, कृत्रिम बुद्धिमत्ता, वाढत्या वास्तविकता, आभासी वास्तविकता यासारख्या नवीन तंत्रज्ञानांचा वापर वाढेल.

समावेशी डिजिटल शिक्षण आणि सार्वजनिक-खासगी भागीदारी भविष्यातील प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरतील.

डिजिटल शिक्षणाला भारतीय शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग बनवण्यासाठी सर्व भागधारकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**


1. Tayade, Monika Prabhakar, and Vijay Chavan. "Digital Divide in Indian Education System: An Analysis of Present Scenario." *Education and Society*, vol. 1, no. 1, Oct. 2023, pp. 183–190. ResearchGate
2. "National Education Policy 2020." Ministry of Education, Government of India, 2020, https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf. education.gov.in
3. Chakraborty, Sudipta. "The Rise of EdTech Startups in India: Growth, Challenges, and Future Prospects in Post-Pandemic Education." *International Journal of Advance Research and Innovative Ideas in Education*, vol. 11, no. 2, 2025, pp. 5–16, https://ijariie.com/AdminUploadPdf/The_Rise_of_EdTech_Startups_in_India__Growth__Challenges__and_Future_Prospects_in_Post_Pandemic_Education_ijariie25857.pdf. IJARIIE+1IJARIIE+1
4. Dwivedi, Manish Kumar, and Naveen Virmani. "Disruptive Innovation of EdTech Companies in Emerging Economy During COVID-19." *International Journal of Learning Technology*, vol. 18, no. 4, 2023, pp. 388–408.
5. Gautam, Shalini, and Dinesh Kumar. "Digital Initiatives: A Holistic Approach Towards Higher Education." *International Journal of Early Childhood Special Education*, vol. 13, no. 4, 2021, pp. 3470–3475.
6. Ojha, Debjani. "Right to Education and Legal Framework for Digital Education in India." *International Journal of Creative Research Thoughts*, vol. 12, no. 8, 2024, pp. 530–540.
7. "Digital Education in India: Challenges and Opportunities." *ResearchGate*, 2023, https://www.researchgate.net/publication/372195240_Digital_Education_Challenges_and_Opportunities_in_India. ResearchGate+1ResearchGate+1
8. "ICT-Enabled Rural Education in India." *ResearchGate*, 2023, https://www.researchgate.net/publication/272910965_ICT_-Enabled_Rural_Education_in_India. ResearchGate
9. "Digital Divide in India's Education: A Sociological Study." *International Journal of Research in Social Sciences*, vol. 11, no. 5, 2023, pp. 45–60.euroasiapub.org
10. "The Role of Government Policies in Promoting EdTech: Jharkhand's Experience." *International Journal of Innovative Research in Management, Engineering and Technology*, vol. 8, no. 1, 2023, pp. 41–50.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# ई.स.२००० नंतरची कृषीप्रधान ग्रामीण कादंबरी :एक अभ्यास

**प्रा. विक्रम उखर्डा मोरे**
सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग गो.से.विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव जिल्हा बुलढाणा महाराष्ट्र
**Corresponding Author: प्रा. विक्रम उखर्डा मोरे**
**Email :-** vikrammore4535@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15696741**

**सारांश (Abstract)-**

ग्रामीण साहित्याच्या प्रवाहातील शेतीनिष्ठ समाज जीवनाला साहित्याच्या माध्यमातून केंद्र ठरवणारी 'कृषीप्रधान' कादंबरी आहे. या कादंबरीचा केंद्रबिंदू शेती व शेतकरी समाजाचे प्रश्नाचे चिंतन करणे असा आहे.शेतीच्या व्यवसायात अनेक समस्या उद्भवतात त्यामुळे शेतकऱ्याची कौटुंबिक परिस्थिती बिघडते . आर्थिक ताणतणाव निर्माण होतात कौटुंबिक गरजा वाढल्यामुळे कर्जबाजारीपणा वाढतो. शासनाच्या तुटपुंज्या मदतीवर शेती करण्याची वेळ येते. सतत कर्जाचे दुष्टचक्र शेतकऱ्याचा पिच्छा सोडत नाही हे विदारक सत्य साहित्याच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न कृषी जाणवेच्या कादंबऱ्या करतात .त्याच्या कौटुंबिक जीवनात ताण तणाव निर्माण होतात. प्रसंगी शेतकरी आत्महत्या करतात . त्या मागची कारणे शोधून उपाययोजना करण्यासाठी सूचक दर्शन ही कादंबरी घडवते.शेतीच्या व्यवसायाच्या निमित्ताने उद्भवणारे प्रश्नांची कलात्मक मांडणी करणे हा या कादंबरी लेखनाचा उद्देश आहे. कादंबरीकाराची वैचारिक भूमिका ठरलेली आहे. समकाळातील काही लेखक शेतकरी चळवळीशी संबंधित असल्यामुळे शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांची प्रकृतीने त्यांना जाणीव आहे. या लेखकांची सामाजिक पार्श्वभूमी शेती व्यवसायाची निगडित असल्याने शेती जीवनातल्या नानाविध प्रश्नाचे स्वरूप त्यांच्या कथा कादंबऱ्यातून स्पष्ट होते.

ग्रामीण जीवन म्हणजे सर्व काही आबादी आबाद असे नाही. शेतकऱ्याच्या पाचवीला दारिद्र्य पुजलेलं आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती पिकवली जाते, उत्पादनही भरघोस होते तरी शेतकऱ्याची परिस्थिती का सुधारत नाही हा विचार ही कादंबरी प्रस्तुत करते. पिढीजात शेती व्यवसाय असणारा शेतकरी शेतीत इमानदारीने कष्ट करतो परंतु त्याच्या कष्टाचे चीज होताना दिसत नाही ही खंत या कादंबरीतून अधोरेखित होते. शेतकऱ्याला लुटणाऱ्या अनेक व्यवस्था कार्यरत आहेत. त्या व्यवस्थेला आव्हान देण्याची भाषा या कादंबरीतील पात्र करतात. व्यापार अडत्यांच्या कात्रीमध्ये शेतकऱ्याचे जीवन अडकलेले आहे याविषयीच्या प्रगल्भ जाणिवा कृषीप्रधान कादंबरीतून व्यक्त होतात. . डोंगरदऱ्या, हिरवीगार शेती नैनरोम्य शेतीतील वातावरण ,या पलीकडे जाऊन शेतीच्या प्रश्नांची मांडणी व्हावी व शेतीला चांगले दिवस यावे व शेतकरी स्वतंत्र व्हावा त्यांनी पिकवलेल्या मालाचा भाव ठरवण्याचा अधिकार प्राप्त व्हावा. कृषी ला व्यवसायाचा दर्जा प्राप्त व्हावा, भरघोस सरकारकडून कर्ज मिळावे .अशी आशा या कृषिप्रधान कादंबरीतून व्यक्त होते.शेतकऱ्यांचे सर्व प्रकारचे शोषण थांबले पाहिजे शोषण विरहित समाजाची उभारणी करणे आणि त्याचा केंद्रबिंदू शेतीशी जोडणे हा या कृषिप्रधान कादंबरीचा परीघ आहे .ग्रामीण साहित्यातील शेती जीवनाला केंद्रस्थानी मानून होणारे ललित लेखन ते कथा, कादंबरी, नाटक कविता ह्या कृषीनिष्ठ जाणिवेच्या अनुषंगाने निर्माण झाले पाहिजे. लिहित्या लेखकाची भूमिका कृषीनिष्ठ जाणवीची झाल्यास ग्रामीण साहित्याचा परीघ विस्तारणार. हा कृषीप्रधान कादंबरीचा प्रवाह नवशिक्षितांनी रेटून धरावा व बदलत्या ग्रामीण वास्तव्याला उजागर करणारी भुमीनिष्ठ प्रेरणा 'कृषीप्रधान' कादंबरीच्या निर्मितीचे कारण आहे.

**बीज शब्द :** ( keywords )- कृषीप्रधानता, शेतीनिष्ठा ,ग्रामीण समाज , जागतिकीकरण, ग्लोबल व्हिलेज.चंगळवाद, खाऊजा, शेतीकेंद्रित दृष्टी, कृषी जाणिवा.

**प्रस्तावना:**

ई.स.२००० नंतरच्या कालखंडातील ग्रामीण कादंबरीमधील कृषीजीवन विविधांगी आहे.ग्राम जीवन वास्तवाचे स्वरूप आमूलाग्र बदललेले आहे. बदलत्या कृषी जीवनाच्या पार्श्वभूमीवर अनेक साहित्यकांनी आपल्या साहित्यातून कृषीनिष्ठ समाज जीवनाचे चित्रण केल्याचे आढळते. ग्रामीण कादंबरीतून ग्रामीण जीवनाचे विविध अंगी दर्शन घडते ,परंतु विशिष्ट भूमिका घेऊन लेखन करणारे,कृषीच्या अंगाने शेतीविषयक प्रश्न, समस्येवर,चिंतन मांडणारे ग्रामीण चळवळीतील लेखक कृषी जीवनाला साहित्याचे केंद्र मानून लिहत आहेत. .व्हावे ,या उद्देशाने शेती केंद्रित प्रश्नांची साहित्याच्या माध्यमातून दखल घेताना अनेक लेखक ,कवी, कादंबरीकार पुढे येत आहेत.नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्य प्रवाहात बदलते ग्राम वास्तव चित्रित करताना दिसतात. गाव खेड्यात शिक्षणाचा प्रसार, प्रचार झाला. खेड्यातील लोकांचा संबंध शहरी जीवनाशी आला ,खेड, गाव व शहर यांची तुलना करू लागला. .आपल्या दरिद्री अडाणी बापाचे कष्टावर जग पोसलं जाते, अन् तोच जगाचा पोशिंदा आत्महत्या करतो आहे.असे का? शेतकरी कष्टकरी नेहमी दारिद्र्यात जगतो यामागे कोणती कारणे आहेत .हे असे का होत आहे ? पिढीजात शेती व्यवसाय इमानदारीने करूनही घरची परिस्थिती फारशी बदललेली नाही ,याच भान नवशिक्षित शेतकरी पुत्राला आलेलं आहे. आपल्या वाट्याला आलेले भोग , दुःख,दैन्य, गरिबी याबाबतची मानसिकतेला जबाबदार कोणती व्यवस्था आहे, याचे आत्मचिंतन साहित्य लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त केले पाहिजेत. हे आत्मभान आल्याने गाव खेड्यातून अनेक प्रतिभावान लेखक, कवी, पुढे आलेले आहेत. शेतकऱ्याच्या मरगळलेल्या जीवनावर चिंतन करणारे .

शेतकऱ्याच्या दुरावस्थेला कारण ठरणारे व्यवस्थेतील घटक त्याचा शोध घेणारे अनेक विचारवंत त्यापैकी आधुनिक पूर्वकाळात होऊन गेले .त्यात अग्रणी नाव घेतले जाते महात्मा ज्योतिबा फुले , डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांचे .या समाज सुधारकांचे विचार , तत्वज्ञान शिकलेल्यांना वाचायला मिळाले .तर अलीकडच्या काळातील शरद जोशी,प्रकाश पोहरे , राजू शेट्टी, रविकांत तुपकर ,राकेश टिकैत,या शेतकरी नेत्यांच्या भूमिकांचे निरक्षण करून , विविध शेतकरी संघटनांची भूमिका लक्षात घेता शेतकरी समाज जीवनाचे चिंतन होऊ लागले. शेती प्रश्नांची चर्चा करणाऱ्या विचारवंतांनी पुरस्कृत केलेला दृष्टिकोन, विचारधारा, प्रमाण मानून शेतीनिष्ठ लेखन यावे या उर्मीतूनच ग्रामीण भागात कृषी जीवनाचे चित्रण करणारे लेखक उदयास आले. शेतकरी समाजाचे दुःख, वेदना, व्यथा साहित्याच्या माध्यमातून मांडण्याची भूमिका घेतली जात आहे . येथे शेती निष्ठ भूमिका घेऊन शेतकरी समाजातील लेखकांची एक पिढीच आज उदयास आलेली आहे.त्यामध्ये अग्रेसर कादंबरीकार म्हणून सदानंद देशमुख, बालाजी मदन इंगळे, बाळासाहेब गर्कळ, मिलिंद जाधव, श्रीकांत देशमुख, कृष्णा खोत , भारत काळे, शेषराव मोहिते, नामदेव माळी, कैलास दौड, संतोष जगताप हे नव्या पिढीचे ग्रामीण जीवनाचे भाष्यकार , कृषी जीवनाचे चिंतन करणारे कृषीनिष्ठ समाजाच्या प्रश्नांना अधोरेखित करणारेआघाडीचे लेखक आहेत.तसेच सखाराम देशमुख, बाबुराव मुसळे, शंकर सखाराम, पुरूषोत्तम बोरकर, वासुदेव मुलाटे, रविंद्र किंबहुणे,भास्कर चंदनशिव, चंद्रकांत वानखेडे,अशोक कौतिक कोळी, कैलास दौंड,शिवहरी डोंगरे, संतोष जगताप, इत्यादी लेखक शेतीनिष्ठ भूमिका घेऊन लिहत आहेत.

शेतकरी जीवनाला केंद्रस्थानी ठेवून लिहिली जाणारी कादंबरी शेतीनिष्ठ कादंबरी किंवा शेतकरी कादंबरी म्हटली पाहिजे. कादंबरीचे म्हटले की, कथानक, व्यक्तीपात्र, विषय, आशय, भाषा, व वातावरण निर्मिती हे सर्व घटक त्यांचा अंतर्बाह्य जैविक सबंध ग्रामजीवन आणि शेती, शेती संबंधीत पुरक व्यवसाय या अनुषंगाने येतो.तसा तो असावा..शेतीजीवनातील प्रश्न , समस्याभोवती गुंतलेले शेतकरी, कष्टकरी, पशूपालक,पुरक व्यवसायी , मजूर वर्ग, अल्पभूधारक शेतकरी, स्त्रिया, पुरूष,नवसुशिक्षित बेरोजगार तरूण, व्यापारीवर्ग ,अडते , माघारी,ट्रॅक्टर ड्रायव्हर ,हमाल , शेतमजूर, यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध शेती व शेतकरी समाजाच्या जीवनाचे केंद्र आहे. या केंद्राभोवती शेतीविषयक जीवन जाणिवांचे प्रस्तुतीकरण शेतीनिष्ठ भूमिकेतून जेव्हा लेखक करतो तेव्हा त्या साहित्यास ,'कृषिप्रधान साहित्य' म्हटले जावे.असे प्रस्तुत अभ्यासकाचे मत आहे..

**ग्रामीण साहित्यातील कृषी जाणीवा:**

ग्रामीण साहित्यातून अविस्कृत झालेले समाजजीवन व्यापक आहे, विस्तृत आहे .या जीवनाचा

**प्रा. विक्रम उखर्डा मोरे**

परिघ मोठा आहे .असे असले तरी, मानवी जीवनाचे मुख्य प्रेरणास्थान केंद्र शेतीच आहे. भूमी मनुष्य जीवनाचा पाया आहे. मानवाच्या प्रगतीचे मूळ आहे.मानवी जीवनाचा आधारच कृषी आहे. अन्नधान्याच्या निर्मितीसाठी शेतीवरच अवलंबून राहावे लागते. मनुष्याने शेतीचा शोध लावला .त्यानंतर संस्कृतीचा उदय झाला. असे म्हटले जाते. हे खरे आहे. ग्रामीण जीवनाच्या भोवती निर्माण झालेलं जग न्याहाळताना वर्तमान बाजारू जगाने केलेले शेतकऱ्याचे शोषण , लादलेले दारिद्र्य , केलेले शेतीविषयक मालाचे व्यापाराचे केंद्रीकरण ,त्यातून होणारी शेतकऱ्याची वारेमाप महालुट . शेतमालाचे भाव पाडण्याचे षडयंत्र, शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सरकारचे निर्यात धोरण ठरविण्यात येते, शेतकऱ्यांच्या शेतमालाचा भाव ठरवण्याचा नसलेला अधिकार. त्यामुळे विस्कळित झालेली शेतकऱ्याची आर्थिक स्थिती, सामाजिक दृष्ट्या लाचारीचे स्टेटस, शेतकऱ्याकडे पाहण्याचा भांडवलवादी लोकांचा शोषणचा दृष्टिकोन, नेहमीच राजकारण्यांच्या आश्वासनाला बळी पडणारा शेतकरी समाज व त्यांच्या समग्र शोषणाच्या घटकांचा विचार करणारा लेखक, कवी ,कादंबरीकार, कथाकार शेतकऱ्यांच्या दुःखावर साहित्यातून जेव्हा मांडणी करतो, तेव्हा शेतकऱ्याचे अस्वस्थ जग साहित्याच्या विषय होेतो. येथे प्रकर्षाने प्रतिभावंत साहित्यिकांचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. शेतीनिष्ठ , कृषी जीवनाची मूल्य व्यवस्था जतन करून वर्षानुवर्ष शेतीत राबणारा शेतकरी साहित्याचे केंद्र आहे . कृषीनिष्ठ जाणिवेतून निर्माण होणारी साहित्यकृतीस ' कृषीप्रधान' असे म्हटल्यास वावगे ठरू नये . ग्रामीण साहित्यसृष्टीचा विषय व आशय शेतीनिष्ठ असतो.शेवटी साहित्य समाजाचा आरसाच आहे ,परंतु विशिष्ट भूमिका घेऊन साहित्य लिहिले जावे असे जेव्हा वाटते, तेव्हा 'शेतीनिष्ठ' भूमिका ग्रामीण साहित्यिकांची अधोरेखित व्हावी . त्याचा शोध घेणे हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे.ग्रामीण साहित्यात येणारे शेतकरी जीवन हे विशिष्ट समाजाचे आहे. तो म्हणजे शेतकरी समाज होय .तो कोण्या जाती धर्माचा शेतकरी आहे. गरीब ,श्रीमंत, जाती, पंथ, भाषा ,विचारधारा हे महत्त्वाचे नाही तो केवळ शेतकरी असावा,. जो शेतीत राबतो तो शेतकरी. त्याच्या शेतीविषयक जीवन जाणीवा सारख्याच आहेत. त्याचे प्रश्न समान आहेत .जो हजारो वर्षापासून शेती आधारे जगतो व जगालाही जगवत आहे.शेतीशी निगडित पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन, दुग्ध व्यवसायी ,मेंढपाळ ,कुक्कुटपालनवाले, म्हशी पालन करणारे ,गोट फार्म चालवत असलेले, हे सगळे शेतकरी समाजाचे घटक आहेत हे विसरून चालणार नाही. इत्यादी व्यवसायाशी निगडित असलेला शेतकरीच आहे. त्याच्या निंत्याच्या जगण्यात, जगण्यातील प्रश्नांचा उहापोहो कृषीविषयक जाणवीतून जेव्हा होतो. ह्या कृषीप्रधान जाणिवांचा विशिष्टपणाच कृषीप्रधान कादंबरीच्या जन्माचे कारण आहे.अनुषंगाने आहे. हे लक्षात घ्यावे लागते. काही लेखकांच्या कादंबऱ्यातून कृषीप्रधान जाणीवा ठळक दिसून येतात. त्यामध्ये संतोष जगताप यांची 'विजयने चोरलेले दिवस 'ही कादंबरी, कैलास दौड यांची 'कापूस काळ' ही कादंबरी, अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा' ही कादंबरी, सदानंद देशमुख यांची 'बारोमास', नवनाथ गोरे यांची 'फेसाटी', साईनाथ पाचरणे यांची 'डेअरी' , बाबुराव मुसळे यांची 'पाटीलकी', गणेश आवटी यांची 'भिरूड', शंकर सखाराम यांची 'एसइझेड' , रवींद्र किंबहुनणे यांची 'पांढरं,' कृष्णा खोत यांची 'गावठाण', भूवैकुंठ, धूळपेरणी, साखरपेरा, छावणी, कोयत्यावरचे कोक इत्यादी कादंबऱ्यातून कृषी जीवनाचे समग्र दर्शन घडते.याबाबत डॉ. वासुदेव मुलाटे यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे.ते लिहतात "ग्रामीण कादंबऱ्यांमधून मांडले जाणारे ग्रामीण माणसाचे जगणे व त्याची शेतकरी असणे हे, मुख्यतः विचारात घेतले आहे. बदललेला गावपरिसर, समकालीन शेती वास्तव खाऊजा धोरणाचा परिपाक, जागतिकीकरणाने ढवळून निघालेले ग्रामीण जीवन आणि यातून शेतकऱ्याला आलेली अगतिकता या कादंबऱ्यातून उत्कट होताना दिसते. हे बदलते वास्तव, सामाजिक बदल व कृषी जीवनातील बदल अशा दुहेरी स्वरूपाचे असल्याचे दिसतात . वर्तमान कादंबऱ्यातील चित्रित समाजाचे वास्तव हे कृषीप्रधान जगाचे आहे. यातील कृषी जीवनदर्शनमागे साहित्य कर्त्याची विशिष्ट भूमिका आहे.त्या भूमिकेचे समर्थन अशा प्रकारच्या कृषीप्रधान कादंबरीतून होणे अपरिहार्य ठरते."१ शेतकरी समाजातील जीवन वास्तव हे सामाजिक , सांस्कृतिक, राजकीय, आणि आर्थिक जीवनाचा संबंध हा शेतीच्या व्यवसायाशी संबंधित आहे. हेच विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे. तशी भूमिका आजचा ग्रामीण लेखक घेतो आहे. शेतकरी जगला तर जग जगेल असे म्हटले जाते पण बळीचा नेहमी बळीच घेतला जातो हे विदारक सत्य आहे. शेती व

शेतकऱ्याला चांगले पाहिले जात नाही . त्याच्या कष्टाची किंमत होत नाही. त्याच्या विषयी पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन विकसित पावला आहे .हे वास्तव आहे. त्यांची निर्भत्सना ही व्यवस्था नेहमीच करत आली आहे. म्हणूनच आधुनिक काळातील शिकल्या सवरलेल्या तरुणांचा शेती विषयक निराशमय दृष्टिकोन विकसित झाला.शेती हा तोट्याचा धंदा आहे .कितीही कष्टाची शेती केली, तरी पुरत नाही. हे समीकरण त्याच्या लक्षात आले .पण, हा व्यवसाय पृथ्वीतलावरील अत्यंत महत्त्वाचा अजरामर धंदा आहे, विसरून चालणार नाही.

. ग्रामीण जीवनाचे केंद्र शेती व्यवसाय आहे. शेती व्यवसायाच्या संबंधाने निर्माण झालेले प्रश्न अभ्यासले जावे, ते साहित्याचा विषय व्हावे . सतत भायग्रस्त जगणाऱ्या शेतकऱ्याला खरे स्वातंत्र्या अनुभवता यावे ही भूमिका आजच्या लेखकांची आहे. शेतकरी चळवळीतून पुढे आलेले लेखक अशी भूमिका केवळ शेतकऱ्यांच्या दुःखाच्या कहाण्या सांगून भागणार नाही ,काहीतरी उपाय शोधावे लागतील. संविधानिक मूल्यांच्या आधाराने शेतकऱ्याला न्याय द्यावा लागेल तरच ही शेती आधारित समाज रचना अबाधित राहील असा विचार आजचा साहित्यिक करतो .त्यातूनच त्यांच्या कथा कादंबऱ्या जन्मास येतात.शेती व शेतीत राबणाऱ्या शेतकऱ्याशिवाय ग्रामीण साहित्याचा विचार होऊ शकत नाही.

ग्रामीण जीवन ग्रामीणत्वाच्या अंगाने विस्तृत व्यापक असल्याने ,केवळ शेतीच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या अलीकडच्या काळातील कृषीनिष्ठ समस्यांची जाणीव अधोरेखित करणाऱ्या लेखकांची दृष्टी व दृष्टिकोन महत्वाचा आहे . शेती संदर्भाने निर्माण झालेल्या प्रश्नांनांना भिडणारे शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांची दखल घेऊन भूमीनिष्ठ परंपरा टिकवण्यासाठी कार्यरत असणारे अनेक शेतकरी कार्यकर्ते लिहू लागले . परंतु ग्रामीण साहित्य व त्याचा परीघ व्यापक असल्याने शेतीनिष्ठ जाणिवेचे साहित्य हे वेगळ्या जाणिवेचे साहित्य ठरते . या जाणिवेचे स्वरूप जागतिकीकरणाच्या , अत्याधुनिकरणाच्या ग्लोबल जगाच्या पार्श्वभूमीवर लक्षात घेतल्यास त्याचे निराळेपण अधोरेखित होते.

आज शेती व्यवसाय अमुलाग्र बदललेला आहे. जागतिक बाजारपेठेशी शेतकऱ्याचा डायरेक्ट संबंध येतो आहे. त्यानिमित्ताने विविध प्रश्न सुद्धा निर्माण झाले .या प्रश्नांची जाणीव ठेवून लिहित्या लोकांनी कृषी संबंधाने निर्माण झालेल्या समस्यांची दखल घेतली आहे. म्हणून कृषीविषयक जाणीवा साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्त होतात. समग्र कृषी जीवन हे कृषी प्रधान जीवन जाणिवांचा भाग आहे .म्हणून ही अभिव्यक्ती'कृषीप्रधान' ग्रामीण कादंबरीचा एक भाग म्हणून साहित्य जगताने शिक्कामोर्तब करावे.ग्रामीण साहित्यातील हा एक कृषीप्रधान कादंबरीचा प्रवाह ठळक होताना दिसतो.

**कृषीप्रधान कादंबरीचे स्वरूप व वैशिष्ट्ये :**

कादंबरी हा साहित्यप्रकार म्हणून कृषीप्रधान कादंबरीचे घटक सारखेच आहेत .ती ग्रामीण साहित्य प्रवाहातीलच कादंबरी आहे.फक्त फरक अनुभवाच्या वेगळेपणाचा, आहे .कृषीनिष्ठ जाणीवांचा आहे. ग्रामीण साहित्यून ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले चित्रण येते. ग्रामीण हे विशेषण खेडे व खेड्याशी सलग्न असणाऱ्या समग्र जीवनाशी निगडित आहे. ग्रामव्यवस्थेत शेतकरी मुख्य आहे. गावगाडा गाव संस्कृती या मिळून ग्रामीण व्यवस्था तयार होते .

या व्यवस्थेचे केंद्र शेती व्यवसाय आहे. ग्रामीण जीवन म्हटले की रूढी, परंपरा ,देवदैवत, सण उत्सव धार्मिक कर्मकांड जाती जातीचे समूह या म्हणून तयार झालेले ग्रामव्यवस्था त्यातील माणसांचे भावबंध याचे चित्रण ग्रामीण साहित्यात मोठ्या प्रमाणात झाले. परंतु केवळ शेतीनिष्ठ जगण्याचे प्रश्न घेऊन एखादी साहित्यकृती जेव्हा निर्माण केली जाते तेव्हा शेतीच्या अनुषंगाने येणाऱ्या समस्यांना आशयाचे मुख्य केंद्र म्हणून लिहिली गेलेली कादंबरी कृषीप्रधान ठरते. ग्रामीण जीवनातून कृषी जीवन वगळता येत नाही, ही खरे आहे.परंतु ग्रामव्यवस्था व्यापक आहे त्यामुळे शेती समाजाचे जगणे विशेष करून समकालीन शेती जीवनातील स्थित्यंतरे, अत्याधुनिकीकरणाने ग्रामीण जीवनात घडलेले परिवर्तन, शेती प्रश्नाच्या अनुषंगाने आलेली जागृतता, शेतकऱ्यांच्या संघटना, चळवळी,परंपरागत शेती धार्जीनी नकारात्मक मानसिकता . उत्पादन वाढीसाठी शेतीत विविध प्रयोग शेती करण्याच्या पद्धतीत झालेले मोठे बदल . विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर शेतीत वाढला .कंपन्या, व्यापारी ,भांडवलदार यांचे शेतीकडे विशेष लक्ष जाऊ लागले. बैलाच्या मदतीने केली जाणारे शेती आता अत्याधुनिक शेती साधनाच्या आधारे केल्या जाऊ लागली. व्यापाराची पद्धती बदलली. बी, बियाणे, खते कीटकनाशके याचा वापर वाढला. विज, पाणी

याचे व्यवस्थापन होऊ लागले. शेती हिताच्या शासकीय योजना राबवल्या जाऊ लागल्या. भरपूर पीक घेण्याची स्पर्धा वाढली .जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी रासायनिक खताचा प्रयोग केला गेला. शेतमालाची ने- आन करण्यासाठी दळणवळणाची साधने सहज उपलब्ध झाली. जागतिक बाजारपेठेत शेतकऱ्याचे पीक जाऊ लागले. मुक्त व्यापार होऊ लागला. त्यामुळे शेतकऱ्याच्या जीवनात आर्थिक बदल झाले. आर्थिक स्थिती सुधारू लागली. नगदी पिके घेण्यात येऊ लागली. शेती व्यवसायात स्पर्धा वाढली या सगळया शेती संबंधाने घडणाऱ्या घडामोडी शेतकऱ्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक झाल्या .नवीन तंत्रज्ञान आलं, पण खर्च आणि उत्पादनाचा मेळ बसला नाही. ..त्यामुळे शेतकऱ्याच्या कुटुंबात ताणतणावाचे वातावरण निर्माण झाले. नवतरुण पिढीचे शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागले. शेती उत्पादनातून घराच्या गरजा भागिनाशा होऊ लागल्या त्यामुळे शेती करण्यासारखी नाही ती तोव्ह्यातच राहते, शेतकऱ्याची पोर शेतीत दुर्लक्ष करू लागले. भरपूर उत्पादन झाले पण भावाची मारामात सुरू झाली. अडते, व्यापारी यांनी ठरवून मार्केटमध्ये भाव पाडण्याचे षडयंत्र रचले .शेतकरी लुटला जाऊ लागला.त्याच्या जीवनातील ही भीषणता ग्रामीण लेखकाच्या साहित्याचा विषय झाली लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, बीटीचे बियाणे आले रोग वाढले त्या रोगांना दुरुस्त करण्यासाठी फवारा वाढला, कीटकनाशकांचा खर्च वाढला, बियाणांचा खर्च वाढला . खर्च आणि उत्पादनाचा मेळ बसेनासा झाला असे एकंदर कृषी जीवनाचे स्वरूप आजच्या कादंबरीतून दृष्टीपथात येते. आजच्या कादंबरीतून शेतकऱ्याच्या प्रश्नांचे चिंतन केल्या जाते. आधुनिक काळाच्या पार्श्वभूमीवर हे ग्रामीण कादंबरी जागतिकीकरणाच्या प्रभावातून निर्माण झाली.

कादंबऱ्यांचे अनेक प्रकार जाणिवेच्या व अनुभूतीच्या वेगळेपणामुळेच मांनले जातात.जसे की, ऐतिहासिक कादंबरी, पौराणिक कादंबरी, राजकीय कादंबरी ,सामाजिक कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी सज्ञाप्रवाहातील कादंबरी ,मनोविश्लेषणात्मक कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी, दलित कादंबरी, आदिवासी कादंबरी वैज्ञानिक कादंबरी ,प्रादेशिक कादंबरी, ग्रामीण कादंबरी इत्यादी. साहित्य संकल्पनेची स्पष्टता ही आशय आणि विषयाच्या दृष्टिकोनातून केलेली आहे . लेखकाचा दृष्टीकोन आणि त्याने घेतलेली भूमिका यातील विशिष्टपणा, विषयाचा निराळेपणा, आणि आशयाचे स्वरूपावरून साहित्यकृतीचे प्रकार पाडावे लागतात. जे जीवन ज्या कादंबरीतून प्रामुख्याने अभिव्यक्त होते त्याला अनुलक्षणच कादंबरीचा प्रकार मांडण्याची रीत आहे. ग्रामीण कादंबरीचा किंवा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक शेती आहे. त्या अनुषंगाने येणारे ग्रामीण जीवन शेती संबंधानेच येते ,परंतु ग्रामीण जीवनाचा पसारा मोठा आहे .त्यातील विशिष्टपणा शेतीच्या अनुषंगाने जेव्हा अधोरेखित होतो. शेतीसंबंधाने येणारे मानवी जीवन हे शेती प्रश्नाने ग्रासून जाते, प्रदेशानुसार शेतीचे प्रश्न भिन्न दिसून येतात. त्या शेतीच्या समस्याच्या अनुरोधने आलेले शेतकरी जीवन एकंदर त्याच्या जीवनाचा परीघ शेती समस्यांनी निगडित असतो. त्याचे चित्रण करणारे लेखक , कादंबरीकार जेव्हा लिहितात तेव्हा त्यांच्या कादंबरीतून व्यक्त होणारी जीवनशैली कृषीप्रधान म्हटली पाहिजे.

मात्र कृषीप्रधान जीवनाची विशिष्टता साहित्यातून लक्षात घ्यावी लागते. ग्रामीण पार्श्वभूमी असलेले अनेक लेखक आपल्या कथा, कादंबऱ्यातून शेतीविषयक प्रश्नांची चर्चा करत आहेत. त्यामध्ये त्यांची विशिष्ट भूमिका आहे .

शेतकऱ्याचे शोषण थांबवावे, शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा, रास्तहमी भाव शेत मालाला मिळाला पाहिजे, शेतीला व्यवसाय दर्जा मिळावा, उत्पादन खर्च आधारित भाव मिळावा, भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्याला असावा ,आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा स्त्रियांचे पुनर्वसन शासनाने करावे, विविध विकास प्रकल्पात गेलेल्या जमिनीचा योग्य तो मोबदला मिळावा , शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने अधीग्रहात केल्यास शासकीय सेवेत त्यांच्या मुलांना घेतले पाहिजे, शेतीसाठी मुबलक प्रमाणात वीज व पाण्याची व्यवस्था शासनाने करावी शेतकऱ्यांच्या स्वतंत्र बाजारपेठा शेतकऱ्यांच्या ताब्यात असाव्या. अशाप्रकारचे उद्देश त्यांच्या लिखाणातून स्पष्ट होताना.शेतीकेंद्रित जीवनाचे प्रश्न, समस्या आपल्या साहित्यातून उजागर करण्याची भूमिका हे शेतकरी लेखक जाणिवपूर्वक घेतात . त्यांच्या कादंबऱ्यातून अविस्कृत झालेल्या व्यक्तिरेखा, काही एक भूमिका घेऊनच येतात.कथानक विषय, भाषाशैली, निवेदन, वातावरण निर्मिती या सगळया घटकांची जुळवाजुळव हे कादंबरीकार शेतकरी जीवनाचे अंगाने करतात, विविध अनुषंगिक घटना

प्रसंगातून आलेली पार्श्वभूमी शेती प्रश्नांसबंधीतच असते.कथेचे केंद्र शेती भोवतीचे समाज जीवनच आहे, शेतीच्या नविन प्रश्नांच्या बाबतीत शेती व्यवसायाचे वास्तव मांडणे,हाच कृषी प्रदान कादंबरीचा विशेष आहे.

ही ग्रामीण कादंबरी जरी असली, तरी त्यातील शेतकरी , संस्कृतीचा, मूल्य संस्कार म्हणून वेगळी कृषीविषयक समाज जीवनदर्शन घडविणाऱ्या कादंबरीस 'कृषीप्रधान' कादंबरी मानवी.

या कादंबरीतून प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या जगण्याचे चित्रण येते .त्यांना भेडसावडणारे प्रश्न येतात. महागाई, बेरोजगारी, बेकारी, कुटील राजकारण, अज्ञान, अंधश्रद्धा, बढाईखोरपणा, हुंडाबळी भ्रष्टाचार, फुकट्या शासकीय योजना, व्यसनाधीनता, वरली ,मटका, आळस, अज्ञान, मजुरांची वाणवा इत्यादी जाणिवांचेचा अनुबंध शेतीशी निगडित आहे. असे चित्रण कृषीप्रधान कादंबरीतून होताना दिसते. अल्पभूधारक शेतकरी आत्महत्या करतो. खर्च आणि उत्पन्न याचा मेळ बसत नाही. उत्पन्नाची ईतर स्त्रोत नसल्यामुळे लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या .याची दखल आजचा शेतीनिष्ठ कादंबरीकार घेतो. मनोरंजन म्हणून ही कादंबरी लिहिली जात नाही. तर विशिष्ट भूमिका घेऊनच कृषीप्रधान कादंबरी लिहिली जाते. शेती प्रश्नांचा अभ्यास व शेतकऱ्या विषयी असलेला जिव्हाळा यातूनच ही कादंबरी जन्म घेते. आजच्या शेतकरी समाजात शेतकऱ्याची मुलं शेतीचा धंदा हाती घेण्यात कचरतात ते मुंबई पुण्याला काम शोधतात पण शेती करावीशी वाटत नाही कारण शेती म्हणजे जीवनाची माती असा त्यांचा दृष्टिकोन होत आहे. कमी श्रमात मुबलक पैसा मिळावा आणि कष्ट कमी पडावे असा विचार आजच्या शेतकरी तरुणांचा आहे .चंगळवादाने या तरुणांना भानावर ठेवले नाही.

शेती, शेतीपूरक व्यवसायातून आलेलं नैराश्य, उद्विग्न मानसिकता, व्यसनाधीनता, बीपीएल योजना यास जबाबदार आहेत. शासन धोरण, तरुणांना फुकट जगण्याची सवय लावत आहे. सबसिडी व्यवस्था, त्यातील भ्रष्टाचार, नफेखोरी, कारखानदारांची शोषण नीती, तरूण पिढीचा शेतीकडे पाहण्याचा निराशमय दृष्टिकोन, विविध विकास प्रकल्प, समृद्धी महामार्ग, त्यातून मिळालेल्या पैशाचा गैरवापर, चंगळवादी मानसिकता कृषीप्रधान साहित्यातून अविस्कृत होते. प्रस्तुत शोध निबंधात कृषी जीवनाशी केंद्रीत शेतीसमाज आणि अनुषंगिक त्या जीवनातील प्रश्नांचे वास्तववादी चित्रण, कृषीप्रधान कादंबरीतून होत आहे, त्यांच्या प्रेरणा कोणत्या, आजचं शेतीकरी समाज जीवनावर कोणते अनिष्ट प्रभाव टाकणारे घटक कारणीभूत आहेत.तसेच अत्याधुनिक काळाच्या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाच्या प्रभावाने येणारे शेतीनिष्ठ जीवन कृषीप्रधान कादंबरीतून कसे अविस्कृत झाले हे अभ्यासणे मुख्य उद्देश आहे. .

आजचे ग्रामीण वास्तव विस्तृत स्वरूपात बदललेले दिसते. त्यामागे विविध प्रभाव क्षेत्र आहेत. जसे की,जागतिकीकरण ,आधुनिकीकरण ,अत्याधुनिकीकरण इंटरनेटचे जाळे विविध शासकीय धोरण, भांडवली सत्ता केंद्र,जागतिक बाजारपेठ शेती टुकेडीकरण , मोठ्या प्रमाणात होणारं अकृषिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, मुक्त व्यापार , महागाई, जगात काही ठिकाणी चाललेली युद्धजन्य परिस्थिती, शेती संबंधाने येणारे नवतंत्रज्ञान, गाव खेड्यात पोहच झालेले दळणवळणाची साधनं, यांत्रिकीकरण यामुळे शेतकरी समाज अंतर बाह्य बदललेला दिसून येतो. त्यांच्या जगण्यातील नानाविध स्वरूपाचे प्रश्न व समस्या याचे चित्रण प्रामुख्याने ई.स.२००० नंतर मराठी कृषीप्रधान साहित्यात येतांना दिसते.

यापूर्वीची ग्रामीण कादंबरी ,ग्रामीण जीवनाच्या अनुषंगाने जरी येत असली तरी त्यातील समाजजीवन मर्यादित चौकटीत होते.शेती परंपरागत होती, आधुनिकीकरण फारसं नव्हते.१९९० च्या दशकात खाउजा धोरण व मुक्त व्यापार धोरण स्विकारले . आधीचे शेतीजीवन , शेतकरी, मजूर ,यांचे जीवन कृषीविषयक जाणिवेचे होते . समाज , संस्कृतीत मान मर्यादा होत्या, रिती भाती, लग्न सोहळे, जत्रा यात्रा नातिगोती, गावातील राजकारण,त्या संबंधाने निर्माण होणारे भांडण तंटे, गावातील पाटीलकी,गावातील दलित समाज त्यांचं हालाखीच जीवन , जातिभेद,अज्ञान ,अंधश्रद्धा, देवी, दैवत, जमीनदार वर्गणीची शोषण वृत्ती,धनदांडग्यांची मुजोरी , तमाशा, फड,गरिबी , शिक्षणाचा अभाव, अडत्या व्यापाऱ्याकडून होणारे शेतकऱ्याचे शोषण, दुष्काळजन्य परिस्थिती, स्त्रियांचा कोंडमारा, पशुपक्ष्यांच पालन पोषण,गुराढोरांविषयीचा जिव्हाळा, शेतीवरील प्रेम,निसर्ग, डोंगर, रान नद्या, ग्राम समाज त्यांच्या प्रथा परंपरा अनारोग्य, गावातील राजकारण ,देवदैवत जातीयतेढ आणि शेत बांधावरच मर्यादित अर्थाने जगणारा शेतकरी या कादंबरीत दिसून येतो.

आज मात्र मराठी ग्रामीण कादंबरी आशय आणि विषयाच्या दृष्टिकोनातून बदललेली दिसते. याचे मुख्य कारण समाजात होत असणारे अत्याधुनिक काळातील बदलते वास्तव.शेतीआणि शेतकरी आज आमूलाग्र बदलून गेला आहे. शेती संबंधाने नवतंत्रज्ञान शेतकऱ्याची मुलं शिकत आहेत. दळणवळणाची साधने वाढली आहेत. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार गाव खेड्यात झाला आहे. गाव हेग्लोबल व्हिलेज झाले आहे. गाव खेड्यात इंटरनेटचे टॉवर पोहोचले गाव खेड्यातला माणूस, वस्ती डोंगरातला शेतकरी, मेंढपाळ गुराखी,जगाशी जोडल्या गेला. फेसबुक, इंस्टाग्राम व्हाट्सअप यासारख्या समाज माध्यमाच्या माध्यमातून तो जगाची कनेक्ट झाला .त्यात चंगळवादी वृत्ती वाढू लागली .उत्पन्न कमी आणि खर्च जास्त, त्यामुळे मानसिकता हावरट झाली पटकन पैसा घरात यावा त्यामुळे फसवणूक वाढली समाजाचं सांस्कृतिक जगणं बदलून गेलं. बाजारवाद पुढे आला. गरजा वाढत गेल्या त्यामुळे शेतीतील होणारे उत्पादन व येणारा नफा या तफावत निर्माण झाली. उपरोक्त बाबींचे चित्रण काही निवडक कादंबऱ्यातून झालेली आहे. त्यामध्ये बारोमास, कापूसकाळ, पाडा, विजेने चोरलेले दिवस, फेसाटी, पाटीलकी, कोयत्यावरचे कोक, अशा काही उल्लेखनीय कादंबऱ्याच्या संदर्भाने 'कृषीप्रधान' कादंबरीची संकल्पना अधोरेखित केली आहे.

**निष्कर्ष**:

1. -कृषीप्रधान कादंबरीचे आशय विषय केंद्र कृषी जीवन आहे.
2. जागतिकीकरण अत्याधुनिकीकरण याच्या प्रभावाने बदललेले शेतकरी जीवन अभिव्यक्त होते.
3. कृषी विषयक प्रश्नाचे चिंतन या कादंबरीत होते .
4. कृषीनिष्ठा काळानुरूप बदललेले आहेत.
5. या कादंबरीतील व्यक्तिरेखा शेतीच्या समस्यांनी ग्रासलेले आहेत .
6. भांडवली व्यवस्था शेती व्यवस्थेला लुटत आहे .
7. आधुनिकरण आले परंतु शेतकऱ्यांची लूट थांबली नाही.
8. चंगळवादी मनोवृत्ती वाढली आहे
9. या कादंबरीतील व्यक्तिरेखा विद्रोह, बंड व्यवस्थेविरुद्ध करतात.
10. शोषण विरहित शेतकरी समाजाची उभारणी करणे हे स्वप्न ही कादंबरी दर्शविते.
11. संवाद बोलीभाषेत आहे. तंत्रज्ञानात्मक शब्द, उद्योग, व्यापार, रसायने ,यातील शब्द अनुषंगाने वापर आहे.
12. कालसंगत म्हणी व वाक्यप्रचाराचा वापर आहे

**संदर्भ:**


1. मुलाटे, वासुदेव , ग्रामीण साहित्य: चिंतन आणि चर्चा, २००५, स्वरूप प्रकाशन ,औरंगाबाद .
2. ठाकूर, रवींद्र , मराठी ग्रामीण कादंबरी, २०१०, स्नेहवर्धन प्रकाशन ,औरंगाबाद.
3. बनसोडे, प्रवीण ,जागतिकीकरण व ग्रामीण साहित्य, २०१८, कीर्ती प्रकाशन ,औरंगाबाद.
4. सानप , किशोर ,मराठी कादंबरी: नव्या दिशा, २००५, निर्मल प्रकाशन, नांदेड .
5. यादव ,आनंद , 1960 नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील प्रवाह, २००१, मेहता पब्लिकेशन, पुणे.
6. खरात ,महेश , ग्रामीण कादंबरीची वाटचाल, संपा.२०११, मीरा बुक्स ,औरंगाबाद .
7. सावंत, वासुदेव, स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील बदलते रूपबंध,संपा.२०११, नभ प्रकाशन, अमरावती.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# वर्तमान शिक्षा के उद्देश्यों एवं शिक्षण विधियों के सन्दर्भ में बौद्ध शिक्षा प्रणाली का अध्ययन

**अमित कुमार शुक्ल**
जननायक चंद्रशेखर विश्वविद्यालय, बलिया शोध छात्र
**Corresponding Author अमित कुमार शुक्ल**
**Email:-** amit28072@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15696784**

**प्रस्तावना**

'श्यामची आई' ही कादंबरी तर लहानापासून थोरापर्यंत सर्वांनी वाचावी अशी संस्कारमय कादंबरी आहे. या पुस्तकात एकूण ४२ कथा लिहिल्या आहेत.श्यामला जेव्हा त्याचे मित्र त्याच्या जीवनातील सुगंधाविषयी विचारतात तेव्हा श्याम म्हणतो, "माझ्या आईचे ही देणे गड्यांनो ! माझ्यात जे काही चांगले आहे,ते माझ्या आईचे आहे. आई माझा गुरु,आई माझी कल्पतरू,तिने मला काय काय तरी दिले ! तिने मला के दिले नाही ? सारे काही दिले ! प्रेमळपणे बघावयास,प्रेमळ बोलावयास तिनेच मला शिकविले."३ अश्याप्रकारे या वाक्यातून आपणास कळून येते की 'श्यामची आई' या कादंबरीतून सानेगुरुजींनी आईची थोरवी, मातृप्रेम हे मूल्य बिंबवले आहे. त्याचप्रमाणे भूतदया, बंधुप्रेम, स्वावलंबीत्व, वडीलधाऱ्यांविषयी आदर, क्षमाशीलता, परोपकार, निसर्ग प्रेम या सर्व मूल्यांचे दर्शन यामधून घडते.

'श्याम' या कादंबरीतून देखील विविध मूल्यदर्शन आपणास घडते. या पुस्तकात श्यामचा मुसलमान मित्र अहमद व श्याम यांच्यातील मैत्रीतून सर्वधर्म समभावाचे मूल्य दिसून येते. त्याविषयी बोलताना श्याम म्हणतो, "हिंदू व मुसलमान उभयंतानी या श्यामला प्रेम दिले आहे,लहानपणापासून दिले आहे. साऱ्या जातींनी व साऱ्या धर्मांनी मला ओलावा दिला आहे."४ 'तीन मुले' या कादंबरीत भातुकलीचा खेळ खेळताना छोटी मुले कशी भांडतात त्याचे दर्शन घडते. गरीब-श्रीमंतातील दरी दूर करायची असून तो विषय या कादंबरीत मांडला आहे.

'श्यामचा जीवनविकास' या कादंबरीत आपल्या जीवनाचा विकास कसकसा होत गेला ते सांगणारी कादंबरी म्हणजे श्यामचा जीवनविकास' कादंबरीतील सूत्र स्वतः गुरुजी असून त्यांनी आपल्या जीवनातील महत्वपूर्ण घटना यामध्ये दिलेल्या आहेत.या कादंबरीत श्यामचा मित्र राम व श्याम यांच्यातील अतूट मित्रत्वाचे दर्शन घडते. श्याम दिवसा रामसाठी वाचत असे व रात्री स्वतःसाठी त्यामुळे राम त्याला म्हणत असे की माझ्यासाठी तुला त्रास. तुला दोनदोनदा वाचावे लागते त्यावर श्याम म्हणत, "मला मुळीच त्रास नाही.तुझ्या थोडे उपयोगी पडता आले म्हणून मला आनंद होतो. त्रास वैगेरे मनातही आणू नकोस."५ अश्याप्रकारे गुरुजींनी विविध कादंबरीतून मूल्ये रुजवली आहेत.

**साने गुरुजींच्या कथा या बालसाहित्यातून मूल्यदर्शन:-**

साने गुरुजींनी लिहिलेल्या 'साने गुरुजींच्या गोड गोष्टी'या कथामालेत १० कथांचा समावेश होतो. त्यामध्ये खरा मित्र, घामाची फुले, मनुबाबा, फुलांचा प्रयोग, दुःखी,

बेबी सरोजा, करुणा देवी, सोराब नी रुस्तुम, यती की पती, चित्रा नि चारू या कथांचा समावेश होतो. या विविध कथामधून प्रामाणिकपणा, श्रमाचे महत्व, हिंदू-मुस्लिम ऐक्य, परोपकार, देशप्रेम, मानवता, स्वाभिमान, कर्तव्यदक्षता या विविध मूल्यांचे दर्शन या विविध कथेतून होते. साने गुरुजींनी 'घामाची फुले' या पुस्तकातील शेवटच्या कथेत मुलांना श्रमाचे महत्व सांगताना म्हटले आहे, "ज्या घामातून काही तरी उपयोगी वस्तू निर्माण होते, सर्वांना लागणाऱ्या वस्तू निर्माण होतात, धान्य, फुले, फळे, घरे, दारे, कपडे नाना संसारोपयोगी वस्तु निर्माण होतात, तो घाम पवित्र. प्रामाणिक श्रमाचा निढळाचा घाम."६ 'मनुबाबा' या मध्ये १० कथा आहेत. स्वार्थी विनू, निष्पाप मनू, निष्क्रिय ठकसेन आणि कष्टाळू संपत, थोर मनाचा मनुबाबा ही व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्यातून गुरुजींनी विविध मूल्ये रुजवली आहेत.

'फुलांचा प्रयोग' यामध्ये २ दीर्घ कथा दिलेल्या आहेत. त्यातून लबाड, धूर्त, स्वार्थी, ढोंगी, कपटी माणसांचा शेवट हा वाईटच होतो आणि ध्येयवादी कष्टाळू, निस्वार्थी माणसांचा कश्याप्रकारे विजय होतो हे आपणास समजते व त्यातून बालकांवर विविध मुल्यांतून संस्कार घडतात. 'सोराब नी रुस्तुम' या मध्ये ४ कथा आहेत. कोकणातील निसर्गरम्य वातावरण, तेथील माणसे, प्राणिमात्रांवरील प्रेम या सर्वांचे दर्शन या कथामधून घडते. भूतदया या विशेष मुल्याची रुजवणूक होते.'खरा मित्र' या पुस्तकात ६ गोष्टी (आवडती नावडती,तीन मडकी,न्याय देणारा गुराखी,गोसावी,सोन्याची साखळी,खरा मित्र) दिल्या आहेत.या विविध गोष्टीतून चांगले बोध दिले आहेत. या पुस्तकातील सर्वच कथा अतिशय बोधदायक आहेत. समतेचे मूल्य दिसून येते.

'चित्रा नि चारू' या कथामालेत धुळे जेलमध्ये गुरुजींच्या एका मित्राने तमिळ वाङ्मयातील नवलकथा सांगितल्या होत्या त्या पैकी आवडलेली गोष्ट मनात ठेऊन चित्रा नि चारू ची कथा लिहिली आहे. या कथेतून हिंदू-मुस्लिम ऐक्यभावना दृढ केली आहे. 'दु:खी' या मध्ये थोर फ्रेंच साहित्यिक व्हिक्टर ह्युगो यांच्या less miserable कादंबरीचे कथासूत्र घेऊन सानेगुरुजींनी 'दु:खी' ही दीर्घकथा लिहिलेली आहे. समाजातील विषमतेची खोल दरी ज्यावेळी नष्ट होईल त्याच वेळी मानव जातीत खरी मानवता नांदेल हा अत्यंत मोलाचा संदेश दिला आहे. त्यातून समानता हे महत्वाचे मूल्य दिसून येते. 'करूणादेवी' या कथेमध्ये प्रजाप्रेमी राजा यशोधर,कर्तव्यदक्ष शिरीष,पतिव्रता व सेवाभावी करूणादेवी, त्यागी हेमा व मित्रप्रेमी प्रेमानंद यांचा वाचकांच्या मनावर खोलवर परिणाम होतो.परोपकरचे मूल्य दिसून येते.

साने गुरुजींच्या कथा म्हणजे मानवी जीवनात होणार नैसर्गिक बदल,त्याच्या वाचनातून कळत नकळत अनेक संस्कार घडत असतात.

**साने गुरुजींच्या कविता या बालसाहित्यातून मूल्यदर्शन:-**

कवितेच्या वैशिष्ट्याचा विचार करता, मोजक्या शब्दात मोठा आशय व्यक्त करणे, शब्दालंकार व अर्थालंकार या मधून येणारी आशयगर्भता, अर्थपूर्ण कल्पनांचा सुंदर आविष्कार या सर्वांचा समावेश होतो. साने गुरुजींच्या 'पत्री' या काव्यसंग्रहात त्यांनी लिहिलेल्या काही बाल कविता ह्या आजही खूप लोकप्रिय आहेत. 'हस रे माझ्या मूला' हे बालगीत तर खूपच छान आहे. त्यातील प्रत्येक शब्द न शब्द मनाला भावतो.

"वारा वदे
कानामध्ये
गीत गाईन तुला
ताप हरिन
शांती देईन
हस रे माझ्या मूला ||"७

त्याचप्रमाणे 'खरा तो एकची धर्म' हे प्रार्थना गीत,'बाल सागर भारत होवो' हे देशभक्ती गीत आजही सर्व शाळांमध्ये बोलले जाते तसेच देशप्रेमाच्या कविता लिहिल्या आहेत. या सर्व कवितांमधून देशप्रेम, बंधुभाव, समानता ही विविध मूल्ये दिसून येतात. मनो-मंदिर-राम या त्यांच्या कवितेत त्यांनी मनातील व्यथा मांडली आहे. आपला राम आपल्याला सोडून कुठे गेला आता मी काय करू असा प्रश्न विचारतात. लहानपणापासून आपल्या हृदयात असलेला परमेश्वर आता कुठे गेला याचा शोक व्यक्त केला आहे.

" बाल्यापासून
हृदयात बसून
गोष्टी संगे गोड
पुरवी माझे कोड
सोडून गेला परि तो आज माझे धाम
कोठे गेला सांगा रुसून माझ्या श्याम
कोठे गेला माझा मनो-मंदिर-राम
हाय मी काय करू ||"८

आईचे आपल्या मुलांवर असलेले प्रेम व मुलांना चांगल्या सवयी लावण्यासाठीची तिची धडपड,त्यासाठी वेळप्रसंगी कठोर बनणारी आई सानेगुरुजींच्या 'आईचा मार'या कवितेतून दिसते.

"आई ! आई !तू मज मार मार ||
मारून मारून मजला रडवी
लावी मन्नयनांस धार आई || आई ||"९

सानेगुरुजींच्या कविता बाल साहित्याचा एक महत्वाचा भाग आहे. त्यांच्या कविता बाल मनाचा ठाव घेणाऱ्या तर होत्याच पन त्यातून गर्भितार्थ फार मोठा आहे. त्यांच्या मनातील भाव त्यात दिसून येतात.

**साने गुरुजींच्या पत्रे या बालसाहित्यातून मूल्यदर्शन:-**

साने गुरुजींनी लिहिलेल्या साहित्यातील पत्रे हा एक महत्वाचा साहित्य प्रकार आहे. त्यांनी 'सुंदर पत्रे' व 'श्यामची पत्रे' अश्या पत्रांचे लेखन केले. सानेगुरुजींनी आपली पुतणी चि. सुधाताई यांना लिहिलेल्या ४२ पत्रांचा संग्रह या पुस्तकात आहे. साधारणपणे गुरुजींनी लिहिलेल्या सर्वच पत्रात निसर्गाचे सुंदर, रम्य वर्णन केले आहे. विविध ऋतू व ऋतूंमधील निसर्गाची शोभा यांचे जणू चित्रच रेखाटले आहे. ही पत्रे वाचताना आपल्या डोळ्यासमोर ती फुले, निसर्ग सौंदर्याचे चित्र तरळत राहते. त्याचप्रमाणे लहानपणीच्या गावच्या सर्व आठवणींना उजाळा दिला आहे.

पैगंबर, विवेकानंद, सुभाषचंद्र या सारख्या थोराचे त्यांच्या कार्याचे वर्णन केले आहे. सुंदर पत्रांद्वारे सुधाताई व सर्वच बालकांना विविध शिकवण देण्याचा गोड प्रयत्न केला आहे. 'सुंदर पत्रे'या पुस्तकात गुरुजींनी सुधाताईना अनेक पाश्चात्य विचारवंतांची ओळख करून दिली आहे. आइनस्टाईन, गटे, वर्डस्वर्थ या सर्व विचारवंतांची नावे ठिकठिकाणी घेतल्यामुळे मुलांमध्ये जिज्ञासा निर्माण होते. सुधा जरी लहान असली तरी लहान मुलांना महान विचार लवकर समजतात या अनुभवाने गुरुजींनी तिला पत्रातून विविध उपदेश केलेले आहेत. खरोखरच अतिशय समर्पक, सोप्या, सहज, सुलभ भाषेत आपले विचार विविध उदाहरण,दाखले देऊन सर्वांपुढे मांडले आहेत.

'सुंदर पत्रे'च्या माध्यमातून सानेगुरुजींनी सुधाताईना त्यांच्या आईचा व्यवस्थितपणा ह्या गुणाचे महत्त्व पटवून देताना व्यवस्थितपणा कसा, कुठे बाळगावा या विषयीचे बाळकडू पाजले आहेत. स्वराज्याचा खरा अर्थ सांगताना गुरुजींनी सुधाताईना अतिशय समर्पक अशी उदाहरणे दिली आहेत. आपल्यापासून कोणालाही अकारण त्रास न व्हावा, दुसऱ्यांचे अकारण नुकसान करू नये ह्या विचार म्हणजेच स्वराज्य असे त्यांनी सांगितले आहे. अश्याप्रकारे सानेगुरुजींनी त्यांच्या पत्रातून आदर्शाचे चांगले धडे केवळ सुधाताईनाच नव्हे तर संपूर्ण बालवाचकांना दिले आहेत.

**साने गुरुजींच्या चरित्र या बालसाहित्यातून मूल्यदर्शन:-**

साने गुरुजींनी 'गोष्टीरूप गांधीजी', 'नामदार गोखले', 'रविंद्रनाथ टागोर', 'लोकमान्य टिळक', 'गोष्टीरूप विनोबाजी' (विनोबा भावे) ह्या सारखी चरित्रे लिहिली जी बालसाहित्याचा एक महत्वाचा भाग आहेत. थोरांच्या चरित्रातून येणाऱ्या पिढीला थोरांचे कर्तृत्व, त्यांची महानता, त्यांनी केलेला संघर्ष, त्यांचे कार्य या सर्वांचा परिचय होतो. गोष्टीरूप गांधीजी या चरित्रात गुरुजींनी गांधींच्या कार्याचा व उपदेशाचा प्रचार केला आहे. गांधीजींच्या त्यागाविषयी सांगताना एक प्रसंग सांगितला आहे. गांधीजींना जेव्हा सुंदर वस्तू भेट देण्यात आल्या तेव्हा ते म्हणाले, "मी ह्या वस्तू तुम्हाला परत देतो. ह्या वस्तू म्हणजे तुमची ठेव. येथील जनतेच्या कामासाठी ह्यांचा उपयोग करा."१० अश्याप्रकारे ह्या गोष्टीतून त्यांच्यातील त्याग दिसून येतो. त्याच प्रमाणे स्त्रीयांचे शिलरक्षण या कथेतून स्त्री प्रती आदर,नम्रता,स्वावलंबन या विविध कथा मधून वरील मूल्ये दिसतात. पुण्यश्लोक श्री शिवराय या चरित्रात "शिवाजीमहाराजांचे भव्य जीवन डोळयासमोर आले म्हणजे शतविचार स्फुरतात. परंतु आजच्या भारतीय परिस्थितीत त्यांच्या चरित्रातील सर्वधर्मसहिष्णुता व गरिबांची आर्थिक स्थिति सुधारण्याची तळमळ या दोन गोष्टी सूर्यप्रकाशाला डोळयासमोर उभ्या राहतात."११ असे गुरुजींनी म्हटले आहे. हयातून विविध मूल्ये रुजविली आहेत.

लोकमान्य टिळक ह्यांच्या चरित्रात त्यांच्याविषयी असलेला आदर,त्यांची महत्ता,त्यांचे कार्य या सर्वाबद्दल बोलताना गुरुजी म्हणतात, " जनताजनार्दनाची सेवा करणाऱ्या महापुरुषा,तो जनता-जनार्दन आमचे ही दैवत बनो."१२ टिळकांच्या चरीत्रातून प्रामाणिकपणा, श्रमाचे महत्व, स्वराज्याची तळमळ ही विविध मूल्ये प्रतीत होतात.

अश्याप्रकारे साने गुरुजींनी लिहिलेल्या विविध थोरांच्या चरित्रातून मुलांमध्ये विविध मूल्यांची जोपासना झाल्यावाचून राहणार नाही.

**साने गुरुजींच्या अनुवादित बालसाहित्यातून होणारे मूल्यदर्शन :-**

सानेगुरुजींनी जे लेखन केले त्यामध्ये अनुवादित साहित्याचा देखील महत्वाचा भाग आहे कारण इतर भाषेतील साहित्यकारांच्या चांगल्या साहित्यातील साहित्य कृतींचे सानेगुरुजींनी भाषांतर केले आहे त्यात के. के. मेनन च्या कादंबरीचा केलेला अनुवाद म्हणजेच 'कालीमतेची मुले' ही कादंबरी. ह्या कादंबरीतून गुरुजींनी ऐक्य भावनेचे मूल्य रुजवले आहे. आपल्या देशात अनेक जाती,धर्माचे लोक राहतात. त्या सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदावे, ऐक्याने राहावे हे कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. स्वामी, आत्माराम, अशोक, अरुणा, विनोद, मोतीराम ही पात्रे मानवतेच्या ऐक्यासाठी प्रयत्नात असल्याचे दिसून येते.

'कुरल' हे तमिळ संत कवी तिरूवल्लुवर यांचे काव्य आहे. सानेगुरुजींनी त्याचा अनुवाद केला आहे. त्यांची ही स्वतंत्र निर्मिती नसली तरी स्वतंत्र वाटते. यामध्ये जीवनाची आदर्श तत्वे सांगितली आहेत. 'कल्की' हे डॉ. राधाकृष्णन यांचे पुस्तक आहे त्याचा अनुवाद सानेगुरुजींनी 'कल्की अर्थात संस्कृतीचे भवितव्य' असा केला आहे. भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व,महान मूल्ये त्यांनी सांगितली आहेत.

**निष्कर्ष :-**

1) साने गुरुजींचे बालसाहित्य हे वैविध्यपूर्ण आहे.
2) साने गुरुजींच्या बालकांसाठी असलेल्या कवितांमधून बालकांचे भावविश्व साकारते त्याचबरोबर मुलांमध्ये काव्यरूची निर्माण होण्यास मदत होते.
3) साने गुरुजींच्या चरित्रातून बालकांना थोरांनी केलेल्या कार्याची व त्यागाची माहिती होते व त्यातून नक्कीच ते प्रेरणादायी वाटेल असे आहे.
4) थोरांनी सांगितलेल्या गोष्टीतून त्यांच्या जीवनातील कठीण परिस्थितीवर त्यांनी कशी मात केली व जीवनात कश्या प्रकारे तडजोड केली याची कल्पना येते.
5) साने गुरुजींनी सुधाताईंना लिहिलेल्या पत्रांद्वारे मुलांमध्ये औपचारिक पत्र कसे लिहावे याची जाण निर्माण होते.
6) साने गुरुजींच्या गोड गोष्टीतून केवळ मनोरंजनच नाही तर बालकांवर संस्कार होतात व त्यांच्यात विविध मूल्यांची रुजवणूक होते. कथा या साहित्यप्रकाराला बालकांच्या भावविश्वाशी अत्यंत अनुरुपपणे जोडले आहे.

7) साने गुरुजींच्या कथा या बालसाहित्य प्रकारात वैविध्यपूर्ण कथा लिहिलेल्या आहेत. एकाच विषयावर न लिहिता त्यात विविध विषयाला हात घातला आहे. कथा व कथेतील पात्रे यांचा सुरेख मेळ घातला आहे. कथानक मनाला भावेल असे आहे. कथेतून झालेली वातावरण निर्मिती प्रभावी आहे.
8) साने गुरुजींच्या कादंबऱ्या ह्या अतिशय हृदयस्पर्शी आहेत,त्यातून विविध नातेसंबंधावर प्रकाश टाकला आहे. बालकांमध्ये त्यातून खूप काही शिकण्यासारखे आहे. कादंबऱ्यांचे स्वरूप बोधात्मक आहे. यातील भाषा सहज, सुबोध, सरळ आहे त्यामुळे बालकांना समजण्यास सोपी आहे.
9) साने गुरुजींनी कथा, कादंबरी, पत्रे, चरित्रे, नाटक, अनुवाद या विविध बाल साहित्य लेखनातून समता, बंधुता, सर्वधर्मसमभाव, देशप्रेम, भूतदया, सहिष्णुता, समानता, प्रामाणिकपणा ह्या विविध मूल्यांचे दर्शन घडते.
10) एकंदरीत साने गुरुजींनी लिहिलेल्या सर्वच बालसाहित्यातून विविध मूल्यदर्शन होते. त्यामुळे हे साहित्य संस्कारमय आहे असे म्हणणे रास्त ठरेल.

**संदर्भ सूची :-**


1) साधना साप्ताहिक - मुंबई - अंक १ ला रविवार दि.१५ ऑगस्ट १९४८
2) साने गुरूजी- श्यामची आई - वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.१३
3) साने गुरुजी - श्यामची आई - वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.४
4) साने गुरुजी - श्याम - वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.२३
5) साने गुरुजी - श्यामचा जीवनविकास - वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.५८
6) साने गुरुजी - घामाची फुले - वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.६४
7) साने गुरुजी - पत्री - वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.७४
8) साने गुरुजी - पत्री- वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.६३
9) साने गुरुजी - पत्री- वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.७०
10) साने गुरुजी - 'गोष्टीरूप गांधीजी'- वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.२२
11) साने गुरुजी - 'हिमालयाची शिखरे आणि तीन चरित्रे' - वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.१५
12) साने गुरुजी - 'हिमालयाची शिखरे आणि तीन चरित्रे'- वरदा प्रकाशन, पुणे, (२०११) पृ. क्र.२१

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# शंतनु राव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वाचा उत्क्रांतीशील प्रवास: किर्लोस्कर उद्योगसमूहाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रभावाचा अभ्यास

**सचिन फाळके**
एस.एस.टी. कला व वाणिज्य महाविद्यालय, उल्हासनगर-४
**Corresponding Author: सचिन फाळके**
**Email: -** sachinphalke@sstcollege.edu.in

**गोषवारा (Abstract)**

द्वितीय महायुद्धानंतर किर्लोस्कर समूहाचा झपाट्याने विकास झाला, ज्यामागे एस. एल. किर्लोस्कर यांचे नेतृत्व होते. १९४६ मध्ये त्यांनी बेंगळुरू येथे किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनी आणि पुण्यात किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेडची स्थापना केली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी डिझेल इंजिनचे देशातच उत्पादन सुरू करून आयात पर्यायाची व्यवस्था केली.किर्लोस्कर समूह देशातील एक प्रमुख औद्योगिक समूह म्हणून ओळखला जातो, ज्याने भारताच्या औद्योगिक, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांवर मोठा प्रभाव टाकला आहे. या शोधनिबंधात शांतनुराव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वाखालील विकासाचा अभ्यास केला आहे. त्यांच्या धोरणात्मक दृष्टिकोनामुळे समूहाच्या वाढीवर कसा परिणाम झाला, हे स्पष्ट करण्यात आले आहे. शिक्षण, रोजगारनिर्मिती आणि नवोन्मेष यामधील कंपनीचे योगदान त्यांनी कसे घडवले, याचे सखोल विश्लेषण या निबंधात करण्यात आले आहे.या शोधनिबंधात किर्लोस्कर समूहामधील नेतृत्व विकासाचा मागोवा घेण्यात येणार असून, शांतनुराव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वाने समूहाला विकासाच्या नव्या टप्प्यावर कसे नेले, यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. सामाजिक उत्तरदायित्व, आर्थिक प्रगती आणि शैक्षणिक उपक्रम यामधील प्रगतीसह या विकासाचा भविष्यकालीन अर्थ कसा असू शकतो, याचा आढावा घेतला आहे.

**मुख्य मुद्दे** – एस. एल. किर्लोस्कर, ऑईल इंजिन्स लिमिटेड, शांतनुराव किर्लोस्कर, औद्योगिक क्षेत्र

## परिचय (Introduction)

एस. एल. किर्लोस्कर हे किर्लोस्कर समूहाचे संस्थापक लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचे पुत्र होते, ज्यांनी किर्लोस्करवाडी आणि समूहाची स्थापना केली होती. एस. एल. किर्लोस्कर यांनी केंब्रिज, मॅसाच्युसेट्स येथील एमआयटी (MIT) मधून यांत्रिक अभियांत्रिकीमध्ये विज्ञान पदवी (B.Sc.) प्राप्त केली. एमआयटीमधून पदवी मिळवणारे ते पहिले काही भारतीयांपैकी एक होते. याच काळात त्यांनी अमेरिकन लष्करामध्ये राखीव अधिकारी म्हणूनही काम केले.1940 मध्ये एस. एल. किर्लोस्कर यांनी मशीन टूल्सच्या निर्मितीसाठी मैसूर किर्लोस्कर लिमिटेडची स्थापना केली. किर्लोस्कर समूहाची स्थापना लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी 1888 मध्ये केली होती. पुणे येथे आधारित हा समूह एक कौटुंबिक उद्योगसमूह आहे. आपल्या दीर्घ इतिहासात समूहाने अभियांत्रिकी व उत्पादन क्षेत्रात विविधतेने कार्य केले असून प्रत्येक पिढीच्या नेतृत्वाने या विस्तारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.समूहाचे सध्याचे नेतृत्व शांतनुराव किर्लोस्कर यांच्याकडे आहे. त्यांनी समूहाचे दृष्टिकोन आणि कार्यप्रणाली आधुनिक काळानुसार नव्याने परिभाषित केली आहे.

## गृहीतक (Hypothesis)

**प्राथमिक गृहीतक:**

शांतनुराव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वामुळे किर्लोस्कर समूहाच्या सातत्यपूर्ण वाढीस चालना मिळाली आहे. या नेतृत्वामुळे समूहाच्या सामाजिक-आर्थिक योगदानात वाढ झाली असून, शैक्षणिक कार्यक्रमांत प्रगती आणि भारतात शाश्वत औद्योगिक विकासाला पाठबळ मिळाले आहे.

**दुय्यम गृहीतक:** शांतनुराव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वाखाली किर्लोस्कर समूहाने कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी

(CSR) उपक्रम आपल्या व्यवसायात प्रभावीपणे समाविष्ट केले आहेत, ज्यामुळे विशेषतः शिक्षण आणि रोजगारनिर्मितीच्या क्षेत्रात दीर्घकालीन सामाजिक व आर्थिक प्रगतीस प्रोत्साहन मिळाले आहे.

**संशोधन उद्दिष्टे (Research Objectives)**

- शांतनुराव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वशैलीचा अभ्यास करून किर्लोस्कर समूहाच्या विस्तारावर त्याचा परिणाम समजून घेणे.
- किर्लोस्कर समूहाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला प्रभाव, विशेषतः रोजगारनिर्मिती, नवोन्मेष आणि पायाभूत सुविधा विकास यावर प्रकाश टाकणे.
- किर्लोस्कर समूहाच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या शैक्षणिक उपक्रमांचे विश्लेषण करणे, विशेषतः अभियांत्रिकी आणि तांत्रिक शिक्षण क्षेत्रात.
- किर्लोस्कर समूहाची सामाजिक उत्तरदायित्व आणि शाश्वत उद्योग पद्धतींप्रती असलेली बांधिलकी अभ्यासणे.

**साहित्य समीक्षण (Literature Review)**

**या साहित्य समीक्षणामध्ये खालील क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे:**

1. किर्लोस्कर समूहाचा ऐतिहासिक विकास – स्थापना पासून आजपर्यंतचा प्रवास.
2. नेतृत्वाच्या सिद्धांतांचा अभ्यास – विशेषतः परिवर्तनात्मक नेतृत्व (Transformational Leadership) व कौटुंबिक व्यवसायातील नेतृत्वशैली.
3. भारताच्या औद्योगिकीकरणात किर्लोस्कर समूहाचा आर्थिक प्रभाव.
4. सामाजिक व शैक्षणिक उपक्रम – विशेषतः ग्रामीण विकास व कौशल्यवृद्धी क्षेत्रातील प्रयत्न.
5. भारतीय औद्योगिक समूहांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमांचा अभ्यास – विशेषतः किर्लोस्कर समूहाच्या उपक्रमांवर भर.

**संशोधन पद्धत (Research Methodology)**

**1. डेटा संकलन (Data Collection):**

**प्राथमिक डेटा:**

किर्लोस्कर समूहातील मुख्य भागधारकांशी मुलाखती घेणे – यात वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, व औद्योगिक तज्ज्ञ यांचा समावेश. स्थानिक समुदाय व शैक्षणिक संस्थांवर group's social influence समजून घेण्यासाठी सर्वेक्षण व प्रश्नावली वापरणे.

**दुय्यम: डेटा:**

वार्षिक अहवाल, कंपनीच्या कागदपत्रे, उद्योग विश्लेषणातील सार्वजनिक माहिती, शैक्षणिक प्रकाशने, वृत्तपत्र लेख, व सरकारी दस्तऐवज यांचा अभ्यास.

**2. गुणात्मक विश्लेषण (Qualitative Analysis):**

- शांतनुराव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वाखालील महत्त्वपूर्ण उपक्रमांचे केस स्टडी पद्धतीने विश्लेषण – जसे कि किर्लोस्कर इन्स्टिट्यूट मॅनेजमेंट स्टडीज (KIAMS) व पर्यावरणीय प्रकल्प.
- नेतृत्व धोरणांचे विश्लेषण – त्यांनी अमलात आणलेल्या धोरणांचा अभ्यास.

**3. परिमाणात्मक विश्लेषण (Quantitative Analysis):**

- गेल्या दहा वर्षांतील महसूल, बाजारातील हिस्सा, आणि रोजगारनिर्मिती यांचा सांख्यिक विश्लेषण.
- शैक्षणिक उपक्रमांचा सामाजिक परिणाम मोजण्यासाठी सर्वेक्षण – जसे की किती विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती, कौशल्यविकास उपक्रमांचा लाभ घेतला.

**4. डेटा विश्लेषण उपकरणे (Data Analysis Tools):**

- सर्वेक्षणांचे परिणाम समजून घेण्यासाठी वर्णनात्मक सांख्यिकी तंत्रांचा वापर.
- शांतनुराव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वाखाली किर्लोस्कर समूहाचे SWOT विश्लेषण करणे.

**आर्थिक वाढ (Economic Growth):**

**या विभागात ग्राफद्वारे खालील गोष्टी दाखवल्या जातील:**

- किर्लोस्कर समूहाच्या महसूल वाढीचा आलेख
- नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश
- वाढलेली रोजगार संधी – गेल्या दहा वर्षांतील ट्रेंड

**सामाजिक प्रभाव (Social Impact):**

एक नकाशा तयार केला जाईल ज्यात किर्लोस्कर समूहाने ज्या भागांमध्ये CSR उपक्रम सुरू केले आहेत, विशेषतः ग्रामीण व दुर्लक्षित भागांमध्ये हे दाखवले जाईल.

**शैक्षणिक प्रभाव (Educational Impact):**

**एक तक्ता तयार केला जाईल ज्यात खालील गोष्टी स्पष्ट होतील:**

- किर्लोस्कर संस्थांमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या

- त्यांच्या उद्योगांतील रोजगार मिळवण्यावर झालेला प्रभाव
- किर्लोस्कर अल्युमनीपैकी किती लोकांनी कंपनीत किंवा तत्सम क्षेत्रात रोजगार मिळवला
- **Charts & Maps**







**Revenue Growth of Kirloskar Group Over the Last Decade – Line graph.**




**Projected Income Statement: Kirloskar Oil Engines Limited**

**शोध निष्कर्ष**

**१. नेतृत्वशैली:**

शांतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर हे भारताच्या औद्योगिक इतिहासातील एक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या नेतृत्वाखाली किर्लोस्कर समूहाचा विकास केवळ कृषी उपकरणांपुरता मर्यादित न राहता तो एक बहुआयामी अभियांत्रिकी समूह झाला. त्यांच्या धोरणात्मक दूरदृष्टीमुळे समूह विविध औद्योगिक क्षेत्रांत विस्तारला आणि आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान आत्मसात करण्यात यशस्वी ठरला. त्यांचे योगदान केवळ व्यवसायापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी तांत्रिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर भर दिला, कारण सक्षम कामगारवर्ग हे औद्योगिक प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे असे त्यांचे मत होते. शिक्षण व प्रशिक्षण संधी वाढवण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले. त्यांच्या नेतृत्वशैलीमध्ये गुणवत्ता, कार्यक्षमता आणि ग्राहक समाधान या मूल्यांचा ठाम ठसा होता जो आजही किर्लोस्कर समूहात जाणवतो.

**२. सामाजिक-आर्थिक योगदान:**

**तंत्रज्ञान व नवोन्मेष (Technological Advancement & Innovation):**

शांतनुराव यांनी तंत्रज्ञानातील प्रगती व आधुनिकीकरणाचा सातत्याने पुरस्कार केला. त्यांनी संशोधन व विकास क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली, ज्यामुळे समूहात नवोन्मेषाची संस्कृती निर्माण झाली आणि नवे उत्पादन व तंत्रज्ञान विकसित झाले.

**धोरणात्मक भागीदारी व सहकार्य (Strategic Partnerships & Collaborations):**

जागतिक बदलत्या परिस्थितीत आघाडीच्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारी करून तंत्रज्ञान व कौशल्यांचे

हस्तांतरण केले. यामुळे उत्पादन क्षमतेत व विविधतेत लक्षणीय वाढ झाली.

**नेतृत्व विकास व उत्तराधिकार नियोजन (Leadership & Succession Planning):**

भविष्यातील नेतृत्व विकसित करण्यासाठी त्यांनी प्रशिक्षण कार्यक्रम व कौशल्यविकास उपक्रम सुरू केले. उत्तराधिकार नियोजनावर भर देऊन समूहाच्या दीर्घकालीन टिकावाची हमी दिली.

**आर्थिक कामगिरी व वाढ (Financial Performance & Growth):**

त्यांच्या व्यावसायिक कौशल्यामुळे समूहाने आर्थिक स्थैर्य प्राप्त केले. विविध आर्थिक संकटांवर मात करून नव्या संधींचा लाभ घेत समूह भारतातील आघाडीचा औद्योगिक समूह बनला.

**३. शैक्षणिक उपक्रम / शाश्वतता व CSR:**

शांतनुराव यांच्या पुढाकाराने स्थापन झालेले **किर्लोस्कर इन्स्टिट्यूट ऑफ अ‍ॅडव्हान्स्ड मॅनेजमेंट स्टडीज (KIAMS)** व इतर शैक्षणिक संस्थांशी सहकार्याच्या माध्यमातून अनेक तरुण तांत्रिक शिक्षण व नेतृत्वगुण आत्मसात करत आहेत.

समूहाच्या CSR धोरणांमध्ये शाश्वततेला केंद्रस्थानी ठेवले आहे – विशेषतः ग्रामीण भारतात पर्यावरणपूरक तंत्रज्ञान व सामाजिक कल्याण कार्यक्रम राबवले जात आहेत.

**किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनी लिमिटेड (Kirloskar Pneumatic Company Limited):**

- **स्थापना वर्ष:** १९५८
- **कर्मचारी संख्या:** ९००
- **उत्पादन श्रेणी:**
  - एअर कंप्रेसर्स (Rotary Screw, Garage Compressors, Railway Brake Compressors)
  - रेफ्रिजरेशन व एअर-कंडिशनिंग सोल्यूशन्स (Ice Plants, Transport AC, Screw Compressor Packages)
  - गॅस कंप्रेसर पॅकेजेस (Hydrocarbons, Special Gases)
  - ट्रान्समिशन (Hydraulic GearBoxes, Marine Gear, Windmill GearBoxes, Traction Gears)

**निष्कर्ष (Conclusion):**

शांतनुराव किर्लोस्कर यांच्या नेतृत्वाने किर्लोस्कर समूहाची दिशा व दृष्टिकोन निश्चित केला. त्यांच्या धोरणात्मक दूरदृष्टीमुळे समूहाचे जागतिक स्तरावर अस्तित्व निर्माण झाले आणि भारतातील आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासाला चालना मिळाली. त्यांच्या नेतृत्वामुळे समूहाने आर्थिक यश तर मिळवलेच, पण सामाजिक जबाबदारी व शाश्वततेचे मूल्यही अंगीकारले. विशेषतः तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रातील त्यांच्या उपक्रमांमुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रात मोठा प्रभाव पडला आहे.

एकंदरीत, शांतनुराव किर्लोस्कर यांचे नेतृत्व हे शिकवते की प्रभावी नेतृत्वाच्या माध्यमातून एक कौटुंबिक व्यवसाय जागतिक स्तरावरील सामाजिकदृष्ट्या जबाबदार संस्थेमध्ये रूपांतरित होऊ शकतो.

**ग्रंथसूची (Bibliography – Marathi Medium):**

1. किर्लोस्कर, एस. आर. (2019). *Transformational Leadership: A Case Study of Kirloskar Group*. पुणे: किर्लोस्कर समूह प्रकाशन.
2. शर्मा, आर. (2020). *The Role of Corporate Social Responsibility in India: The Kirloskar Group's Example*. *Journal of Indian Business Studies*, 12(4), 56-78.
3. राव, पी. (2018). *Economic Contributions of Family-Owned Businesses in India*. मुंबई: अकॅडमिक प्रेस.
4. *Kirloskar Group Annual Report* (2015–2024). किर्लोस्कर समूह.
5. *The Impact of Corporate Leadership on Education in India*. (2021). *Educational Impact Journal*, 14(2), 92–104.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.6 No.30** **Mar-Apr- 2025**

# भारत में निजता का अधिकार: निजता की संकल्पना के संदर्भ में संवैधानिक सभा की बहस का अध्ययन

**पिंकी**
जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय में शोधार्थी
**Corresponding Author: पिंकी**
**Email:** pbhidwal@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15697033**

**शोध सार**

24 अगस्त 2017 को सर्वोच्च न्यायालय द्वारा निजता के अधिकार को एक मौलिक अधिकार के रूप में मान्यता प्रदान की, जिसे अनुच्छेद 21 के संदर्भ में परिभाषित किया गया। सर्वोच्च न्यायालय के शब्दों में 'निजता मनुष्य के गरिमा पूर्ण अस्तित्व का एक अभिन्न अंग है'। भले ही संविधान में निजता शब्द का उल्लेख नहीं मिलता परंतु निजता के अधिकार को संविधान में मान्यता अवश्य दी गई है और साथ ही सर्वोच्च न्यायालय ने यह माना है कि व्यक्ति का व्यक्तिगत डेटा, व्यक्ति की निजता की एक अहम शाखा है। जिसके संरक्षण हेतु सरकार को स्पष्ट और व्यापक कानून बनाने को कहा गया था। निजता की संकल्पना को संवैधानिक मान्यता स्वीकार करने और निजता को एक मौलिक अधिकार के रूप में परिभाषित करने में एक बहुत लंबी वैधानिक बहस चली है। निजता के अधिकार का मौलिक अधिकार के रूप में स्वीकार करने के पश्चात, इस शोध पत्र में भारतीय संविधान की संरचना के दौरान निजता की संकल्पना पर संवैधानिक बहस का विश्लेषण किया गया है।

**मुख्य शब्द**: निजता, निजता का अधिकार, संवैधानिक सभा बहस, व्यक्तिगत डेटा

**परिचय**

निजता को मौलिक अधिकार के रूप में स्वीकार करना हाल के आविष्कार और व्यापार पद्धति को स्वीकार करने को प्रमाणित करता है। जैसा कि सैमुअल डी. वारेन और लुइस डी. ब्रांडेस ने अपने लेख निजता का अधिकार (1890) में उल्लेख किया है।[1]अर्थात व्यक्ति की निजता को मौलिक अधिकार के रूप में मान्यता देना आज की परिस्थितियों के अनुरूप है और किसी व्यक्ति के व्यक्तिगत डेटा संरक्षण के लिए एक अलग स्तर पर विशेष और व्यापक कानून की व्यवस्था करना समकालीन समाज की मांग के अनुरूप है। संयुक्त राष्ट्रीय घोषणा पत्र, नागरिक और राजनीतिक अधिकारों पर अंतरराष्ट्रीय सम्मेलन (इंटरनेशनल कान्वेंट ऑन सिविल एंड पॉलीटिकल राइट्स) और कई अन्य अंतरराष्ट्रीय और क्षेत्रीय संधियों में निजता को एक मानव अधिकार के रूप में स्वीकार किया गया है(अनुच्छेद 17)।[2] कई देश ऐसे हैं जिनके संविधान में निजता को स्पष्ट रूप से उल्लेखित नहीं किया गया है। उदाहरण के लिए अमेरिका, आयरलैंड तथा भारत लेकिन इन देशों की न्यायालय द्वारा संविधान के अन्य प्रावधानों की व्याख्या कर निजता के अधिकार को मान्यता प्रदान की गई है।[3] मानव अधिकार पर 'यूरोपीयन कन्वेंशन ऑन हुमन राइट्स' के अंतर्गत निजता के अधिकार को कानूनी रूप से संरक्षित किया गया है (अनुच्छेद 8)।[4]

निजता के अधिकार की सुरक्षा अवधारणा का समकालीन विस्तारित रूप व्यक्तिगत डेटा संरक्षण है। क्योंकि किसी भी व्यक्ति के व्यक्तिगत डेटा का बिना जानकारी दिए उपयोग में लाना व्यक्ति के निजता अधिकार को अर्थहीन बनता है। इस अवधारणा का विकास सूचना प्रौद्योगिकी के विकास के साथ-साथ हुआ है। इसीलिए समकालीन समय में व्यक्ति की निजता का अधिकार उसके व्यक्तिगत डेटा की सुरक्षा से अधिक घनिष्ठ रूप से संबंधित है और इसी गंभीरता को देखते हुए इस शोध पत्र में भारत में निजता की संकल्पना के विकास में संवैधानिक बहस के विश्लेषण पर केंद्रित किया गया है।

**उद्देश्य**

प्रस्तुत शोध पत्र का उद्देश्य में भारत में निजता के अधिकार की संरचना के अक्स को संविधान बहस में देखना और भारत में निजता की संकल्पना के अस्तित्व की जड़े को मजबूत करना है। शोध पत्र का उद्देश्य यह स्पष्ट करना भी है कि निजता की संकल्पना का अस्तित्व भारत में पहले से उपस्थित है।

**शोध स्रोत एवम पद्धति**

**प्राथमिक स्रोत**

इस शोध कार्य में विश्लेषणात्मक शोध तकनीक का प्रयोग किया गया है। जिसमें विभिन्न प्रकार के प्राथमिक एवं

द्वितीय स्त्रोत का अध्ययन कर शोध विषय के बारे में जानकारी प्राप्त की जाएगी। जिसके अंतर्गत ऐतिहासिक विश्लेषण शोध तकनीक मुख्य है। प्राथमिक स्तोत्र में मुख्यता भारतीय संविधान सभा में हुई बहस का अध्ययन शामिल है। जिनका सरोकार शोधपत्र के विषय में विशेष रूप से रहेगा।

**द्वितीय स्त्रोत**

शोध के अध्ययन की सामग्री हेतु द्वितीय स्त्रोत के अंतर्गत किताब, जर्नल, मैगजीन, अंतरराष्ट्रीय अध्ययन सामग्री, समाचार पत्र, शोधलेख आदि का उपयोग किया जाएगा तथा शोध विषय के बारे में नवीनतम जानकारी के लिए विभिन्न समाचार पत्र और वेबसाइट का उपयोग अध्ययन करने में शामिल है। शोध से जुड़ी महत्वपूर्ण अध्ययन सामग्री का अधिकांश रूप से ऑनलाइन स्तर पर इकट्ठा करने का प्रयास किया गया है।

**परिणाम और विवेचना**

भारतीय लोकतंत्र का वास्तविक रूपांतरण संविधान सभा द्वारा किया गया। संविधान सभा बुद्धिजीवियों की एक ऐसी सभा थी जिस ने विभिन्न लोकतांत्रिक तत्वों पर वाद विवाद कर भारतीय लोकतांत्रिक शासन व्यवस्था को तराशा है। अपने विचार-विमर्श के आरंभ में, संविधान सभा ने मौलिक अधिकारों और अल्पसंख्यकों के अधिकारों पर मसौदा लेख तैयार करने के लिए एक सलाहकार समिति की स्थापना की गई थी।[5] संविधान सभा वाद विवाद के अधिकारिक प्रति लेखों में निजता का अधिकार का विषय अवश्य ही चर्चित विषय था। बी. शिवा राव की "द फ्रेमिंग ऑफ इंडियाज कॉन्स्टिट्यूशन" संविधान के पाठ पर काम करने वाली विभिन्न उप-समितियों की बहस और चर्चा का सबसे व्यापक संग्रह है और यही पुस्तक इस शोध अध्ययन के उद्देश्य को सरल बनाती है। संविधान सभा के बुद्धिजीवियों द्वारा निजता के संकल्पना पर विचारों की विवेचना निम्नलिखित रूप से की गई है।[6]

**के.टी. शाह के "मौलिक अधिकारों पर नोट"**

शिवा राव की "द फ्रेमिंग ऑफ इंडियाज कॉन्स्टिट्यूशन" में निजता के अधिकार का पहला उल्लेख दिसंबर 1946 में के.टी. शाह के "मौलिक अधिकारों पर नोट" में था, जहां उन्होंने दुनिया भर में मौलिक अधिकारों के इतिहास पर चर्चा की और एक सूची प्रदान की जिसे वे आवश्यक अधिकार मानते थे। इनमें निजता का अधिकार भी शामिल था, जिसे स्वतंत्रता के अधिकार के एक पहलू के रूप में उस समय की सोच के अनुरूप बनाया गया था: इनमें से सबसे महत्वपूर्ण व्यक्ति की स्वतंत्रता और घर की निजता से संबंधित हैं।[7] कानून की उचित प्रक्रिया के बिना इस अधिकार के किसी भी हस्तक्षेप की अनुमति नहीं दी जा सकती है।

**के. एम. मुंशी द्वारा प्रस्तुत तर्क**

के. एम. मुंशी ने मार्च 1947 को मौलिक अधिकारों पर पहला मसौदा लेख प्रस्तुत किया, इसमें एक उप-अनुच्छेद शामिल था, जिसमें कहा गया था कि संघ के कानून की सीमा के भीतर प्रत्येक नागरिक के पास: उसके घर की अनुल्लंघनीयता का अधिकार, उसके पत्राचार की गोपनीयता का अधिकार, कानून या सार्वजनिक नैतिकता के विपरीत किसी भी तरीके से शोषण से संघ के कानून द्वारा सुरक्षित अपने व्यक्ति को बनाए रखने का अधिकार।[8] हरनाम सिंह का कथन "प्रत्येक आवास अनुल्लंघनीय" (Every dwelling shall be inviolable)।[9] निजता के अधिकार का एक भौतिक स्थान से जुड़ा हुआ कथन है।

**स्टेटस एण्ड माइनोरिटीज़ रिपोर्ट**

स्टेटस एण्ड माइनोरिटीज़ रिपोर्ट में डॉ बीआर अंबेडकर ने इसी तरह का सूत्रीकरण व्यक्त किया गया था: अनुचित तलाशी और बरामदगी के खिलाफ अपने व्यक्तियों, घरों, कागजात और प्रभाव में सुरक्षित रहने के लोगों के अधिकार का उल्लंघन नहीं किया जाएगा और कोई वारंट जारी नहीं किया जाएगा, लेकिन संभावित कारण पर, पुष्टि की शपथ द्वारा समर्थित और विशेष रूप से खोजे जाने वाले स्थान का वर्णन और जिन व्यक्तियों या वस्तुओं को जब्त किया जाना है।[10] इसका अर्थ है मौलिक अधिकारों पर उप-समिति की मसौदा रिपोर्ट में पत्राचार की गोपनीयता के अधिकार के साथ-साथ अनुचित खोज और जब्ती के अधिकार दोनों का एक विशिष्ट उल्लेख में शामिल था। बी. एन. राव (संविधान सभा के सलाहकार) भी मौलिक अधिकारों के भीतर निजता के अधिकार को शामिल करने से असहमत थे। राव मुख्य रूप से पुलिस अधिकारियों की खोजी शक्तियों के साथ निजता के अधिकार के हस्तक्षेप से चिंतित थे। जबकि अय्यर का मानना था कि पत्राचार में निजता और गोपनीयता का अधिकार देना विनाशकारी होगा: यह हर निजी/सिविल संचार को राज्य के कागजात के रूप में उन्नत करेगा। यह नागरिक मुकदमेबाजी पर प्रतिकूल प्रभाव डालेगा जहां दस्तावेज सबूत का एक अनिवार्य हिस्सा बनते हैं। राव और अय्यर दोनों सलाहकार समिति को निजता के अधिकार से संबंधित प्रावधानों को छोड़ने के लिए राजी करने में सफल रहे। सलाहकार समिति की अंतिम रिपोर्ट में निजता के अधिकार का कोई उल्लेख नहीं था। इसके पश्चात् सोमनाथ लाहिरी द्वारा 30 अप्रेल 1947 में पुन: निजता की संकल्पना को मौलिक अधिकारों में शामिल करने का प्रयास किया गया। उन्होंने उपखण्डों में संशोधन करने का अनुरोध किया और कहा पत्राचार की गोपनीयता अनुल्लंघनीय होगी और कानून द्वारा प्रदान किए गए मामलों में ही इसका उल्लंघन किया जा सकता है। जोकि प्रजा के स्वतंत्रता के अधिकार आदि का संदर्भ है।

**काजी सैयद करीमुद्दीन का प्रस्ताव**

एक साल बाद 3 दिसंबर 1948 को काजी सैयद करीमुद्दीन ने अपने प्रस्ताव में पेशकश किया कि– अनुच्छेद

14 में खंड (4) के रूप में निम्नलिखित जोड़ दिया जाए:-(4) अनुचित तलाशी और बरामदगी के खिलाफ अपने व्यक्तियों, घरों, कागजात और सामान में सुरक्षित रहने के लोगों के अधिकार का उल्लंघन नहीं किया जाएगा और कोई वारंट जारी नहीं किया जाएगा, लेकिन शपथ या प्रतिज्ञान द्वारा समर्थित संभावित कारणों पर और विशेष रूप से स्थान का वर्णन करने के लिए तलाशी ली जाए और व्यक्तियों या चीजों को जब्त किया जाए।[11]

काजी सैयद करीमुद्दीन ने यह भी बताया कि इसे अमेरिकी संविधान में अनुच्छेद 4 के रूप में स्थान मिला है और आयरिश संविधान में खंड (2) और (5) हैं जो समान हैं और जर्मन संविधान में इसी तर्ज पर अनुच्छेद 114 और 115 है। डॉ. अम्बेडकर की पुस्तक-अल्पसंख्यक और राज्य- के पृष्ठ 11 के मद संख्या 10 में भी इसी प्रकार का प्रावधान किया गया है।[12] अतः संविधान सभा में इन दोनों ही प्रस्तावों को स्वीकार नहीं किया गया। सामान्य शब्दों में संविधान सभा में निजता की संकल्पना से सम्बन्धित बहस अवश्य की गई परंतु एक मौलिक अधिकार के रूप में इसका समर्थन नहीं किया गया।

**निष्कर्ष**

भारतीय सर्वोच्च न्यायालय द्वारा निजता की संकल्पना को सशक्त बनाया गया और निजता के अधिकार को एक मौलिक अधिकार के रूप में स्वीकारा गया। न्यायमूर्ति के. एस. पुट्टास्वामी (सेवानिवृत्त) और अन्य बनाम भारत संघ और अन्य 2017, इस मामले में भारत की माननीय सर्वोच्च न्यायालय द्वारा निजता के अधिकार के संदर्भ में एक ऐतिहासिक निर्णय दिया गया था।[13] खंडपीठ द्वारा मामले में दिए गए फैसले ने नागरिकों के निजता के अधिकार को एक नया आयाम दिया। यह माना गया कि निजता का अधिकार भारतीय संविधानिक रूप से एक मौलिक अधिकार है।

इस मामले में सरकार की आधार योजना (एक समान बायोमेट्रिक्स-आधारित पहचान पत्र का एक रूप) को चुनौती दी गई थी, जिसे सरकार ने सरकारी सेवाओं और लाभों तक पहुंच के लिए अनिवार्य बनाने का प्रस्ताव किया था। सर्वोच्च न्यायालय की तीन-न्यायाधीशों की पीठ के समक्ष इस आधार पर चुनौती दी गई थी कि यह योजना निजता के अधिकार का उल्लंघन करती है। आधार (प्रमाणीकरण) विनियम, 2016, के अधिनियम की धारा 7 के तहत जारी सभी अधिसूचनाएँ, जो विभिन्न लाभों को प्राप्त करने के लिए आधार को अनिवार्य बनाती हैं, कानूनी चुनौतियों का विषय रही हैं।[14] यहाँ तक कि 2016 में अधिनियम के पारित होने के साथ आधार योजना को वैधानिक समर्थन प्राप्त होने के बाद। यह दावा किया गया कि आधार योजना और अधिनियम ने निजता के अधिकार का उल्लंघन किया, आधार योजना के खिलाफ की गई मुख्य आलोचनाओं में से एक थी।

न्यायालय ने मौलिक अधिकारों की प्रकृति, संवैधानिक व्याख्या और निजता के अधिकार के लिए सैद्धांतिक और दार्शनिक आधारों के साथ-साथ इस अधिकार की प्रकृति पर विस्तृत तर्कों पर विचार किया। आधार अधिनियम की संवैधानिकता की जांच कर रहे तीन-न्यायाधीशों के पैनल के सामने 2015 में पहली बार निजता एक मौलिक अधिकार है या नहीं, इस पर बहस हुई। उसके बाद, अटॉर्नी जनरल ने दावा किया कि भले ही निजता के अधिकार को सर्वोच्च न्यायालय में कई फैसलों में मान्यता दी, लेकिन संविधान के भाग तीन में इसकी मौलिक स्वतंत्रता की रक्षा नहीं की, क्योंकि एमपी शर्मा (8) में सुप्रीम कोर्ट की बड़ी बेंच -जज बेंच) और खड़क सिंह(6-न्यायाधीशों की पीठ) के मामलों ने इस बात से सहमत होने से इनकार कर दिया कि संविधान द्वारा निजता के अधिकार की गारंटी दी गई थी। नतीजतन, "संस्थागत अखंडता और न्यायिक अनुशासन" की गारंटी देने के लिए, इस पैनल ने मामले को पांच-न्यायाधीशों की पीठ के पास भेज दिया। पांच-न्यायाधीशों के पैनल ने तब संवैधानिक मुद्दे को नौ न्यायाधीशों की पीठ के पास भेजा, जो निजता के अधिकार के बारे में अंतिम निर्णय लेने के लिए और भी अधिक योग्य थे।

माननीय न्यायालय ने आधार अधिनियम को बरकरार रखा और अधिनियम के उन प्रावधान को रद्द कर दिया जो असंवैधानिक थे। न्यायालय द्वारा यह आयोजित किया गया था कि नागरिकों के निजता के अधिकार को अनुच्छेद 21 के तहत जीवन और व्यक्तिगत स्वतंत्रता के अधिकार के आंतरिक भाग के रूप में और संविधान के भाग तीन  द्वारा गारंटीकृत स्वतंत्रता के एक भाग के रूप में संरक्षित किया है।[15] सर्वोच्च न्यायालय ने खड़क सिंह बनाम यूपी राज्य और एमपी शर्मा बनाम सतीश चंद्र के पिछले ऐतिहासिक निर्णयों को स्पष्ट रूप से खारिज कर दिया, जिसमें यह कहा गया था कि निजता का अधिकार भारतीय संविधान के तहत नागरिकों का मौलिक अधिकार नहीं है। न्यायालय ने कहा कि संवैधानिक व्याख्या की प्रक्रिया गतिशील और हमेशा विकसित होती है। समाज की तरह संवैधानिक अवधारणाओं का विकास और विस्तार करना महत्वपूर्ण है। वर्तमान सामाजिक आर्थिक और राजनीतिक वातावरण को 'मूलवादी' अवधि को व्याख्या के ढांचे में इस्तेमाल किया जाना चाहिए। सविधान की परिकल्पना के मूल उद्देश्य के अनुसार संविधान को जैविक प्रकृति का माना गया है। संवैधानिक कानून की एक व्याख्यात्मक प्रक्रिया के माध्यम से इसकी शाखाओं और पत्तियों के आकार में अधिकारों की निरंतर वृद्धि" संविधान की जैविक प्रकृति का स्वरूप है, ताकि न्याय के संवैधानिक वृक्ष की जड़ें दृढ़ बनती रहे। निर्णय में सूचनात्मक गोपनीयता को निजता के अधिकार का एक हिस्सा माना। न्यायालय ने डेटा संरक्षण कानून की आवश्यकता पर ध्यान देते हुए इसे इस विषय पर कानून बनाने के लिए संसद के अधिकार क्षेत्र में सौप दिया।

**References:**


1. Warren, S. D., & Brandeis, L. D. (1890). The Right to Privacy. Harvard Law Review, 4(5), 193–220. https://doi.org/10.2307/1321160
2. Ccla. (2021, June 13). Summary: International Covenant On Civil And Political Rights (Iccpr) - CCLA. CCLA. https://ccla.org/privacy/surveillance-and-privacy/summary-international-covenant-on-civil-and-political-rights-iccpr/(last visit on 23/12/2024 at 4:56PM)
3. Harrington, D. (2024, November 13). U.S. Privacy Laws: The complete guide | Varonis. Varonis. https://www.varonis.com/blog/us-privacy-laws#:~:text=The%20federal%20government%20passed%20the,and%20disclosure%20of%20personal%20information (last visit 25/12/2024 at 10:56am)
4. European Convention on Human Rights - Article 8. (2022, March 8). European Union Agency for Fundamental Rights. https://fra.europa.eu/en/law-reference/european-convention-human-rights-article-8-0 (last visit on 27/12/2024 at 9:32am)
5. Constitution of India. (2023, April 15). Advisory Committee on Fundamental Rights, Minorities and Tribal and Excluded Areas - Constitution of India. https://www.constitutionofindia.net/committees/advisory-committee-on-fundamental-rights-minorities-and-tribal-and-excluded-areas-24-january-1947/#:~:text=On%2024%20January%201947%2C%20the,22%20members%20to%20the%20Committee.&text=The%20Committee%20convened%20on%20April,access%20to%20existing%20educational%20facilities. ( Last visit on 14/012025 at 2:39pm)
6. The Framing of India’s Constitution A study : B. Shiva Rao : Free download, borrow, and streaming : Internet Archive. (1968). Internet Archive. https://archive.org/details/in.ernet.dli.2015.275967/page/n266/mode/1up
7. The Framing of India’s Constitution A study : B. Shiva Rao : Free download, borrow, and streaming : Internet Archive. (1968). Internet Archive. https://archive.org/details/in.ernet.dli.2015.275967/page/n266/mode/1up
8. Nayak, V. (2017). Understanding the right to privacy (R2P). In Presented at the 7th Annual Convention of the Central Information Commission. https://cic.gov.in/sites/default/files/2012/R2Privacy-Venkatesh.pdf Ibid.
9. Constitution of India. (n.d.). States and Minorities (B.R. Ambedkar, 1947) Archives - Constitution of India/ SM23https://www.constitutionofindia.net/historical-constitution/states-and-minorities-dr-b-r-ambedkar-1947/
10. Constitution of India. (1948, December 3). 03 Dec 1948 Archives - Constitution of India. https://www.constitutionofindia.net/constitution_assembly_debates/volume/7/1948-12-03#7.66.11
11. States and minorities: What are Their Rights and how to secure Them in the Constitution of Free India. (2008) (p.11 [10]. Gautam Book Center.
12. Justice KS Puttaswamy vs Union of India - Drishti Judiciary. (n.d.). Drishti Judiciary. https://www.drishtijudiciary.com/constitution-of-india/justice-ks-puttaswamy-retd-v-union-of-india-2019-1-scc-1 India Code: Section details. (n.d.). https://www.indiacode.nic.in/show-
13. data?abv=CEN&statehandle=123456789/1362&actid=AC_CEN_37_85_00001_201618_1517807328460§ionId=3585§ionno=7&orderno=8&orgactid=AC_CEN_37_85_00001_201618_1517807328460#3585
14. Academike. (2025, January 31). Article 21 of the Constitution of India: Understanding Right to Life and Personal Liberty from Case Laws -. Academike. https://www.lawctopus.com/academike/article-21-of-the-constitution-of-india-right-to-life-and-personal-liberty/#:~:text=Article%2021%20of%20the%20Constitution%20of%20India%2C,to%20health%2C%20Right%20to%20pollution%2Dfree%20air%2C%20etc.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# दिव्यांगांची आत्मकथने

**ज्ञानेश्वर किसन म्हात्रे**
संशोधक, अरिहंत पॅलेस, पऱ्याची आळी,
मु. पो. ता. जि. रत्नागिरी
**Corresponding Author: ज्ञानेश्वर किसन म्हात्रे**
**DOI-10.5281/zenodo.15697061**

**सारांश :-**

दिव्यंगत्व हे जन्मजात किंवा जन्मानंतर वेगवेगळ्या कारणाने येते. दिव्यंगत्व आलेल्या व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य बदलून जाते. सर्वसामान्य माणसापेक्षा वेगळा असा त्याचा जीवनप्रवास सुरू होतो. दिव्यांग व्यक्ती हा समाजातील उपेक्षित घटक आहे. त्याचे अस्तित्व असूनही नसल्यासारखे आहे. दिव्यांगांचे सामाजिक, सांस्कृतिक योगदान फारसे नसल्याने दिव्यांग व्यक्ती समाजापासून वेगळा उपेक्षितांचे जिने जगताना दिसतो. दिव्यांग व्यक्तीला त्याच्या दिव्यांगत्वामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्याला शिक्षण घेता येत नाही. शिक्षण जरी मोठ्या मेहनतीने त्याने घेतले तरी तो व्यक्ती केवळ दिव्यांग असल्याने त्याला नोकरी मिळत नाही. नोकरी, व्यवसाय नसल्याने त्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची बनते. त्यामुळे स्वतःचे दिव्यंगत्व कमी करण्यासाठी वापरावी लागणारी साधने महाग असल्याने चांगल्या दर्जाची उपकरणे तो खरेदी करू शकत नाही. शासकीय किंवा सामाजिक संस्थांच्या माध्यमातून पुरविल्या जाणाऱ्या सामान्य दर्जाची उपकरणे अवयव इ. त्याला नाईलाजास्त वापरावे लागतात. त्यामुळे दिव्यांगांच्या समस्या संपत नाही. त्या दिवसेंदिवस वाढतच जातात. कित्येक दिव्यांगाना अंथरुणातून उठताही येत नाही. त्यांना शिक्षण घेता येत नाही. त्यामुळे स्वतःचा विकासही करता येत नाही. विविध सामाजिक संघटनांच्यावतीने दिव्यांगांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना त्यांच्या दिव्यांगत्वानुसार कोणत्या प्रकारची गरज आहे. हे ओळखून आवश्यक साधनसामग्री पुरविल्यास दिव्यांग व्यक्ती ही स्वतःचा विकास करू साधू शकेल. असंच काही दिव्यांगांनी स्वतःचा विकास साधून इतर दिव्यांगाना मार्गदर्शन व्हावे. आपले जगणे समाजाला कळावे. समाजाने दिव्यांगांच्या व्यथा आणि वेदना कमी नाही केल्या तरी चालतील परंतु त्यांना त्या काळाव्यात या उद्देशाने दिव्यांगानी मराठी साहित्यात आत्मकथन हा साहित्यप्रकार व्यक्त होण्यासाठी वापरला. आत्मकथनांच्या माध्यमातून दिव्यांगानी आपल्या व्यथा आणि वेदना समाजासमोर ठेवल्या. त्याचा अभ्यास या शोध निबंधातून करणार आहे.

**बीज शब्द :-** दिव्यांगांची आत्मकथने.

**उद्दिष्टेये :-**

१. आत्मकथनांचा अभ्यास करणे

२. दिव्यांगांच्या आत्मकथनांचा अभ्यास करणे

**प्रस्तावना :-**

१९६० नंतर मराठी साहित्यात क्रांती घडून आली. विविध सामाजिक घटकांनी आपल्या जाणीवा मराठी साहित्यातून मांडायला सुरुवात केली. त्यात प्रथम पुढाकार घेतला तो म्हणजे दलित साहित्यिकानी. दलित साहित्याने मराठी साहित्याचे मापदंड झुगारून वेगळी वाट निवडली. त्यातून दलितांच्या संवेदना मराठी साहित्याच्या वेगवेगळ्या साहित्य प्रवाहातून उमटू लागल्या. दलित साहित्याला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाल्याने स्त्रीवादी साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य, आदिवासी साहित्य, वंचितांचे साहित्य निर्माण झाले. त्याचाच एक भाग म्हणून दिव्यांगांनीही आपल्या व्यथा आणि वेदना साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. दिव्यांगांचे साहित्य वेगवेगळ्या साहित्य प्रवाहातून निर्माण झाले. समाजातल्या उपेक्षित घटकांनी आत्मकथन हा साहित्य प्रकार आपलासा केला. हा साहित्य प्रकार मराठी साहित्याला काहीसा नवीन असला तरी अशिक्षित, अल्पशिक्षित, दुर्लक्षित घटकांनी तो जवळचा वाटला. आपले दुःख, व्यथा वेदना मांडण्यासाठी जवळचा साधा व सोपा वाटला. आत्मकथनातून स्वतःचा जीवनप्रवास मांडावयाचा असल्याने त्यासाठी आत्मकथनकाराला साहित्यिकच असला पाहिजे असा काही नाही. आत्मकथनकाराने जे आयुष्यभर भोगले ते त्याने त्याच्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न आत्मकथनांच्या माध्यमातून मराठी साहित्यात केलेला पहावयास मिळतो. त्यामुळे मराठी साहित्यात आत्मकथनांचे अमाप पीक आले. त्याचा फायदा असा झाला की मराठी साहित्यात दर्जेदार विषय, वेगवेगळ्या संकल्पना, प्रथा, परंपरा, ग्रामीण संवेदना, उपेक्षितांचे जिने, त्यांचे प्रश्न, वास्तव जीवन, सर्वसामान्य वाचकांसाठी नवीन होते. त्यामुळे आत्मकथन साहित्यातला उदंड प्रतिसाद लाभला. आत्मकथन या साहित्य प्रकाराला मिळालेली प्रसिद्धी पाहता उपेक्षित घटकांनी आपल्या वेदना मांडायला सुरुवात केली. त्यातून दिव्यांगांनीही आपले उपेक्षिताचे जिने आत्मकथनांच्या माध्यमातून मांडायला सुरुवात केली. त्यातून दिव्यांग आत्मकथनांची भर मराठी साहित्यात पडलेली दिसून येते.

**दलित व दिव्यांग आत्मकथने :-**

दलितांच्या वाट्याला आलेले सामाजिक दुःख, वेदना, उपेक्षितता दिव्यांगांच्याही वाट्याला थोड्याफार प्रमाणात आलेली दिसून येते. दलितांना ज्याप्रमाणे समाजाने वाळीत टाकले. गाव कुसाबाहेर आपले आयुष्य घालवायला भाग पाडले. त्याचप्रमाणे दिव्यांगांनाही दिव्यांगत्वामुळे समाजाने काहीसे वाळीत टाकल्यासारखीच वागणूक दिली. त्यांचे आयुष्य घरापुरतेच मर्यादित राहिले. दलितांना सामाजाने बहिष्कृत केले. त्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले. तर दिव्यांगाना त्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या दिव्यांगत्वामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागले. गावामध्ये दोन-चार व्यक्ती दिव्यांग असल्याने त्यातही त्यांचे दिव्यांगत्वाचा प्रकार वेगवेगळे असल्याने उदा. अस्थिव्यंग, कर्णबधिर, मुकबधिर, अंध, मतिमंद इ. प्रकारामुळे या दिव्यांगाना कसे व कोणते शिक्षण द्यावे. हा प्रश्न समाजासमोर होता. त्यामुळे दोन-चार वेगवेगळ्या प्रकारच्या दिव्यांग व्यक्तीला दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार शासनाला शिक्षण देणे सोईचे नव्हते. त्यामुळे सुरवातीच्या काळात दिव्यांगांच्या शिक्षणाकडे पुरेसे लक्ष शासनाने दिलेले दिसून येत नाही. त्यामुळे बहुसंख्या दिव्यांगाना त्यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार शिक्षण मिळाले नाही. त्यामुळे ते सामाजिक प्रवाहपासून दूर झाले.

**दिव्यांगांची आत्मकथाने :-**

दलितांनी आपल्या सामाजिक जाणीवा आत्मकथनातून मांडून समाजाला आरसा दाखवण्याचे काम केले. यातूनच प्रेरणा घेऊन दिव्यांगांनीही आपल्या व्यथा आणि वेदना आत्मकथनातून माडल्या. समाजातला एक अपेक्षित घटक दिव्यांग त्यानेही आपल्या आत्मकथनांच्या माध्यमातून समाजाचे लक्ष वेधण्याचे काम केलेले दिसून येते. इंग्रजी भाषेतील दिव्यांगांची आत्मकथने जगाच्या विविध देशात प्रसिद्ध झालेली आहेत. त्यातील काही दिव्यांगांची आत्मकथने मराठी साहित्यात अनुवादित झाली आहेत. ती सहजासहजी उपलब्ध आहेत. परंतु आपल्या महाराष्ट्रातील मराठी भाषेतील महाराष्ट्रातील व्यक्तींची आत्मकथने कित्येक लोकांना माहीतही नाहीत. दिव्यांगांनी आपल्या आत्मकथनांमधून आपले शारीरिक कष्टदायी जीवन मांडले आहे. त्याचबरोबर त्यांची मानसिक आंदोलने चित्रित झाली आहेत. आपल्या 'व्यथा आणि वेदना' मांडता मांडता समाजातील इतर दिव्यांगांच्या व्यथा आणि वेदनाही त्यांनी आपल्या आत्मकथनांमधून मांडल्या आहेत. त्यामुळे दिव्यांगांची आत्मकथने एकट्या व्यक्तीची न राहता ती समूहाची स्पंदने टिपणारी आत्मकथने बनली आहेत.

दिव्यांगांना न्यायहक्कासाठी शासनाबरोबर झगडावे लागले. त्यासाठी दिव्यांगांनी दिव्यांगांच्या उद्धारासाठी स्थापन केलेल्या संस्थांच्या माध्यमातून चळवळी उभ्या कराव्या लागल्या. मोर्चे, आंदोलने, उपोषणे करावी लागली. त्यांचे प्रतिबिंब दिव्यांगांच्या आत्मकथनात उमटले आहे. इ. स. २००० नंतर दिव्यांगांच्या आत्मकथनांची जोमाने निर्मिती होऊ लागलेली दिसून येते. या आत्मकथनातून दिव्यांगांमध्ये आलेले आत्मभान, दिव्यांगांच्या समस्या त्यावर केलेली मात, शस्त्रक्रियेमुळे कमी झालेले व्यंग, कृत्रिम साधनांचा वापर त्यामुळे चालण्यात, फिरण्यात, बोलण्यात, ऐकण्यात थोड्याफार प्रमाणात झालेली मदत याचा आढावा दिव्यांग आत्मकथनातून घेतला आहे.

इ. स. १९८१ हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने 'जागतिक दिव्यांग वर्ष' म्हणून जाहीर केले. याचा परिणाम संपूर्ण जगातील दिव्यांगांवर झाला. भारतातही दिव्यांगांच्या विविध समस्यांसाठी विचार मंथन होऊ लागले. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर चर्चासत्रे, कार्यक्रम, कार्यशाळा, संमेलने इत्यादी माध्यमातून दिव्यांगांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम जोमाने सुरू झाले.

दिव्यांग आत्मकथनांची सुरुवात १९८७ पासून झालेली दिसून येते. अंध उद्योजक सुरेंद्रनाथ कांबळे यांनी 'बदलती क्षितिजे' ३० एप्रिल १९८७ मध्ये प्रकाशित केले. या आत्मकथनातून एक अंध उद्योजक छोट्या-मोठ्या एकवीस कंपन्या स्थापन करून गरिबीतून श्रीमंतीकडे केलेले वाटचाल त्यांनी आपल्या आत्मकथनातून मांडली आहे. सुरेंद्रनाथ कांबळी यांचे 'बदलती क्षितिजे' या आत्मकथनाचे दोन भाग प्रसिद्ध झाले आहेत. यानंतर दिव्यांगांच्या आत्मकथनाची खऱ्या अर्थाने सुरुवात बाळ राणे यांच्या 'अमुचा पेला दुःखाचा' (१५ ऑगस्ट १९८७) या आत्मकथनाने झालेली दिसून येते. या आत्मकथनात एका पंचवीस वर्षाच्या तरुणाला नुकतेच लग्न झालेले असताना जेमतेम दोन महिन्यातच कमरेखाली दिव्यांगत्त्व येते व दोन्ही पाय लुळे पडतात. तेथून या तरुणाची करुण कहाणी सुरू होते. ही कहानी बाळ राणे यांनी वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, साहित्यिक अशा विविध अंगाने मांडली आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने हे आत्मकथन सर्वार्थाने दिव्यांगांचे प्रश्न, दिव्यांगांच्या समस्या, दिव्यांगांची मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक परिस्थिती मांडताना दिसून येते. यानंतर दिव्यांग आत्मकथनांची परंपरा सुरू झालेली दिसून येते. यामध्ये अनंत ढोले या अठरा वर्षाच्या तरुणाचे 'शून्यातून अनंत' या आत्मकथनातून जन्मापासून अठरा वर्षापर्यंतचा प्रवास चित्रित केला आहे. त्यामुळे सगळयात कमी वयात लिहिले गेलेले आत्मकथन म्हणून अनंत ढोले यांच्या आत्मकथनाचा उल्लेख करावा लागतो.

रायगडमधल्या खेड्यातल्या दिव्यांग मुलाच्या समस्या, ग्रामीण मार्गात येणाऱ्या अडचणी, शिक्षणासाठी

करावी लागलेली धडपड, दिव्यांगंत्त्वांमुळे घरातून व समाजातून होणारी अवहेलना रामदास म्हात्रे यांनी आपल्या 'थोट्या' या आत्मकथनातून प्रभावीपणे चित्रित केली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील दिव्यांगांचे प्रश्न समस्या या आत्मकथनातून ठळकपणे मांडण्यात आल्या आहेत. ज्याप्रमाणे ग्रामीण भागातील प्रश्न दिव्यांग आत्मकथनातून मांडले गेले आहेत, त्याचप्रमाणे शहरातील दिव्यांगांच्या समस्या शरद अवचट यांनी 'पावलापुढचं आभाळ' या आपल्या दिव्यांग आत्मकथनातून मांडल्या आहेत. एक स्त्री असूनही स्वतःला आलेल्या दिव्यांगंत्त्वांतून बोध घेऊन इतर दिव्यांगांचे आयुष्य सुखकर करू पाहणाऱ्या नसीमा हुरजूक यांच्या 'चाकाची खुर्ची' या आत्मकथनातून अस्थिव्यंग विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची निर्मिती करून ग्रामीण भागातल्या पराकोटीचे दिव्यांगंत्त्व आल्यामुळे शिक्षणापासून वंचित असलेल्या दिव्यांगांसाठी कोल्हापूरसारख्या शहरात वसतिगृहाची, शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर दिव्यांगांच्या आर्थिक उन्नतीसाठी लघु उद्योग केंद्र, गॅस एजन्सी, काजू प्रकल्प, पतसंस्थेची निर्मिती करून दिव्यांगांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली. एक स्त्री असूनही दिव्यांग क्षेत्रात मोलाची कामगिरी करणाऱ्या कर्तुत्त्ववान स्त्रियांमध्ये नसीमा हुरजूक यांचा आवर्जून उल्लेख होतो.

सुखी समाधानी जीवन जगत असताना अचानक सुभाष प्रभू यांना एकावन्नाव्या वर्षी दिव्यांगंत्त्व येऊन संपूर्ण आयुष्य उध्वस्त झाले. त्यांनी 'जगण पूर्णांगवायूंच' या आपल्या दिव्यांग आत्मकथनातून मानेच्या खाली संपूर्ण शरीर लुळे पडलेल्या दिव्यांगांची समस्या मांडली आहे. त्यांचे हातसुद्धा उचलता येऊन न शकल्यामुळे सर्वस्वी मदतनिसावर अवलंबून राहवे लागण्याची पाळी केवळ दिव्यांगंत्त्वांमुळे त्यांच्यावर आली. त्या पुढील दहा वर्ष त्यांनी शारीरिक वेदना, असाहाय्यता, लाचारी, आर्थिक विवंचना यात घालविले. हे आपले दाहक अनुभव त्यांनी आपल्या आत्मकथनातून मांडले आहे. 'पंख गळून गेले तरी!' या आत्मकथनातून विद्यावाचस्पती पदवीपर्यंत शिक्षण घेऊनही केवळ दिव्यांगंत्त्वांमुळे प्राध्यापक पदाची आवडती नोकरी ते करून शकत नसल्याची खंत त्यांनी आपल्या आत्मकथनातून मांडली आहे. नाईलाजास्तव टेलिफोन ऑपरेटर या पदावर समाधान मानाव लागले. त्यामुळे आर्थिक परिस्थिती हालाखीची राहिल्याची खंत ते आपल्या आत्मकथनातून व्यक्त करतात. डॉ. सुधीर देवरे यांची दोन आत्मकथने प्रकाशित झाली असून पहिले 'पंख गळून गेले तरी!' याच आत्मकथनाचा पुढचा भाग 'सहज उडत राहिलो' या आत्मकथनात सविस्तरपणे आपले दिव्यांगंत्त्वांचे अनुभव मांडले आहेत. एका ग्रामीण भागात जन्मलेल्या दिव्यांगांला अनेक अडचणींना, समस्यांना सामोरे जावे लागते. या अडचणी, समस्या त्यांनी आपल्या आत्मकथनातून मांडल्या आहेत. त्र्यंबक मोकासरे यांची लहानपणीच दृष्टी गेल्यामुळे त्यांचे पुढील आयुष्य कष्टदायी बनले. शिक्षणासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. शेवटी अंधशाळेत शिक्षण घेऊन बी.एड्पर्यंत शिक्षण घेऊन नागपूर येथे अंधशाळेत कला शिक्षक म्हणून आपले कार्य बजावत आहेत.

शरीरात कॅल्शियमच्या कमतरतेमुळे घरात जरा जरी पडले तरी, हात किंवा पाय मोडायचा. मोडलेली हाडे वर्ष-वर्ष, दोन-दोन वर्षे जोडायची नाहीत. त्यातून कालांतराने हात आणि पाय दोन्ही वाकडे झाले. आणि संपूर्ण आयुष्य अंथरुणाला खिळलेल्या सुरेश चाळके यांनी 'अंधारयुगाचा प्रकाशयात्री' या आत्मकथनातून आपले वेदनादायी आयुष्य मांडले आहे. अंथरुणातून उठताही येत नसल्यामुळे कायम घरातल्यांच्या आधाराने आयुष्य व्यतीत करावे लागते. त्यातही आई वडिलांचा सहारा गमावल्यानंतर त्यांची सेवा त्यांच्या वहिनीने केली. तीही गेल्याने आयुष्य कष्टदायी बनल्याचे अनुभव त्यांनी आपल्या आत्मकथनातून मांडले आहे. जन्मानंतर काही वर्षातच अंधत्त्व आल्यामुळे अंध शाळेमध्ये राहून प्रा. पुरुषोत्तम महाजन यांनी शिक्षण पूर्ण केले. वर्गात कायम प्रथम क्रमांक येणारा हुशार विद्यार्थी म्हणून चौथीनंतर मुंबईसारख्या महानगरात पुढील शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. मुंबईतील अंधशाळेत प्रवेश मिळवला. व पुढील संपूर्ण शिक्षण वसतिगृहात राहून पूर्ण केले. उत्तम वक्तृत्त्व, वर्गात हुशार अंध शाळेबरोबरच सर्वसामान्य मुलांमध्येही शाळेत प्रथम क्रमांक येत असल्यामुळे प्राध्यापक बनण्याची स्वप्ने उराशी बाळगून मुंबई विद्यापीठातून सर्वोच्च पदवी एम.ए.पर्यंत व त्यानंतर पीएच.डी.पर्यंत शिक्षण घेण्याचा प्रयत्न करून प्राध्यापक बनण्याची स्वप्न बाळगत असताना वरिष्ठ महाविद्यालयाची पात्रता असतानाही केवळ अंध असल्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयात नोकरी पत्करावी लागली. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक बनल्यामुळे प्राचार्य व इतर शिक्षक यांच्या नजरेत त्यांची प्रसिद्धी भरू लागल्याने त्यांच्याविरुद्ध कटकारस्थाने सुरू झाली. नोकरीवरून काढण्यापर्यंतचे डावपेच सहन करावे लागले. त्याविरुद्ध लढा देत देत आपले अस्तित्व प्रा. पुरुषोत्तम महाजन यांनी सिद्ध केले. 'माझ्या आयुष्याचे महाभारत' या आत्मकथनातून त्यांनी एका अंध प्राध्यापकांला सहन कराव्या लागलेल्या संघर्षाची कहानी चित्रित केली आहे.

दिव्यांग आत्मकथनांतील दिव्यांगांचे अनुभवविश्व मांडत असताना यामध्ये अंध, अस्थिव्यंग, प्यारॉप्लीजिक

म्हणजेच कायम व्हीलचेअरला खिळलेले दिव्यांग व काही कायम अंथरुणाला खिळलेले दिव्यांग अशा विविध प्रकारच्या दिव्यांगांनी आपले दाहक अनुभव आपल्या आत्मकथनातून मांडले आहेत. सर्वसामान्य वाचकांना व अभ्यासकांना हे अनुभव वेगळा अनुभव देऊन जाणारे आहेत.

**निष्कर्ष :-**

१. दिव्यांग आत्मकथनांची प्रेरणा करमणूक करणे ही नाही. नियतीने लादलेले शारीरिक व्यंग त्यामुळे भोगाव्या लागत असलेल्या यातना या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा हेतू दिसून येतो. यातून समाजापर्यंत दिव्यांगांचे प्रश्न व समस्या मांडणे हा आहे. दिव्यांगांचे दुःख, वेदना दिव्यांगांनाच भोगाव्या लागणार आहेत. त्यामुळे समाजाकडून सहानुभूतीची नाही तर, समानतेची वागणूक मिळावी अशी अपेक्षा दिव्यांग आत्मकथनकार आपल्या आत्मकथनातून व्यक्त करतात. अंतकरण पिळवटून टाकणारी जीवनजाणीव दिव्यांग आत्मकथनातून चित्रित झाली आहे.

२. सर्वच दिव्यांग आत्मकथनकारांची लेखनाची लेखनशैली सारखी नाही. काही दिव्यांग आत्मकथनकारांनी कथनात्मक लेखनशैलीचा अवलंब केला आहे. तर काहीनी कादंबरी स्वरूपाच्या लेखनशैलीचा अवलंब केला आहे. त्यामुळे त्यांची आत्मकथने लालित्यपूर्ण झाली आहेत. दिव्यांग आत्मकथनकारांनी वेगवेगळ्या लेखनशैलीचा अवलंब केल्याने त्यांच्या लेखन स्वरूपात वैविध्य आलेले पाहवयास मिळते.

३. दिव्यांग आत्मकथनकार हे साहित्यिक किंवा साहित्यांचे अभ्यासकही नाहीत. त्यामुळे 'जसे घडले तसे' मांडण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या आत्मकथनातून केलेला दिसून येतो. त्यामुळे दिव्यांगांच्या आत्मकथनांमधुन प्रांजळपणाचे आणि प्रामाणिकपणाचे दर्शन घडून येते. या आत्मकथनांतून येणाऱ्या ग्रामीण बोलीभाषेमुळे आत्मकथनांचे सौंदर्यरुपही फुलले आहे. दिव्यांग आत्मकथनातून दिव्यांगांच्या शारीरिक व्यंगामुळे त्यांना सहन कराव्या लागलेल्या 'व्यथा आणि वेदना' प्रामुख्याने मांडलेल्या असल्याने त्यांच्या आत्मकथनातून आत्मप्रौढी आलेली दिसून येत नाही.

४. दिव्यांग आत्मकथनकारांचा अभ्यास करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे पुरुष दिव्यांगांची आत्मकथने आपल्याला पाहयला मिळतात. परंतु स्त्री दिव्यांग आत्मकथनकारांची आत्मकथने खूपच कमी आहेत. आतापर्यंत 'चाकाची खुर्ची' हे नसीमा हुरजूक व 'मर्मबंधातली ठेव' हे सुचेता आठल्ये यांची ही दोनच दिव्यांग स्त्री आत्मकथने प्रकाशित झाली आहेत. त्यामुळे स्त्री दिव्यांग आत्मकथनकारांचा अभ्यास करणे जिकरीचे जाते. मोठ्या प्रमाणावर दिव्यांग स्त्री आत्मकथने प्रकाशित झाल्यास स्त्री दिव्यांगांच्या समस्या जाणून घेणे शक्य होईल. परंतु पुरुष दिव्यांग आत्मकथनकारांपेक्षा स्त्री दिव्यांग आत्मकथनकारांची आत्मकथने नगण्य असल्यामुळे स्त्री दिव्यांग आत्मकथनकारांचा अभ्यास व्यापक स्वरूपात होऊ शकलेला नाही.

**संदर्भग्रंथ**

१. नलगे चंद्रकुमार, पानतावणे गंगाधर, दलित आत्मकथन, सुरेश एजन्सी, पुणे, २६ जाने. १९८६.
२. मनोहर यशवंत, दलित स्वकथने, ऋतुगंध, दिवाळी अंक, १९८७.
३. कऱ्हाडे सदा, दलित आत्मकथनांच्या निमित्ताने, अस्मितादर्शन, दिवाळी अंक, १९८३.
४. फडके भालचंद्र, दलितांची आत्मकथने काही प्रश्न, अस्मितादर्शन, दिवाळी अंक, १९८३.
५. कुसर्रे-कुलकर्णी आरती, दलित स्वकथने साहित्यरूप, विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९६१.
६. तिडके श्रीकांत, दलित स्त्रियांची आत्मकथने की स्वंदने, दै. तरूण भारत, १५ नोव्हे. १९९४.
७. जोशी अ. म., चरित्र आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास, स्नेहवर्धन पब्लिसिंग हाऊस पुणे, दु. आ. १९६४.
८. पाटील अशोक, दलितांचे स्वकथन, अनुष्टुभ, जुलै ऑगस्ट १९८१.
९. डॉ. गंधारे द. के. मराठी वाङमय प्रकार, स्वरूप, संकल्पना व वाटचाल, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जाने. २०१७.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# संत नामदेव आणि महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय

**प्रा.डॉ.सरकटे सदाशिव हरिभाऊ**
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी
ता.गेवराई जि.बीड
**Corresponding Author: प्रा.डॉ.सरकटे सदाशिव हरिभाऊ**
**Email**-shsarkate@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15844846**

**सारांश :**

माणूस जन्माल आला. जगला. आणि मृत्यु पावला. ही त्याची विविध कार्य आपल्या जीवनात करीत राहणे हे जीवन आहे. हे सत्कार्य करण्यासाठी तुम्हाला परमेश्वराचा आधार लागतो. गुरुकृपा लागते. एकरूपता तुमच्या सत्कार्याला उजाळा देतात. ही सर्व शक्ती मिळते फक्त नाम स्मरणातून म्हणून जेव्हा तुम्ही तुमची तयारी शिवासी म्हणजे परमार्थ जोडावी लागते. तेव्हाच तुम्ही कोणत्याही कार्यात यशस्वी व्हाल असें नामदेव म्हणतात. नामदेवाच्या एकूण 26 वर्षाच्या महाराष्ट्रातील काळातील 20 वर्षाहून अधिक काळ पंजाबमध्ये राहिले. त्या वास्तव्यात त्यांनी वारकरी संप्रदाय आणि भक्ति. संप्रदायाचा प्रचार प्रसार केला. उत्तर भारतात या काळात अस्मानी सत्ता निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांना विरोध करण्याचा अनेक कारणे होती. मुसलमान धर्मा व्यतिरिक्त कार्यक्रम करणार्यांना छळ करीत होते. संत नामदेव हिंदू धर्मातील भागवतधर्माचा प्रचार करतात हे त्यांच्या लक्षात आले. मोहम्मद तुघलकाच्या सैन्य आणि नामदेवाचा छळ केला. त्यांना मुस्लिम धर्मरामची सक्ती केली. प्रसंगी त्यांना तुरुंगात डांबले. तिथे त्याच्यावर चाल केली. नामदेवाना कसलीच अपेक्षा नव्हती. तुरुंगात काय किंवा बाहेर काय? कुठेही नामस्मरण आणि निर्गुण भक्तीचा अडसर येण्याचे कारणच नव्हते. अखेर कंटाळून मोगल सैन्याने त्यांना मुक्त केले. नामदेव हे निरूपद्रवी आहे. हे सुलतानाच्या लक्षात आले. त्याना धर्मांतरासाठी सांगितले गेले पण ते बंद केले. प्रसंगी त्यांचा छळ केला. परंतु नामदेवाच्या शक्तीची प्रचिती झाल्यावर मात्र सर्व सुलतान नरमले. नामदेवांच्या. नामजपाच्या शक्तीचा अंदाज घेऊन त्यांना दिल्लीच्या. सुल्तानाची परवानगी दिली. हा जाती धर्माच्याही पलीकडे जाऊन जनकल्याणाचे कार्य करतो. तसेच मुस्लिम धर्माबद्दल काहीच वाईट सांगत नाही. म्हणून त्यांना मुक्त करण्यात आले. परमेश्वर हेच एकमेव सत्य आहे.

**प्रस्तावना:**

धर्म हा सांसर्गिक संदर्भात उपासनेचा सद्गुण म्हणून समजला जातो. महाराष्ट्रात अनेक संप्रदाय उदयास आले. बाराव्या शतकात महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा उदय झाला. या संप्रदायाचे प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील संतांनी केलेला आहे. भारतीय जनजीवनात परंपरा ही एक अत्यंत महत्त्वाची शक्ती आहे. ती जुन्या आचार विचारांना नव्या स्वरूपात साकार करते. महाराष्ट्रात उगम पावलेला "वारकरी संप्रदाय' हे याचे उत्तम उदाहरण आहे. वेद कालातील विष्णू देवतेचे पुढे भजनपूजन पुराणकाळात टिकून राहिले. पुढे गुप्त काळात त्यातून भागवत धर्म' अस्तित्वात आला. गुप्त काळात वैष्णव संप्रदायाची मुहूर्तमढ झाली. महाराष्ट्रात यादवकाळात परंपराप्राप्त भागवत धर्म आणि वैष्णव संप्रदायाचे 'वारकरी संप्रदाया'त रूपांतर झाले. त्याच्या प्रभावाची परंपरा अबाधित राहून तो आजही टिकून आहे. पंढरपूर येथील विठ्ठलाची उपासना करणाऱ्या संप्रदायाला "वारकरी संप्रदाय' असे म्हटले जाते. आषाढी, कार्तिकी, आणि चैत्र शुद्ध एकादशीला गळयात तुळशीमाला घालून नियमाने पंढरपूरला जाणाऱ्याला "वारकरी" असे म्हणतात. हा संप्रदाय 'बैष्णव धर्म', 'वैष्णव संप्रदाय', "भागवत धर्म', भागवत संप्रदाय', 'माळकरी पंथ' अशा विविध नावांनी ओळखला जातो. भक्त पुंडलिकापासून हा संप्रदाय सुरू झाला. त्याचा कालखंड अद्यापही एकमताने निश्चित झाला नसला तरी तो ज्ञानेश्वरांआधी किमान ५० वर्षे होऊन गेला असे मानले जाते. वारकरी पंढरपूरचे आराध्य दैवत विठ्ठलाला कृष्णाचे रूप मानतात

संत नामदेव प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाच्या निकटवर्ती असलेला सखा होता, असे मानले जाते. संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक असून भारतभर त्यांनी त्या बाबतीत भावनिक एकात्मता साधली. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत घेऊन जाण्याचे कार्य त्यांनी स्वकर्तृत्वाने केले.

**"घालीन लोटांगण वंदीन चरण, डोळ्याने पाहिन रूप तुझे |**
**प्रेमे अलिंगन, आनंदे पूजीन. भावें ओवाळीन म्हणे नामा" ||**

हा नामदेवांचा अभंग म्हटल्याशिवाय. महाराष्ट्रातील एकही देवकार्य पुरे होत नाही. वारकरी संप्रदायात संत नामदेवांचे महत्त्वाचे स्थान आहेत. संत नामदेव आणि नामदेवाचे पूर्वजही वारकरी होते.

सर्वसामान्य शेतकरी, कामकरी लोकांना भक्तिमार्ग दाखवणारा महान संता मध्ये संत नामदेव योगदान महत्त्वाचे आहे. संत नामदेव महाराज यांचे जन्म नरसी बामणी येथे 26 आक्टोबर 1270 मध्ये झाले. संजीवन समाधी पंढरपूर येथे 3 जुलै 1350 ला घेतली होती. संत नामदेव दामाजी रेळेकर असे त्यांचे पूर्ण नाव होते. नर्सी नामदेव या नामदेवाच्या घराण्याचे मूळ गाव होते. व्यापार करण्यासाठी दामाजी व गोणाई पंढरपुरात गेले. त्यांचा पिढीजात व्यवसाय हा शिंपी काम करण्याचा होता. वयाच्या पाचव्या वर्षी नामदेवांचे नाव शाळेत घातले. अभ्यासकडे आणि घराकडे त्यांचे अजिबात लक्ष नव्हते. त्यांचे भजन पूजन कडे लक्ष होते. एक दिवस दामाजी शेठ कापड विक्रीसाठी परगावी गेले. दररोज नित्य नियमाप्रमाणे श्री विठ्ठलाचे नैवेद्य अर्पण करून नंतर भोजन करावे. अशी दामाजी शेठची दिनचर्या होती. त्यामुळे संत नामदेवांनी देवाला नैवेद्य अर्पण करण्यासाठी विठ्ठल मंदिरात गेले. बालक नामदेवाला वाटले, देव काही भोजन करीत नाही. नामदेवाच्या मनात शंका आली. कदाचित आपल्या उशीर झाला म्हणून देव जेवत नसेल. आपले वडील जेव्हा नैवेद्य दाखवतात तेव्हा ते जेवत असतील. मग मी आल्यावर का जेवत नाही. अखेर नामदेवांनी विनवणी केली. विठ्ठलदेव प्रकट झाले. म्हणजे संत नामदेव सगुणभक्तीचे उपासक होते. संत नामदेव आठ वर्षांचा झाल्यावर गोविंद शेठ सदावर्ते यांच्यी कन्या राजाई सोबत लग्न झाले. औंढा नागनाथ येथे शिवमंदिरात संत विसोबा खेचर यांना गुरू केले. ते पुन्हा पंढरपुरात आल्यावर त्याला पांडुरंग सगुण रूपात साकार झाला. एकदा संत निवृत्तीनाथ, संत नामदेव, संत सोपान, संत मुक्ताई, संत गोरा कुंभार पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला आले असता, जवळ बसलेल्या संत नामदेवास मुक्ताबाईने त्यांना म्हणाली, माझ्या वडील भावाने नमस्कार केला असला तरी तुझ्यातील अहंकार जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत वयाने मोठे असले तरी मी नमस्कार करणार नाही. पुढे एकदा सर्व संत मंडळी एकत्र आली. नर्सीचे संत नामदेव, ढोकीचे गोरा कुंभार, बार्शीचे विसोबा खेचर, मंगळवेढ्याचे चोखामेळा, अराभेंडीचे सावतामाळी असे सगळे संत एकत्र आले. त्यात मुक्ताई आपल्या भावासोबत होती. त्यावेळी संत नामदेवाची परीक्षा घेण्यात आली होती. आणि संत नामदेवाला गुरू करून घेण्यासाठी सल्ला दिला गेला. संत नामदेवानी विसोबा खेचर यांना गुरू केले होते. विसोबाच्या आध्यात्मिक ज्ञानाची आणि पंढरीच्या विठ्ठल कसा निर्गुण रूपात आहे. यांची प्रचिती दिली. आता गुरुकृपा झाल्यामुळे निर्गुण भक्तीचा मार्ग सापडल्यामुळे ते परिपूर्ण अस संत झाले. संत चमत्कार करीत नाहीत किंवा केले नाहीत. संत नामदेवाच्या काळात महाराष्ट्रावर अनेक आक्रमणे झाली. महाराष्ट्र अक्षरशः उद्ध्वस्त झाला होता. अशा वेळी समाजाची भावनिक एकात्मता जपण्याचे कार्य संत नामदेवांनी केले. **महाराष्ट्रात राजा रामदेवराय यादवांची सत्ता उधळून लावली.**

अल्लाउद्दिन खिलजी आणि. रामचंद्रदेवराय याचा सत्तेला पराभूत करून त्या ठिकाणी आपली सत्ता स्थापना केली. ते तर हिंदू समाजाचे हाल करणार होते. धर्मावर गडांतर आले. दक्षिणेकडील संपत्तीची लूट करून आपल्या तिजोऱ्या भरण्याचे काम अल्लाउद्दीन सुलतान करत होते.. त्यावेळी लोकांमध्ये धर्माविषयी आणि सत्ता विशेषयी आत्मविश्वास वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण करणे आवश्यक होती. आशा परिस्थितीत भागवत धर्माजी पताका हाती घेऊन त्या ध्वजाखाली. लोकांना एकत्र करून संगठीत भक्तीची शक्ती निर्माण करणे हे सुद्धा आवश्यक होते. नामदेवाने भेदभावाचा विचार सोडून समतेचे विचार आणि धर्माचे पालन व नाम कीर्तनाचे प्रचार करीत होते. भागवत धर्माचा विचार रुजवण्यासाठी त्याने सर्वतोपरी प्रयत्न केले आणि त्यात 13 व्या शतकात समाज अज्ञानी दरिद्री आणि उपेक्षितां होता. समाजाला दिशा दाखवेल असा कोणी राजा अथवा नेता नव्हता. अशा वेळी नामदेव आणि समकालीन संतांनी या लोकांना मार्ग दाखवला. नीतीने वागणे मनात भक्तिभाव, धर्माचे पालन आणि अहिंसा हेच माणसाला तारणारे घटक आहेत. हे भागवत धर्माचे मर्म लोकापर्यंत पोचण्याची कार्य आवड होती आणि तें कार्य नामदेवांनी केले. आजू बाजूच्या परीसरात भागवत धर्माची शिकवण दिली. विचार लोकांच्या गळी उतरवणे सुरू केले. जनजागृतीचे शिक्षण देताना समतेचा विचार देताना सर्वामध्ये आत्मा एक आहे. हे लोकांना पटवून दिले. चंद्रभागेच्या वाळवंटात होणारे कीर्तन हे तर सर्व धर्म समभावाची सर्वात आदर्श उदाहरण होते. काल्याचे कीर्तन किंवा एकमेकाना अलिंगन देऊन त्यांना आपल्या भावना व्यक्त करण्यात येत होती. नामदेवाच्या सान्निध्यातील चोखामेळा त्यांचे सर्व संत मोठ्या प्रमाणात होते.

त्यात जनाबाई, सावता. सेना अशा खालच्या जातीतील समाज मोठ्या प्रमाणात होता. ते सर्व संत उच्चनीचतेचा कोणताही विचार न करता सर्व एकत्र येत होती. एकमेकाच्या पायावर डोके ठेवत असत. संत नामदेवांनी आणि समाजातील सर्व थरातील माणसाला उपदेश केला. सज्जन आणि ज्ञानी माणसाने अहंकार बाळगणे मान्य नव्हते. संसारी माणसाने वासने पासून दूर राहावे. दुर्जनानी आपल्यात बदल करून सदाचार व्हावे. धनवान आणि गरिबांचा घरी जाऊन ज्ञान देत होते. मोहम्मद तुघलकाच्या नातू फिरोज तुघलक हा धार्मिक आणि सहिष्णुतेचे पाईक होता. ते एकदा खूप अस्वस्थ अवस्थेत दिवस काढत होते. या पापाचे परिमार्जन करण्यासाठी त्याने

नामदेव महाराजांना आमंत्रित केले आणि सुंदर मंदिर बांधण्याचा संकल्प केला. मुस्लिम आणि शीख दोन्ही धर्मात मूर्तीपूजा निषेध असली तरी. नामदेव महाराज हिंदू होते त्यामुळे. त्यांच्या मूर्ती प्रतिष्ठापना केली. पुढे सरदार. जस्सासिंग रामगडिया यांनी हे मंदिर पूर्ण केल्याचा दाखला मिळतो. शिख परिसर विकसित केल्यामुळे गुरुद्वारा पद्धतीने मंदिर बांधला गेला. म्हणजे हिंदू मुस्लिम सीख. धर्माच्या पद्धतीने. मन्दिर मस्जिद गुरुद्वारा या त्रिवेणी संगम एकाच ठिकाणी झाल्यामुळे. राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिक मानले गेले. नामदेव महाराज पंजाबमध्ये विशेषता घुमानमध्ये स्थिर झाले. तो काळ 14 व्या शतकातला होता. नामदेवाचा निर्वाणानंतर 50 वर्षानंतर संत कबीराचा जन्म झाला आणि 150 वर्षानंतर गुरुनायकाचा जन्म झाला. गुरुदेव नानकानी शीख धर्माची स्थापना केली. शीख धर्मगुरू हा परमेश्वराने गुरु ग्रंथ साहेब हा पवित्र ग्रंथ हा सिद्धांत मान्य केला गेला. पुढे गुरुदेव नानकांच्या नंतर आणखीन नऊ शिख धर्माचे गुरू होते. दहावे गुरू गोविंदसिंग यांच्यानंतर आता एकही होणार नाही असे त्याने जाहीर केले आणि गुरु परंपरा थांबली. गुरु गोविंद सिंह यांनी महाराष्ट्रातील मराठवाड्यातील नांदेड येथे समाधी घेतली. हा एक विलक्षण योगायोग आहे. महाराष्ट्रातील एक संत 700 वर्षापूर्वी पंजाब जातो आणि सुमारे 20 वर्ष तपश्चर्या करतो. आपले अनेक भक्त अनुयायी तयार करतो. 21 व्या शतकात शीख धर्मातील सर्वोच्च गुरु महाराष्ट्रात आपले अनुयायी निर्माण करून लोकशिक्षणाचा पुण्याचा पाया घालतो. महाराष्ट्राने पंजाबाचा हा संबंध खूप जुना आहे. त्याच्या पाया संत नामदेव महाराजांनी घातला आहे. ज्वाला. नामदेव महाराज यांनी आपल्या आयुष्यातील 25 वर्षाहून अधिक काळ. महाराष्ट्रभर काढला. 50 वर्षे महाराष्ट्रातील विविध भागात काढले. ते पंजाबमध्ये आले तेव्हा त्यांचे वय 50 वर्षे असावे. ते पाच वर्षे हरिद्वारमध्ये राहिले. त्यानंतरच्या मोहम्मद तुगलक. यांनी दिल्लीमध्ये ठेवले.

**संदर्भ ग्रंथ :**


1. पाठक अं. श. संपादित – महाराष्ट्र राज्य गॅझेटियर - महाराष्ट्र शासन, 2002
2. Dakshina Kannada Philatelic and Numismatic Association. 8 अप्रैल 2003 को पुरालेखित.
3. प्रोफेसर सुस्मिता लेखक देवकीनंदन शुक्ल, उद्योगनगर प्रकाशन, गाज़ियाबाद, 2105,
4. साहित्य का इतिहास दर्शन बच्चनसिंह, राधाकृष्ण प्रकाशन नई दिल्ली, 1996,

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# जागतिक पर्यावरण संरक्षणात भारताची भूमिका

**प्रा. डॉ.जयराम ढवळे**
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी ता. गेवराई जि. बीड
**Corresponding Author: प्रा. डॉ.जयराम ढवळे**
**Email**-jsdhawale7@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15844863**

**सारांश-**

मानवाचा आणि पर्यावरणाचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. पर्यावरण शुद्ध ठेवण्यासाठी मानव व पर्यावरण यांचे संतुलन कायम ठेवणे आवश्यक आहे मानवाने औद्योगिक क्रांती, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीने विकासाचे सर्वोच्च शिखर गाठताना व्यक्तिवादाला प्राधान्य दिले त्यामुळे मानवाची प्रगती झाली. मानवाने स्वार्थी हव्यासासाठी पर्यावरण संरक्षणाकडे पाठ फिरवली एवढेच नाही तर स्वार्थासाठी निसर्गाचा समतोल बिघडवला पर्यावरणाचे असंतुलन निर्माण केले अलीकडच्या काळात पृथ्वीवरील पर्यावरणाचे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे जर याचप्रमाणे पर्यावरणीय प्रदूषण होत राहिले तर अनियंत्रित विकासाचा परिणाम पृथ्वीच्या संतुलनाला धोका पोहोचवेल हे सजीव सृष्टीच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने घातक आहे यातून मानव प्राण्याचे अस्तित्व टिकून राहील की नाही असा प्रश्न निर्माण होतो. मार्गारेट मिड या विचारवंताने असे म्हटले आहे की," जर पर्यावरण नसेल तर मानव समाज नसेल". म्हणून पर्यावरणाच्या रक्षणाकरिता शाश्वत विकासाकरिता पर्यावरण प्रदूषण संरक्षणासाठी जनजागृती करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पर्यावरणाच्या प्रत्येक घटकांमध्ये क्रिया - प्रतिक्रिया घडत असतात पर्यावरणाचा मानवावर आणि मानवाचा पर्यावरणावर थेट परिणाम होत असतो. पर्यावरण मानवाला पोषक दोषक स्थिती निर्माण करते आणि मानव पर्यावरण संतुलित प्रदूषित करू शकतो. पर्यावरण मानवाला अधिकाधिक पोषक वातावरण देण्याचा प्रयत्न करते तर माणूस पर्यावरणाला दूषित करतो या समर्थक विरोधक भूमिकेमुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे .

**पर्यावरण प्रदूषणास कारणीभूत घटक :-**

डॉक्टर जोसेफ मायलर यांनी म्हटले आहे की," हिरव्या कुरणांचे वाळवंट करणारा पवित्र नद्या दूषित करणारा दुसरा तिसरा कोणी नसून माणूसच आहे." वरील वाक्यावरून पर्यावरणाच्या ऱ्हासास मनुष्य अधिक प्रमाणात जबाबदार आहे मानवी क्रिया प्रक्रियामुळे निसर्गावर ताण वाढत आहे जेव्हा मानवनिर्मित पर्यावरणीय प्रभावाचा निसर्गनिर्मित पर्यावरणीय घटकावर त्याचा परिसीमे पलीकडे प्रभाव पडतो तेव्हा प्राकृतिक तत्वे कोणतीत होऊन त्यांची सोनियंत्रण क्षमता रास पावते व पर्यावरणाची अवनती होते. पर्यावरणाची उपेक्षा मानवाकडून होऊ लागते तेव्हा पर्यावरण प्रदूषण सुरू होते. लोकसंख्या वाढीमुळे जंगलतोड, औद्योगिक विकास, नागरिकरण ,कृषी क्षेत्राचा विकास व विस्तार यातून अधिक उत्पादन वाढीसाठी रासायनिक खते, कीटकनाशके यांचा अति वापर पशुधन वृद्धी व चराई तंत्रज्ञानाचा व तांत्रिक साधनांचा गैरवापर नैसर्गिक साधनांचा ऊर्जेचा अतिरिक्त वापर वाहतूक व दळणवळण अंधश्रद्धा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव स्थलांतर युद्धे मोठी धरणे पर्यटन टाकाऊ कचरा ई कचरा कारखान्याचे विषारी सांडपाणी अनु प्रकल्प व अणुचाचण्या यामुळे जागतिक तापमान वाढ वाळवंटीकरण,ओझोनच्या थराचे शरण वन्यजीवांचा ऱ्हास ,नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण,टाकाऊ घन पदार्थाचे प्रदूषण, हवामाती, जलध्वनी ,सागरी औद्योगिक किरणोत्सरी प्रदूषण होऊन पर्यावरण घातक अवस्थेत पोहोचले आहे.

पर्यावरण प्रदूषण समस्याने संपूर्ण जगासमोर उग्ररूप धारण केले आहे जगाचे तापमान सध्या सरासरी 2.5 ते 3.76 अंश सेल्स वाढत आहे सध्याचे दुष्काळ भारतामध्ये काश्मीर व चेन्नई झालेली अतिवृष्टी म्यानमार देशात नर्स नर्गिस नावाचे चक्रीवादळ आणि निनोचे संकट, अमेरिकेत

जंगलात लागलेली आग,उत्तर कोरियाने केलेले हायड्रोजन बॉम्बची चाचणी, जपानवर वारंवार होणारा भूकंप व येणारी त्सुमानी 2015 हे वर्ष सर्वाधिक तापमानाचे वर्ष म्हणून गणले जाणे चीनमध्ये आज काळ्या धुक्याचे थैमान घातले अशा सर्व घटकांचा विचार केल्यास पर्यावरण प्रदूषणावर वेळीच उपाययोजना केल्या नाही तर पर्यावरणाच्या ऱ्हासाबरोबरच मानवी सृष्टीचा ऱ्हास त्याच गतीने होणार यात शंका नाही.

**पर्यावरण प्रदूषण संरक्षणात जागतिक स्तरावरून झालेले प्रयत्न :-**

आज पर्यावरण संरक्षण जाणीव ही जागतिक बनली असून प्रत्येक राष्ट्र पर्यावरण संरक्षणासाठी पुढे येत आहे त्या अनुषंगाने जागतिक पातळीवर विविध उपक्रम राबविले जात आहेत याचाच भाग म्हणून 05 जून, 1972 मध्ये स्टॉक होम या शहरात आंतरराष्ट्रीय स्तरावर पहिली पर्यावरण विषयक जागतिक परिषद आयोजन करण्यात आली या परिषदेत पर्यावरणय प्रदूषण, औद्योगिक व रासायनिक दूषितिकरण, हरितगृह वातावरणीय बदल, ओझोन वायू ,पर्जन्य सागरी परिसंस्थांचा समतोल अशा विविध पर्यावरणीय समस्यांचा ऊहापोह झाला.पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धनातून मानवासह अखिल सजीव सृष्टीच्या भविष्यासाठी सर्वांनीच एकत्रितपणे झटण्याची गरजही आहे असे प्रतिपादन करण्यात आले.

**जागतिक पर्यावरण संरक्षण आणि भारत :-**

'भारतात पर्यावरण संरक्षण व पर्यावरण संवर्धनासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रयत्न करण्यात येत असून त्या दृष्टीने अनेक कायदे व यंत्रणा निर्माण केले आहे .इसवी सन 1972 मध्ये भरलेल्या पर्यावरण परिषदेपासून ते आतापर्यंतच्या सर्व पर्यावरण परिषदेमध्ये भारताने सहभाग घेतला भारताच्या राज्यघटनेतच पर्यावरण संरक्षणाची तरतूद केलेल्या काही मोजक्या राष्ट्रांपैकी भारत हे एक अग्रगण्य राष्ट्र आहे.भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 48 नुसार पर्यावरणाचे रक्षण करण्याचे शासनावर बंधन टाकण्यात आले आहे त्यामध्ये पर्यावरणाचे प्रदूषण टाळणे, होणाऱ्या प्रदूषणाला नियंत्रित करणे व त्याचा समतोल राख कोणत्या सुधारणा करण्यासाठी कायदे करणे हे राज्याचे कर्तव्य आहे तसेच भारतीय राज्यघटनेमध्ये 51- अ व 48- अ हे अनुच्छेद समाविष्ट करण्यात आले त्यापैकी 51- अ नुसार पर्यावरणाचे रक्षण करणे हे भारताच्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

**पर्यावरण प्रदूषण संरक्षण विषयक कायदे :-**

1. वन्यजीव संरक्षण कायदा- 1972 :- वन्यजीवांचे संरक्षण व्हावे यासाठी हा कायदा पारित करण्यात आला यामध्ये जंगलातील वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करणे वन्यप्राणी व पक्षांच्या शिकारी संबंधित कायदा वन्य प्राण्यांच्या व्यापारासंबंधी याची तरतूद केलेली आहे

2.जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा - 1974 :- या कायद्यामध्ये पर्यावरण संरक्षणाला आळा घालण्यासाठी केंद्रीय प्रदूषण मंडळ व राज्यस्तरीय जलप्रदूषण मंडळाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली तसेच जल प्रतिबंध आणि जलप्रदूषण नियंत्रणा संबंधी सल्ला देण्याचे काम केल्या जाते या प्रदूषणाने पाण्याची स्वच्छता व शुद्धता धोक्यात आणणाऱ्यांना रुपये दहा हजार पर्यंतचा दंड किंवा तीन महिन्याचा कारावास किंवा दोन्ही शिक्षा केल्या जातात या कायद्याअंतर्गत सामान्य नागरिक कारखाने व शासन या सर्वांना गुन्हेगार ठरविता येऊ शकते.

3.वन संवर्धन कायदा- 1980 :- पर्यावरणाचे असंतुलन आणि रास होऊ नये यासाठी मानवी अस्तित्वासाठी पोषक आहे जंगलाची तोर पर्यावरण बिघडविण्याच्या मुख्य कारणांपैकी काय हे लक्षात घेता जंगलाचे रक्षण करण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे.

4.वायु प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा - 1981 :- या कायद्याने वायू प्रदूषणाचा अर्थ प्रदूषणाची कारणे तसेच त्यावर नियंत्रण उपाययोजना सांगितले आहे वायू प्रदूषण रोखणे इंधन व स्फोटके ज्वलनशील पदार्थ यांच्यावर बंदी घालण्यासाठी तरतूद हवेची गुणवत्ता व ग्राहक पाठ्यकविणे हे या कायद्याचे उद्दिष्ट आहे .

5.पर्यावरण संरक्षण अधिनियम कायदा - 1986 :- पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने इसवी सन 1985 मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा संमत केला या कायद्याने उल्लंघन करणाऱ्या सात वर्षात रुंवासाची शिक्षा शिवाय एक लाख रुपये दंड भरावा लागेल.

**पर्यावरण बदला विषयी पॅरिस परिषद - 2015 :-**

पॅरिस येथे पर्यावरण बदला संबंधीच्या कराराविषयी जागतिक पातळीवर सर्वपक्षीय परिषद 31 डिसेंबर २०१५ रोजी झाली या परिषदेत भारताचे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाढत्या जागतिक तापमानाला विकसित राष्ट्रे अधिक उत्तरदायी असून त्यांनी या संदर्भात पावले उचलणे आवश्यक असल्याचे सडेतोड वक्तव्य केले भारताने वायू उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यासाठी हे स्पष्ट केले की 2022 पर्यंत सौर ऊर्जा जवळपास 100 गिगा वॅट पर्यंत वाढवण्यात येईल व पवन ऊर्जाच्या क्षमता सुद्धा 60 विगावात पर्यंत वाढविण्यात येईल भारताने असेही आश्वासन दिले आहे की वायू उत्सर्जनाच्या तीव्रतेविषयी 2005 च्या पातळीपेक्षा 2030 पर्यंत 33 ते 35 टक्के गट करण्यात येईल भारताला औष्णिक ऊर्जेच्या आवश्यकतेची जाणीव आहे भारताने त्यासाठी कार्बन सिंक प्रस्तावित केला आहे म्हणजे जेवढ्या प्रमाणात कार्बनचे उत्सर्जन होईल तेवढ्या प्रमाणात जंगले वाढवली जातील शेवटी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी यांचा संदर्भ देऊन म्हटले आहे की आम्ही पृथ्वीच्या कल्याणाचे विश्वस्त म्हणून भूमिका पार पाडण्यासाठी आलो आहोत आगामी पिढ्यांची आम्हाला काळजी आहे.

थोडक्यात जागतिक पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी विकसित विकसनशील राष्ट्रांनी पर्यावरण संरक्षण करणे गरजेचे आहे पर्यावरणीय प्रदूषणाने पृथ्वीवरील जीवसृष्टीचे संतुलन बिघडले आहे पृथ्वीवरील तापमाना दिवसेंदिवस वाढत होत असल्यामुळे ओझोनचा स्तर कमी होत असून अल्ट्रा फायोलेट किरणांद्वारे मानवी जीवनावर विपरीत परिणाम होत आहे सर्व प्रकारचे प्रदूषण हेच पर्यावरणाच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण आहे पर्यावरण म्हणजे पूर्वजांकडून मिळालेली आणि निसर्गाने प्रदान केलेली अनमोल जिंदगी असून त्याच्या संरक्षणात मानवी जीवन व सजीव सृष्टीचे हित सामावलेले आढळते पर्यावरण प्रदूषणात मानवी संस्कृती आणि सभ्यतेचा विधवांस आढळून येतो जागतिक पातळीवर पर्यावरण प्रदूषण नियंत्रणासाठी भारत हे राष्ट्र कार्यक्षम असल्याचे दिसून येते

**संदर्भ :-**

1. पर्यावरण शिक्षण -उषा मिश्रा
2. पर्यावरण -डॉ. विठ्ठल घारापुरे
3. पर्यावरणाचे प्रदूषण व नियंत्रण - वि.प. गुप्ते
4. दैनिक लोकसत्ता -31 डिसेंबर ,2015
5. Environment Pollution - T.Katyal,M.Satake
6. Environmental Science - M.R.Khan

**प्रा. डॉ.जयराम ढवळे**

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.6 No.30 Mar-Apr- 2025

# मराठा कालीन न्यायव्यवस्था : मजलिस आणि पंचायत पद्धतीचा एक तुलनात्मक अभ्यास

**अमित प्रकाश निकम[१] ,डॉ. रमेश धनराज जाधव[२]**
[१]संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
[२]संशोधन मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख, आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर (धुळे)
**Corresponding Author: अमित प्रकाश निकम**
**Email**-amit.nikam15@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.16015558**

**सारांश:**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात, इ.स. १६५० ते १८१८ हा काळ 'मराठा कालखंड' म्हणून ओळखला जातो. या कालखंडाचे ढोबळमानाने दोन भाग पडतात, शिवशाही (इ.स. १६३०-१७५०) आणि पेशवाई (इ.स. १७५०-१८१८). या दोन्ही भागांमध्ये काही मूलभूत फरक असले तरी, राज्यकर्ते मराठी भाषिक असल्याने या संपूर्ण कालखंडाला 'मराठा कालखंड' असे संबोधले जाते. भारताच्या इतिहासात मराठा कालखंडाला एक तेजस्वी पर्व मानले जाते, कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण भारतातील विविध जाती-धर्मांच्या प्रजेला एकत्र घेऊन स्वतंत्र व सार्वभौम स्वराज्याची स्थापना केली. ही घटना तत्कालीन राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थिती पाहता अशक्यप्राय वाटत होती. तथापि, शिवाजी महाराजांसारख्या दूरदृष्टीच्या, धाडसी आणि जाणत्या नेतृत्वामुळे हे शक्य झाले.

**कळीचे शब्द ( Key Word):** मजलिस, पंचायत, सांस्कृतिक

**प्रस्तावना (Introduction) :**

शिवाजी महाराजांनी इ.स. १६४७ मध्ये तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याच्या वाटचालीस प्रारंभ केला. त्यांनी केवळ प्रदेश जिंकण्यावर भर न देता, जिंकलेल्या प्रदेशात लोकाभिमुख आणि लोककल्याणकारी प्रशासन अंमलात आणण्याचे धोरण स्वीकारले. शिवाजी महाराज अत्यंत शिस्तप्रिय राज्यकर्ते होते आणि ते बेजबाबदार अधिकाऱ्यांची गय करत नव्हते. त्यांच्या कडक आणि खंबीर धोरणामुळे प्रशासन अत्यंत कार्यक्षम व शिस्तबद्ध बनले होते. शिवकालीन प्रशासन सर्वसामान्य प्रजेला केंद्रबिंदू मानून कार्यरत होते, ज्यामुळे ते खऱ्या अर्थाने प्रजाहितदक्ष होते असे दिसते.

शिवकालीन प्रशासनाचा अविभाज्य घटक म्हणजे न्यायदान व्यवस्था होय. शिवाजी महाराजांनी स्वीकारलेल्या न्यायनीतीवर शिवपूर्वकालीन मुसलमानी न्यायनीतीचा प्रभाव होता. शिवकालीन न्यायव्यवस्थेत छत्रपती हे सर्वोच्च न्यायाधीश होते. छत्रपतींना न्यायदानाच्या कार्यात सल्ला देणारे जाणकार माणसांचे मंडळ होते, ज्याला 'मजलिस' असे म्हणत. शिवपूर्वकाळातील मुसलमान राजवटीत ही 'मजलिस' पद्धत कार्यरत होती आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी ती आपल्या स्वराज्यातील न्यायदानाकरिता स्वीकारली. महाराजांनी स्वीकार केला असला तरी, स्वराज्याच्या हितासाठी त्यात अनेक मूलगामी सुधारणा केल्या. संपूर्ण शिवशाहीच्या कालखंडात मजलिस कार्यरत होती आणि समाजमान्यही होती. १७५० पासून मराठा कालखंडातील दुसऱ्या अध्यायाला, म्हणजेच पेशवाईला सुरुवात झाली आणि स्वराज्याच्या प्रशासनातही मोठे बदल झाले. मजलिस पद्धत संपुष्टात येऊन त्याजागी 'पंचायत' पद्धतीचा उदय झाला. पेशवेकालीन न्यायदान व्यवस्थेत पंचायत पद्धत अतिशय लोकप्रिय व समाजमान्य संस्था म्हणून ओळखली जात होती. या दोन्ही पद्धती मराठेकालीन न्यायव्यवस्थेशी निगडीत असल्या तरी, त्यांच्या रचना आणि कार्यपद्धतीमध्ये खूप मोठा फरक होता.

**उद्दीष्ट्ये (Objective):** सदर संशोधन लेखाचा मुख्य हेतू मराठा कालखंडातील न्यायव्यवस्थेचे 'मजलिस' आणि 'पंचायत' या दोन्ही पद्धतींचा सर्वांगाने अभ्यास करून, मराठेकालीन न्यायव्यवस्थेवर प्रकाश टाकणे हा आहे. यामध्ये खालील प्रमुख उद्दिष्टांचा समावेश आहे:

1. शिवकालीन 'मजलिस' या न्यायदान पद्धतीचा अर्थ, स्वरूप, प्रकार आणि कार्यप्रणाली जाणून घेणे.
2. 'मजलिस' चे महत्त्व आणि तिचा ऱ्हास होण्याची कारणे शोधणे.

3. पेशवेकालीन 'पंचायत' पद्धतीचा उदय, स्वरूप आणि प्रकार अभ्यासणे.
4. 'पंचायत' च्या न्यायदान कामकाजाची वैशिष्ट्ये आणि तिचे महत्त्व तपासणे.
5. 'मजलिस' आणि 'पंचायत' या दोन्ही न्यायपद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतक (Hypothesis):**

मजलिस आणि पंचायत या दोन्ही न्यायदान पद्धती मराठा कालखंडाच्या दोन भिन्न टप्प्यांमध्ये (शिवशाही आणि पेशवाई) कार्यरत होत्या. शिवशाहीतील मजलिस मध्ये सर्वधर्म समभावाची भूमिका दिसून येते तर पेशवाईतील जातपंचायतीमुळे जातीय विभक्तिकरण घडून आले.

**मुख्य भाग (Body of the Chapter):**

**१. मजलिस: अर्थ, स्वरूप आणि प्रकार** :

मराठेकालीन न्यायव्यवस्थेतील एक महत्त्वाचा विभाग म्हणजे मजलिस. मोल्सवर्थ यांनी आपल्या शब्दकोषात 'मजलिस' या शब्दाचा अर्थ 'रॉयल कोर्ट किंवा असेम्ब्ली' असा दिला आहे. य. न. केळकर यांनी 'दरबार किंवा बैठक' असा अर्थ सांगितला आहे, तर डॉ. व्ही. टी. गुणे याला 'धर्मसभा' असे म्हणतात. या सर्व व्याख्यांचा विचार करून, मजलिस म्हणजे "राजाला किंवा छत्रपतीला न्यायदानाच्या कार्याबाबत सल्ला देणारे जाणकार व विद्वान व्यक्तींचे मंडळ" होय. मजलिस हा एक फारसी भाषेतील शब्द होता, जो स्वराज्यातही प्रचलित होता.

या प्रकरणात मजलिसची परिपूर्ण व्याख्या, स्वराज्यात मजलिसचा उदय आणि तिचे वेगवेगळे टप्पे सविस्तरपणे सांगितले आहेत. मजलिसचे मुख्य प्रकार खालीलप्रमाणे होते:

- **खेडे मजलिस**
- **कसबा मजलिस**
- **तर्फ मजलिस**
- **परगणा मजलिस**
- **केंद्रीय मजलिस**

**२. मजलिसची कार्यप्रणाली**:

मराठेकालीन न्यायव्यवस्थेतील न्यायदानाचे कामकाज वैशिष्ट्यपूर्ण होते आणि मजलिसची कार्यप्रणाली विशिष्ट प्रकारची होती. मजलिसचे योग्य घटनास्थळ वादी-प्रतिवादी ज्या परिसरातील रहिवासी असतील किंवा तंट्यास प्रारंभ ज्या ठिकाणी झाला असेल, त्याच ठिकाणच्या मजलिसकडे दाद मागितली जात असे. हा केवळ एक संकेत होता, नियम नव्हता. फिर्यादीला आपल्या क्षेत्रातील मजलिसवर विश्वास नसल्यास दुसऱ्या ठिकाणच्या मजलिसकडे फिर्याद नोंदवण्याचे स्वातंत्र्य होते.

एखाद्या प्रकरणात वादीची तक्रार, मजलिस समोरील खटल्याची सुनावणी व निर्णय, आणि न्यायनिवाड्याने समाधान न झालेल्यांना खटल्याच्या पुनर्सुनावणीसाठी परवानगी दिली जात असे . मराठे कालखंडात प्रचलित असलेले 'दिव्य' आणि त्याचे विविध प्रकार (उदा. अग्निदिव्य, जलदिव्य इ.) यांची माहिती विस्ताराने दिली आहे. दिव्य हा न्यायव्यवस्थेमधील शेवटचा पर्याय होता आणि त्याला छत्रपतींच्या स्वहस्ताक्षरातील परवानगीची (हातरोखा) आवश्यकता असे. खटल्याचा न्यायनिवाडा झाल्यानंतर निर्णयाची अंमलबजावणी आणि दोषी व्यक्तीला फर्मावलेल्या वेगवेगळया प्रकारच्या शिक्षा दिल्या जात.

तत्कालीन न्यायदान प्रणालीमध्ये न्यायालयीन शुल्क आकारले जात असे. वादामध्ये खरा ठरलेल्या व्यक्तीकडून 'हारकी' किंवा 'शेरणी' वसूल केली जात असे, तर वादात खोटा ठरलेल्या दोषी व्यक्तीकडून 'गुन्हेगारी' वसूल केली जात असे. हेच न्यायदान प्रणालीचे उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. गुन्हेगारी किंवा शेरणीचे प्रमाण वादी-प्रतिवादीच्या आर्थिक ऐपतीवर अवलंबून होते. वतनाची जप्ती, दंड वसूल करणे आणि तुरुंगवास असेही अन्य शिक्षेचे प्रकार रूढ होते. न्यायनिवाडा पूर्ण झाल्यावर वादात खरा ठरलेल्या व्यक्तीस निवाडापत्राची एक प्रत दिली जात असे, ज्याला 'महजर' असे म्हणत.

**३. मजलिसचे महत्त्व आणि ऱ्हास :**

शिवपूर्वकालीन महाराष्ट्रात मजलिस पद्धत समाजमान्य बनलेली होती आणि महाराष्ट्राच्या न्यायदान क्षेत्राची ती एक गरज होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यात अपेक्षित सुधारणा करून तिची लोकप्रियता व पावित्र्य वाढवले. शिवकाळात मजलिस पद्धत प्रशासनाचा अविभाज्य भाग होती. मराठेकालीन मजलिस कार्यप्रणालीमध्ये सहभागी असलेले विद्वान, जाणकार आणि न्यायदानाकरिता प्रमाणभूत मानले जाणारे पवित्र ग्रंथांचा आधार घेत. धार्मिक व जातीय संघर्षात मजलिसची महत्त्वाची भूमिका असे. खोट्या साक्षीदारांना कठोर शिक्षा देण्यात येत. जातीभ्रष्ट झालेल्यांना पंक्तोपावन करून घेण्यात मजलिसची महत्वाची भूमिका असे, मजलिसच्या कामकाजात सर्वधर्मियांचा सहभाग असल्यामुळे मजलिसचे महत्त्व शिवकाळात महत्वाचे होते.

मराठेकालीन कागदपत्रे तपासल्यानंतर, मजलिसचा ऱ्हास का झाला हे स्पष्ट होते. मराठेकालीन

मजलिसच्या विनाशाला जबाबदार ठरलेली प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:

- प्रतिनिधित्वाची पद्धत
- पंचायत पद्धतीचा उदय व लोकप्रियता
- पंतसचिवाचे वाढलेले महत्त्व
- गोतसभेस प्राप्त झालेले महत्त्व

**४. पंचायत: उदय, स्वरूप व प्रकार:**

इ.स. १७४९ साली छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपतींच्या पर्वाशी निगडीत असलेली मजलिस संपुष्टात आली. स्वराज्याची सत्तासूत्रे साताऱ्याऐवजी पुण्याच्या शनिवारवाड्यातून हलू लागली आणि सत्तेचा केंद्रबिंदू पेशवा बनला. याच काळात मजलिसचा ऱ्हास होऊन पंचायत पद्धतीचा उदय झाला. पेशवे कालखंडात पंचायत ही एक महत्त्वाची व लोकप्रिय संस्था बनली.

पंचायतीचेही अनेक प्रकार अस्तित्वात आले:

- जातपंचायत
- ग्राम पंचायत
- महाल पंचायत
- परगणा पंचायत
- सरसुभा किंवा प्रांतीय पंचायत
- छत्रपतींची पंचायत
- पेशवा पंचायत

या प्रत्येक पंचायतमधील पंचमंडळी, सरकारी अधिकारी आणि पंचायतच्या कार्यकक्षा निर्धारित करण्यात येत.

**५. पंचायतचे कामकाज** :

पेशवेकालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात पंचायतच्या निर्णयांना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. पंचायत ही न्यायदान करणारी व्यवस्था असली तरी, तत्कालीन समाज तिला पापक्षालणाचे एकमेव माध्यम म्हणून आदर देत असे. पेशवेकालीन पंचायतच्या न्यायदान पद्धतीचे कामकाजही वैशिष्ट्यपूर्ण होते.

कामकाजाच्या अनुषंगाने, अग्रवादीची तक्रार आल्यास प्रतिवादीस बोलावले जात असे, पंचांची निवड व पंचायतचे ठिकाण निश्चित करण्यात येई. खटल्याची सुनावणी करतना साक्षीदारांना आमंत्रण दिले जात असे. प्रमाणभूत ग्रंथांनुसार निवडा होत असे, अपयशी पक्षकाराने वरच्या पंचायतकडे अपील केल्यास त्याची पुनर्सुनावणी करण्यात येत असे. पंचायतने दोषी व्यक्तींना सुनावलेल्या शिक्षा, दिव्य, वतनाची जब्ती इ. पंचायतच्या निवाड्याची अंमलबजावणी कठोर पणे करण्यात येत असे. पंचायतचे शुल्क शेरणी किंवा हारकी व गुन्हेगारी च्या स्वरुपात वसूल करण्यात येत असे.

**६. मजलिस पद्धत व पंचायत पद्धतः तुलनात्मक आढावा** :

मराठेकालीन न्यायव्यवस्थेचे मजलिस व पंचायत हे अविभाज्य घटक होते. मजलिस पद्धतीचा संबंध शिवशाहीशी, तर पंचायत पद्धतीचा संबंध पेशवाईशी होता. या दोन्ही पद्धती मराठेकालीन न्यायदानाशी निगडीत असल्या तरी, त्यांच्यात मोठा फरक जाणवतो.

- **खटल्यांचे स्वरूप:** मजलिस शिवशाहीतील केवळ दिवाणी स्वरूपाचे खटले निकालात काढत असे, तर पंचायत पेशवाईतील दिवाणी व फौजदारी असे दोन्ही प्रकारचे न्यायनिवाडे सोडवत असे.
- **जातीय सलोखा:** मजलिस पद्धतीमध्ये सर्व जाती-धर्मियांना सामावून घेऊन जातीय सलोखा राखला जात होता. याउलट, पंचायतमधील 'जात पंचायत' ह्या प्रकारामध्ये प्रत्येक जातीच्या वेगवेगळया पंचायती उदयास आलेल्या दिसून येतात, ज्यावरून जातीय विभक्तिकरणाचा प्रत्यय येतो.
- **सर्वोच्च अधिकारी:** मजलिस पद्धतीमध्ये स्वराज्याचा छत्रपती सर्वोच्च अधिकारी मानला जात होता, तर पंचायत पद्धतीत पुण्याचा पेशवा हा सर्वोच्च अधिकारी होता.
- याशिवाय उर्वरित बाबतीत विशेष फरक जाणवत नाही.

अशा प्रकारे मजलिस व पंचायत पद्धतींमधील ठळकपणे जाणवणाऱ्या मुद्यांचा तुलनात्मक आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष (Concluding Remarks):**

मराठा कालखंडातील न्यायव्यवस्था, मजलिस आणि पंचायत या दोन महत्त्वपूर्ण पद्धतींमधून विकसित झाली. शिवशाहीतील 'मजलिस' ही छत्रपतींच्या नेतृत्वाखालील एक केंद्रीय आणि सर्वसमावेशक न्याय मंडळी होती, जिथे सर्वधर्मियांना स्थान होते आणि मुख्यत्वे दिवाणी खटले हाताळले जात होते. तिचे उद्दिष्ट प्रजाहितदक्ष प्रशासन आणि जातीय सलोखा राखणे हे होते. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर आणि पेशवाईच्या उदयाबरोबरच मजलिस पद्धतीचा ऱ्हास झाला, ज्याला प्रतिनिदित्वाचा अभाव आणि पंचायत पद्धतीची वाढती लोकप्रियता अशी अनेक कारणे कारणीभूत ठरली.

पेशवाईतील 'पंचायत' पद्धत अधिक विकेंद्रित होती आणि त्यात जातपंचायतींचे उदयास येणे हे जातीय विभक्तिकरणाचे द्योतक होते. पंचायत दिवाणी आणि फौजदारी दोन्ही प्रकारचे खटले चालवत असे, आणि तिचा सर्वोच्च अधिकारी पेशवा होता. पंचायतने समाजमान्यता मिळवली असली तरी, मजलिसमध्ये असलेले सर्वसमावेशक स्वरूप यात काही प्रमाणात कमी झाले.

एकंदरीत, मराठेकालीन न्यायव्यवस्थेने समाजातील विविध स्तरांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. मजलिस आणि पंचायत या दोन्ही पद्धतींनी आपापल्या

कालखंडात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्यातील तुलनात्मक अभ्यासामुळे मराठेकालीन सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय बदलांवर प्रकाश पडतो आणि हे स्पष्ट होते की, न्यायव्यवस्थेची रचना तत्कालीन सत्तेच्या केंद्रबिंदूवर आणि सामाजिक गरजांवर कशी अवलंबून होती. या अभ्यासातून मराठा साम्राज्याच्या न्यायदानाचे वेगळेपण आणि तिचे उत्क्रांतीवादी स्वरूप स्पष्ट होते.

**संदर्भ (Reference):**


१. जोशी श.ना. व खरे ग. ह. **'शिव चरित्र साहित्य'**, भा. इ. सं. मं., पुणे, १९३०
२. सरदेसाई गो. स., काळे या. मा., वाकसकर वि. स. (संपा.), '**ऐतिहासिक पत्रे'** चित्रशाळा प्रेस, पुणे
३. गुणे व्ही. टी., **'ज्युडिशियल सिस्टीम ऑफ द मराठाज'**, डेक्कन कॉलेज संशोधन संस्था, पुणे
४. शेजवळकर टी. एस., 'श्री. शिवछत्रपती', मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई
५. गायकवाड आर. डी., 'मराठेकालीन संस्था आणि विचार', फडके आणि कंपनी, कोल्हापूर, १९९०
६. केळकर य. न., 'ऐतिहासिक शब्दकोश भाग -२', ढोबळ प्रकाशन, पुणे, १९६२
७. **https://marathivishwakosh.org/41528/**

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India

**Editorial & Advisory Board**

| | | |
|---|---|---|
| Dr. S. D. Shinde | Dr. M. B. Potdar | Dr. P. K. Pandey |
| Dr. L. R. Rathod | Mr. V. P. Dhulap | Dr. A. G. Koppad |
| Dr. S. B. Abhang | Dr. S. P. Mali | Dr. G. B. Kalyanshetti |
| Dr. M. H. Lohgaonkar | Dr. R. D. Bodare | Dr. D. T. Bornare |